
शनिवार । १६ जून १९७३
पन्नास पैसे

# माणूस



संपादक
श्री. ग. माजगावकर

१६ जून १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | पंचवीस रुपये | वर्ष : तेरावे – अंक : तिसरा |
| परदेशची वर्गणी | पासष्ट रुपये | |




५ जून, १९७३

◻ 'माणूस'च्या २ जूनच्या अंकात पंडित क्षीरसागर यांची 'लिफ्ट' नावाची गोष्ट वाचली व एकदम आठवले की, हीच कथा मागच्या वर्षी बी. बी. सी. मार्फत आयोजित लघुकथा स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कथा म्हणून गणली गेली होती. अर्थात आता मूळ इंग्लिश कथेचे नाव व लेखक आठवत नाही पण आपण मनाने इतके संकुचित असतो की मूळ लेखकाचे नाव तर सोडाच साधे 'आधारित' लिहिण्याचा दिलदारपणासुद्धा दाखवत नाही. ह्या 'धाडसाबद्दल' पंडित क्षीरसागर ह्यांचे कौतुक करावयास पाहिजे.

**प्रभाकर सोनवलकर** पणजी, गोवा

८ जून, ७३

◻ दि. ९ जूनचा माणूस वाचला. पृष्ठ

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकांत व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

१५ वरील 'सोलकढी'तील 'तो तरस्वत:, मी सारस्वत'ची चव उत्कृष्ट वाटली. 'शतपावलीकारांच्या' शैली इतकेच खुमासदार नि चवदार. अधिक भाष्य अनावश्यक होईल.

चित्तरंजन घोटीकर, डोंबिवली

---

## समान वेतनश्रेणीची गरज

---

७ जून, ७३

□ आपण पाठविलेल्या २ जून १९७३ च्या अंकातील पान ५५ वरील लेख वाचला. त्या लेखात श्री. वि. शं. पारगावकर यानी लिहिल्याप्रमाणे (पान ५७, शेवटचा परिच्छेद) प्रिन्सिपॉल, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर सेवक वर्ग आणि विद्यार्थी मिळून संपूर्ण संस्था होते हे अगदी बरोबर आहे आणि यातील घटकाला त्याचे योग्य ते स्थान, काम व मोबदला मिळाला पाहिजे.

यादृष्टीने महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवकवर्गाची परिस्थिती अत्यंत अनुकंपनीय आहे.

माध्यमिक शाळांचे बाबतीत शासनाने केलेल्या अनुदान संहितेप्रमाणे (ग्रँट इन् कोड) नियम होणे आवश्यक आहे. त्या दृष्टोने विद्यापीठाचे कायद्यामध्ये आवश्यक तो बदल होणे आवश्यक आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणे विद्यापीठ फक्त शिफारस करू शकते. त्याची अंमलबजावणी होते अगर नाही यावर नियंत्रण ठेवू शकत नाही. विद्यापीठ कायद्यातील अधिकार फक्त शिफारसवजा न राहता त्याला कायद्याने अधिकार, अधिष्ठान व नियंत्रणाचे अधिकार दिले गेले पाहिजेत.

विधिसभेतील अर्थसंकल्पावरील चर्चेत शिफारसवजा अधिकार उपयोगी नाहीत. कायद्याने अधिकार पाहिजेत नाहीतर त्याचा प्रत्यक्ष फायदा शिक्षकेतर सेवकवर्गाला मिळणार नाही असे सर्वसाधारण मत व्यक्त केले गेले व असा अधिकार शासनाचा असून, नवीन होणाऱ्या विद्यापीठाचे समान कायद्यात अशी तरतूद व्हावी असे मत प्रदर्शित केले गेले.

महाविद्यालय क्षेत्रात काम करणारे सर्व प्राचार्य व प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर सेवकवर्गाचे महत्त्व जाणतो व त्यांची स्थिती सुधारावी अशीच सर्वांची भावना आहे.

व्यक्तीश: इतर घटकांप्रमाणेच शिक्षकेतर सेवकांच्या सहकार्यावर व कार्यक्षमतेवर महाविद्यालयातील शिक्षण व गुणवत्तेचा दर्जा अवलंबून आहे असे माझे प्रामाणिक मत आहे

याबाबत सर्व ठिकाणच्या महाविद्यालयांतील शिक्षकेतर सेवकवर्गासाठी काही समान वेतनश्रेणी व नियम असावेत असे मला वाटते.

आपल्या साप्ताहिकात या प्रश्नाला आपण स्थान देऊन वाचा फोडली याबद्दल आपले व लेखक श्री. पारगावकर यांचे अभिनंदन.

मो. भा. लिमये, पुणे

## त्यासाठी हवेत सावरकर, आंबेडकर

९ जून, ७३

¤ दि. २–६–७३ चा अंक संपूर्ण वाचला. 'मौजे येणेगूरमधील एक रात्र. (विलास अरवदे) 'ब्राह्मणगाव, घाटनांद्रा आणि?' (अनिलकुमार गायकवाड) 'शहादे आघाडीवरून' (अशोक मनोहर) वाचून या लेखकांचा आणि तुमचाही राग आला. नव्हे संताप आला. का लिहिता आणि मुद्रिता हे? काय उपयोग त्याचा? हे केवळ अरण्यसदन. दलितांची दुःखे वेशीवर टांगल्याचे समाधान त्यात लाभत असेल. पण त्याचा उपयोग होतो का? नाही.

यथा प्रजा तथा शासन. आमचा हा एकूण समाजच आज बधिर झाला आहे. अंध झाला आहे. त्याला पीडितांच्या किंकाळ्या ऐकूच येत नाहीत. दिसतही नाहीत. अंधत्व आणि बधिरता याबरोबरच त्याला मरगळ आली. हा समाज तरी सुखी आहे का? मुळीच नाही. मग तो हे अन्याय आणि दंडेली का सहन करतो. कारण एकच मुर्दाडपणा, भ्याडपणा, मुर्दाड आणि भ्याडांना यापेक्षा वेगळी वागणूक कशी शक्य आहे? 'बळी तो कान पिळी' हेच खरे.

मला वाटते हे अरण्यरुदन आता थांबवले पाहिजे. अन्यायाच्या, दंडेलीच्या प्रतिकाराला दलितांनी सज्ज व्हावे असे मंत्र दिल्याशिवाय हा लाचार समाज उभा होणार नाही. त्याला आता सवाई दंडेली शिकवायला हवी. शासनाच्या दारात जाऊन न्यायाच्या भिकेसाठी शेपटी हलवण्यात मतलब नाही हे त्याला समजावून दिले पाहिजे. त्यासाठी हवेत आधुनिक म. फुले, सावरकर, आंबेडकर.

अरे पण मी सुद्धा हे अरण्यरुदनच करू लागलो की. कारण स्पष्ट आहे. मी त्याच दीन, दुबळ्या, लाचार, मरगळलेल्या, अंध, बधिर समाजाचा एक घटक. दुसरे काय करणार? स्वतः-वर रागावून लेखन थांबवतो.

अनंत कुलकर्णी,
लातूर

## हा प्रश्न आता घरोघरचा आहे.

६ जून, ७३

¤ आपल्या साप्ताहिकाचा मी एक नियमित वाचक आहे. आपण नेहमीच काहीतरी नवीन आणि समाजाशी अत्यंत निगडीत असे प्रश्न हाताळता, दोन जूनच्या अंकात आपण पुन्हा एकदा 'नवगणिताच्या' प्रश्नाला वाचा फोडली आहे. मध्यंतरी ह्या विषयावरून उठलेल्या वादळानंतर सारे कसे शांत शांत झाले होते! म्हणजे सामान्य जनतेला वाटावे आता रूळले 'नवीन गणित' पण तसे दिसत नाही!

ग्रामीण भागातील शिक्षकांच्या अडचणी आणि त्यांना मिळालेली वागणूक वाचून अत्यंत खेद झाला खरोखर शिक्षकांबद्दल आपल्या मनात आदर

निर्माण होणार तरी कधी? ग्रामीण भागातील शिक्षकांचे खरोखरच हाल आहेत! पंधरा दिवसात ते शिकणार काय? आणि पुढे वर्षभर शिकवणार काय? त्यांचा तज्ज्ञांशी संपर्क साधणार तरी कसा? मणूरकरांनी सुचविलेला सामाजिक संस्थांचा मार्ग विचार करण्याजोगा आहे. आपल्या सारख्या साप्ताहिकांना देखील पुढाकार घेऊन बरेच काही करता येण्याजोगे आहे. आता मणूरकरांनी ह्या प्रश्नाला पुन्हा एकदा वाचा फोडलीच आहे. तेव्हा ह्या संबंधी आणखी काही करावे एवढीच इच्छा आहे. नवगणित हा प्रश्न आता घरोघरचा होऊन बसला आहे!

आणखी एक लेखकाने मांडलेला मुद्दा म्हणजे पुस्तकांसंबंधी. खरोखर खाजगी प्रकाशकांना ही पुस्तके काढायला बंदी का? उलट ते तर उत्कृष्ट पुस्तके तयार करू शकतील! पण असो, आपल्या मायबाप सरकारविषयी काय बोलणार! ग्रामीण भागातील हायस्कूल संबंधीचा गोंधळ तर काही विचारू नका!

एकंदरीत, 'क्रीडांगण' वगैरे काही उत्कृष्ट सदरे लिहिणाऱ्या मुकुंद मणूरकरांनी ह्याही विषयावर चांगल्या तऱ्हेने लिहून पुन्हा एकदा 'नवगणित' हा विषय जनतेसमोर सादर केला. ह्याबद्दल त्यांना धन्यवाद!

मोहन कर्वे, मुंबई

## खटकणारी दोन विधाने

५ जून, १९७३

आपल्या दि. २६ मेच्या अंकात महाड येथील श्री. घनःशाम तळवटकर यांच्या सत्काराची बातमी प्रसिद्ध झाली आहे. प्रा. बिवलकर यांनी बातमीपत्र चांगलेच रंगविले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद. पण त्यातील एक-दोन गोष्टी खटकणाऱ्या आहेत. पृष्ठ २२ वर 'समारंभानंतर गोड जेवण द्यायचे ठरले म्हणून गर्दी ओसरली नाही' असे विधान करण्यात आले आहे. हे एकंदर समारंभाशी सुसंगत नाही, जी गर्दी झाली होती ती श्री. तळवटकर यांच्या

पृष्ठ ६० वर


# फिडेल, चे आणि क्रांती

**ले. : अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

# श्रीगुरुजी

सत्तेपासून अलिप्त असणारा पण सत्तेवर अंकुश ठेवू शकणारा यतीवर्ग ही एक भारतीयांची राजकारणातली, समाजरचनेतली प्राचीन काळापासून चालत आलेली आवडती कल्पना आहे. या कल्पनेचा पुरस्कार अलिकडच्या काळात गांधीजींनी केलेला असला तरी ही कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात उतरविण्यासाठी कुणी पराकाष्ठेचे प्रयत्न केले असतील तर ते श्री. गोळवलकर गुरुजी यांनी. कॉंग्रेसचे लोकसेवक संघात रूपांतर व्हावे अशी गांधीजींची अखेरची इच्छा होती. हे लोकसेवक म्हणजे सूत कातत बसणारे कुणी निरुपद्रवी प्राणी राहावेत असे गांधीजींना खासच वाटत नव्हते. खेडोपाडी, जेथे कुठे अन्याय आणि अनाचार, हिंसा आणि अत्याचार यांची परिसीमा झाली असेल तेथे या लोकसेवकांनी धावून जावे, लोकांना प्रतिकाराचे शिक्षण द्यावे, उद्योगाला लावावे, 'शहाणे करून सोडावे! सकळ जन' अशीच त्यांची या लोकसेवकांकडून अपेक्षा होती. म्हणून सत्ता पायाशी लोळण घेत असतानाही शेवटी त्यांनी नौआखलीचा मार्ग पत्करला, दुरून सत्तेवर अंकुश चालवण्याचा प्रयत्न केला. पण कॉंग्रेसची वाढ प्रथमपासून अशी होत आलेली होती, की सत्तास्थानांपासून दूर राहणे बहुसंख्य कॉंग्रेसजनांच्या प्रवृतीत बसणारे नव्हते. त्यामुळे गांधीजींचा लोकसेवक संघाचा आदर्श कागदावरच राहिला, कुणाही प्रथम श्रेणीच्या कॉंग्रेसजनाने सत्ता सोडून लोकसेवकाचा कंटकाकीर्ण मार्ग स्वीकारला नाही. सत्तेच्या केंद्राकडे बहुसंख्य लहानथोर गांधीवादी इतक्या वेगाने धावत सुटले, की 'सेवा' हे शब्द लवकरच या वर्तुळात एक टवाळीचा विषय ठरला. विधायक कार्यकर्त्यांना उद्देशून वल्लभभाईंनीच म्हटले होते, की या सर्व गांधीजींच्या विधवा आहेत. नेहरूंना तर या गांधी कल्पनेचे वल्लभभाईंइतकेही आकर्षण नव्हते. त्यामुळे सर्व सेवा संघ किंवा इतर सर्वोदयी संस्था यांच्या रूपाने गांधीप्रणित लोकसेवक संघाचे काही पुसटते दर्शन घडत असले तरी प्रत्यक्षात गांधीजींबरोबरच गांधीजींच्या लोकसेवक संघाचे अस्तित्वही संपले असे मानावयास हरकत नाही.

श्रीगुरुजींशिवाय अखिल भारतात अन्य कुणीही या आदर्शाच्या जवळपास पोचणारी व्यापक आणि मजबूत सेवा संघटना आजवर उभी करू शकलेला नाही. या दृष्टीने वरवर पाहता वेगवेगळ्या वाटणाऱ्या या दोन प्रवाहांचा संगम घडून येण्यासारखा आहे. गुरूजींनी गांधीजींच्या कल्पनेचे उघडउघडच स्वागत केलेले होते. हळूहळू

श्रेष्ठ कर्तृत्वाची माणसे संघकार्यातून मोकळी करून समाजजीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात स्वतंत्र कार्य करण्यासाठी सोडून दिलेली होती. या व्यक्तींवर व त्यांनी उभारलेल्या कार्यावर गुरूजींची संघविचाराची छाप अवश्य होती. पण यापलिकडे वर्चस्व गाजविण्याची, सत्ता लादण्याची धडपड संघाकडून होत होती हा आरोप ज्यांना संघविद्येतला ओनामाही कळला नाही असेच महाभाग करू शकतात. श्यामाप्रसादांना त्यांनी जनसंघ स्थापनेसाठी प्रवृत्त केले, काही कार्यकर्ते त्यांना दिले. यापलिकडे सत्तेच्या उलाढालीत त्यांना फारसा रस नव्हता. उलट पंजाबमधील भाषिक प्रश्न, चातुर्वण्य, (भाषावार प्रांतरचना) इत्यादी विषयांवर त्यांनी अशा भूमिका प्रकटपणे घेतल्या की जनसंघ अडचणीतच यावा. पण गुरुजींना याची पर्वा नव्हती. कारण कुठलीही राष्ट्रवादी सत्ता त्यांना मान्य होती. राष्ट्रजीवनाचा एकूण स्तर आपल्या शाखोपशाखांद्वारे उंचावणं हे त्यांनी आपले जीवनकार्य मानले होते व यातूनच एक समर्थ, शक्तिसपन्न भारत उभा राहील, प्राचीन वैभव या भूमीला लाभेल अशी त्यांची श्रद्धा होती. सत्ता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हाती घेऊन हे साधण्यापेक्षा सत्तेवर संस्कारसंपन्न व्यक्ती व गट आणून आपण आर्य चाणक्याप्रमाणे किंवा विद्यारण्यांप्रमाणे निवृत्त व्हावे, एकेका जबाबदारीतून मुक्त व्हावे असा त्यांचा स्वाभाविक कल होता. संघस्वयंसेवकांमध्येही अशाच स्वरूपाचे संस्कार दैनंदिन शाखांतून होत होते.'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते' सत्ताभाव जागृत करणारी ही संघप्रार्थना नाही. गांधीजींप्रमाणेच 'नाहं कामये राज्यम्' या प्रवृत्तीचे गुरुजी एक यती होते. यतीवर्गाने निष्काम कर्माचरणाने समाजधारणा करावी, हा प्राचीन भारतीय आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होता. हा आदर्श गुरुजींच्या उत्तराधिकाऱ्यांनी जोपासला, वाढवला तर गांधीजींना जे जमले नाही, परिस्थितीमुळे त्यांना जे अपयश आले ते धुवून काढण्याची एक ऐतिहासिक संधी संघाला लाभेल, जगासमोर दंडहीन समाजक्रांतीचा एक नवाच प्रयोग उभा राहील.

हा विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आहे. राजसत्तेच्या विस्ताराची हद्द झाली आहे. सामाजिक आणि सांस्कृतिकच केवळ नव्हे, वैयक्तिक जीवनाचे नियंत्रणही राजसत्तेकडे गेलेले आहे, आपणहून लोक ही पुरोगामी गुलामगिरी स्वीकारीत आहेत. जयप्रकाश या प्रवृत्तीला समाजवाद न म्हणता राज्यवाद म्हणतात. विनोबांनी हा रावण वाढतो आहे अशी भीती व्यक्त केली आहे. हा एक गांधीजी आणि गुरुजी यांच्या परंपरेतील समान धागा आहे. हा जोडला गेला तर आज बोकाळलेले नैराश्य आणि वैफल्य काही प्रमाणात नक्कीच दूर होऊ शकेल. श्रीगुरुजींना यापेक्षा अधिक अर्थपूर्ण श्रद्धांजली कोणती असू शकते ?

श्री. ग. मा.



एक अनोखा अनुभव

# देवरूख श्रमदान शिबीर

मेघा खानोलकर

रत्नागिरी जिल्ह्यात देवरूख. खेडसचं.

देवरूखपासून एक मैलावर २४ एकर शेतजमीन. 'मातृमंदिर' संस्थेची ही धनदौलत. प्रसूतिगृह, अनाथाश्रम–संस्थेचा परिवार पुरेसा विस्तारलेला आणि त्या परिवाराची पोटापाण्याची सोय म्हणून ही शेतजमीन.

एरव्ही असं एकटं एकटं असतं हे शेत – तिथल्या दोन-चार श्रमजीवींसह. पण १२ मे च्या संध्याकाळी खूप फुलून आला होता हा माळ. ८०–८५ बुद्धिजीवींनी. हो, बुद्धिजीवीच शहरातल्या त्या संस्कृतीतून आणि संस्कृतीसाठी पुढारलेल्या सुशिक्षित वर्गातील ८०–८५ जण या इथे उतरले होते. तेही सर्व विद्यार्थी. तरुण. तारुण्याचा सगळा जोश, सगळ्या उर्मी, सगळ्या आशा-आकांक्षा घेऊन आलेले. पदवीधर होऊन लोकमान्य पदवीसकट विद्यापीठातून बाहेर पडण्याच्या मार्गावर असलेले हे मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी. त्यांना माहीत होतं, आपण जाणार आहोत, तिथं गोडधोड मिळणार नाही. सुंदर पलंग, सुंदर बाथरूम्स नाहीत. तिथे खूप श्रमायचंय, खूप ऐकायचंय आणि बोलायचही. या सगळ्यातून परतताना एक आयुष्यभर जपण्याजोगा अनुभव, आचरण्याजोगे विचार घेऊन यायचंय्.

राष्ट्रसेवा दलाचे अनुभवी संयोजक होते. दलाची आजवर यशस्वी ठरलेली शिबिरपद्धती त्यांच्याजवळ होती. ८०–८५ जणांचे सरसावलेले हात होते. मातृमंदिरच्या नारकर पती-पत्नींची उत्कट माया होती. विद्यापीठाची आर्थिक मदत होती. त्यांतून निसर्गाच्या कुशीतलाच प्रदेश. लालभडक मातीच्या हाका ऐकू येण्याइतका प्रदेश. शिबीराला आणखी काय हवं असतं ?

रोज सकाळी ५ ला उठायचं, प्रार्थना. २॥–३ तास सकाळच्या स्वच्छ वातावरणात श्रम, नाश्ता. जेवण, विश्रांतीनंतर दुपारी ३ च्या सुमारास बौद्धीक, हानंतरच पुन्हा श्रम, संध्याकाळी ६ पर्यंत, विश्रांति, जेवण आणि विविध कार्यक्रम. या सगळ्या आखीव दिनचर्येतसुद्धा रोजचं एक आगळं स्वतंत्र नाविन्य प्रत्येकालाच जाणवत होतं. अगदी सकाळच्या प्रार्थनेपासून सुरुवात व्हायची. 'मानव तितुका एकच आहे. नीच न कोणी, उच्च न कोणी '—यातले सगळे भाव समजून उमजून गाणाऱ्यांच्या चेहेऱ्यांवर पाहिले की पाहुणे–श्रोतेही हरखायचे. पुन्हा पुन्हा पाहूनही त्या स्वच्छ चेहेऱ्यांवर शहरी छटा त्यांना कुठे दिसलीच नसेल बहुधा!' 'तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून' गाताना सगळे स्फूर्तीने डबडबून निघायचे. आणि कुदळ फावडी घेऊन शेतांवर पळायचे. श्रमदानाच्या वेळेचे कितीतरी अबोल अनुभव तितक्याच मूकपणे जपण्यासारखे एकाच वेळी 'लवकर काम करा, लवकर काम करा, वेळ घालवू नका,' म्हणून जीव तोडून ओरडणारे कितीतरी नेते तिथे शेतावर जन्मायचे. घर-कॉलेज, कॉलेज-घर अशा मर्यादित विश्वात जिवापाड जपलेल्या हातापायांना फोड आले तरी उत्साह मावळायचा नाही. उलट एखादाच कुणी कामचुकार निघाला तर मित्रत्वाने तुटून पडायचे इतर सगळे आणि त्यालाही कुदळ उचलणं भाग पडायचं. वेळ संपल्याची शिट्टी ऐकल्यानंतरही बांध पूर्ण होईपर्यंत न हलणारे कित्येक होते, त्यातच सर्व काही आले. विहीरही जवळजवळ ५ फूट खोल खणून झाली. कडेकडेने स्वच्छ झरे फुटायचे तेव्हा साहजिकच जोश दुणावायचा आणि चिखलाने बरबटलेली ओंजळ ठिबकत्या धारेखाली धरली की पुन्हा हात सरसावून उठायचे. मग पुन्हा काम सुरू. अधिक जोषात, अधिक जोमात.

बौद्धिकसुद्धा चांगल्यापैकी झाली. यदुनाथजी थत्ते, सदानंद वर्दे, पुण्याचे देशपांडे अशी कळकळीने बोलणारी माणसं समोर असताना खरोखरच सगळे रस घेऊन ऐकायचे त्यातच एखादी मस्करी थोडीशी मजा – या सगळ्याने गोडी वाढायची. कॉलेजमध्ये भटकम्पंची करणारे ही लोकशाही-समाजवाद या गोष्टी सहज सोप्याने सांगितल्या की मन लावून ऐकायची, हा प्रत्येक वेळेचा अनुभव. हे सगळं वातावरण 'चलो बसाये नया नगर हम'सारख्या गीतांनी अधिक उमलायचं, अधिक फुलारायचं. 'भोजन-कमिटी' तर प्रसिद्ध पावली होती शिबीरात! वेळेवर, घरगुती नाश्ता-कधी साबुदाण्याची खिचडी, कधी पोहे, कधी शेंगदाण्याच्या आंबट गोड चटणीशी आदल्या रात्रीची भाकर. कधीच कुणाची तक्रार नव्हती: भोजनसुद्धा बेतशीर पण प्रेमानं वाढलेलं. कोणी एखादा महंमद अलि भरपूर भाताची सवय असलेला पण ठरवून दिलेल्या एक मुठी भातावर भागवून घ्यायचा. नाजूकसाच अशोक दुधानी – उठल्याबरोबर ब्रेडबटरसारख्या

ब्रेकफास्टची सवय असलेला पण ५॥। ला चहा फक्त घेऊन ८॥ पर्यंत काम करण्याची पद्धत फक्त चारच दिवसात त्याच्याही अंगवळणी पडली.

नाही म्हणायला सकाळी उठताना कित्येकांची अंगं दुखून यायची. बौद्धिकाच्याच वेळेस नेमकी एखाद्याला डुलकी लागायची. एखाद दुसरा वाद वरच्या आवाजापर्यंत चढायचा, पण हे सगळं पटकन् वितळून जाण्याइतकं शिबीराचं वातावरण जबरदस्त होतं. कोण कुठला असले प्रश्न कधी निघालेच नाहीत. 'एकात्मता', 'समाजवाद' असले शब्द न उच्चारताही ती सगळी गुणी तत्वं इथला प्रत्येक शिबिरार्थी जगत होता. हसत खेळत, गंभीर होत शिबिर जोम धरत होतं. पहिल्या आठवड्यातच ८२ जणांचं एक मोठं कुटुंब तयार झालं होतं. त्यात कुठेही शहरी सोपस्कार दिसत नव्हते. दुसऱ्याचं उष्टं पाणी पिताना, त्याच मातरलेल्या पाण्यानं चूळ भरताना, मातीने आपलं ताट घासायला किंवा रंगलेले कपडे जमतील तसे धुवायला कुणालाच अडचण पडत नव्हती. कुठलेही शिष्टाचार आड येत नव्हते.

१५ दिवस उलटून गेले होते. सर्वच आता खूप सरावले होते. इथल्या साधेपणाला, इथल्या मित्रत्वाला, इथली कुठलीच गोष्ट कथाकादंबरीत बसणारी नव्हती. प्रवासवर्णनातला निसर्ग, ग्रामीण कादंबऱ्यातली पात्रं यापेक्षा इथलं उघडं नागडं आकाश, रेखिव कडांचे डोंगर, स्वैपाक घरातली लक्ष्मी हे सगळे अधिक जीवंत होते. एकदा असंच यदुनाथजींचं भाषण चाललं होतं. विद्यार्थ्यांच्याच प्रश्नांना ते उत्तरं देत होते. इतक्यात धों धों वारा सुटला, पत्रे खडखडत

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन


---

राहिले, सगळा पाचोळा, सगळी झुडपं खळखळत सुटली होती. 'समाजवाद' म्हणजे काय? रघुनाथजी सांगत होते, पण ८२ च्या ८२ जणांचे डोळे त्या उघड्या माळाकडे होते. त्या धुरकटलेल्या डोंगरकडांकडे होते आणि यदुनाथजींनाही रहावलं नाही. त्यांनी आटोपतं घेतलं आणि एकजात सगळे धावत सुटले, वाऱ्याच्या दिशेनं. एअर-कंडिशन्ड बेडरुममध्ये झोपणारेही काही त्यात होते, हे कोणाला सांगूनही खरं वाटलं नसतं.

कॅम्पचे शेवटचे काही दिवस सर्व्हेसाठी होते. दोन-तीन ग्रूप्स करून आसपासच्या वाड्यांमध्ये पाठवलं होतं. कुणी वैश्यवाडीत, कुणी गवळीवाडीत, काही बौद्धवाडीत. दोन मैलांवर दवाखाना, गावातली शाळा, सरकारी रजिस्टरपुरती, महारांना परवानगी बैठकीच्या खोलीपुरती, बौद्धवाडीतल्या २० फूट खोल विहीरीत पावफूट पाणीही नाही, – प्रत्येकाला उत्तरं ऐकताना आतल्या आत जाणवत होतं. 'काय करावं' चा प्रश्न मोठमोठा होत जायचा. प्रत्येक घरातून 'ही माहिती घेऊन काय करणार तुम्ही पोरांनो?' असा प्रश्न कानावर पडला की हादरत होता प्रत्येकजण. मात्र आज माझ्याकडे उत्तर नसलं, तरी उद्या ना परवा मी ते माझ्या कृतीतूनच यांच्यापुढे ठेवीन.' एवढं मनात आणलं प्रत्येकानं तरी खूप होतं. प्रत्येकाने उत्तर म्हणून एक वाडी उभारून दाखविली. नव्याने तरी शिबीर सार्थकी लागणार!

शिबीराचे २५ दिवस कुठल्या कुठे गेले. 'इव्हॅल्युएशन'सारखे औपचारिक प्रकारही झाले पण तरी शिबिराच्या शेवटच्या दिवसापर्यंत शिबिरातला जीवंतपणा ताजा राहिला होता. सर्व्हेपासून ते समारोपाच्या भाषणांपर्यंत कुठलीच गोष्ट कागदी वाटली नाही. रात्री झोपण्यापूर्वीची गाणी काय, पहाटेची प्रार्थना काय किंवा जेवतानाचे श्लोक काय सगळासगळ्यात एक मनसोक्त रसरशीतपणा होता. प्रत्येकालाच तो जाणवत होता. त्याने सगळे भारावले होते.

जाताना विचारत होते पुन्हा पुन्हा ...'पुढच्या वर्षी होणार ना शिबीर?' वर्षाचे १२ महिने आर्थिक, सामाजिक दुष्काळ असलेल्या या छोट्या छोट्या खेड्यातून श्रम करायला काही जण मनापासून तयार होते. मुंबईत गेल्यानंतरही हा एवढा मोठा ग्रूप—उत्साही तरुणांचा खूप काही करत राहील, अशी आशा मग भाऊ तारे सेकरांसारख्याला वाटली, तर त्यात नवल नव्हतं. मुंबई विद्यापिठाचं सेवादलाच्या सहकार्याने घेतलेलं हे शिबीर खरोखरच तेवढं यश घेऊन गेलं होतं! ●

---

जगमान्य चित्रकार पाब्लो पिकासो नुकतेच मृत्यू पावले. त्यावेळी जगातील सगळ्या वृत्तपत्रांनी आवर्जून मृत्युलेख लिहिले. पिकासोच्या कलाचातुर्याचे कौतुक त्यांनी अहमहमिकेने केले. अपवाद होता फक्त एका वृत्तपत्राचा. 'तास' या अधिकृत सोव्हिएत मुखपत्रात या युगप्रवर्तक चित्रकाराचे वर्णन 'जगभर माहीत असलेला स्पॅनिश चित्रकार' एवढेच केलेले होते.

## सन्माननीय न्यायमूर्ती श्री. भावे
## अध्यक्ष
## मध्यप्रदेश माजी मुख्य मंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा चौकशी समिती भोपाळ
## भोपाळ (म. प्र.)

स. न. वि. वि.

गेल्याच महिन्यात वृत्त पत्रातून वाचण्यात आले की, मध्य प्रदेशचे माजी मुख्य मंत्री श्री. डी. पी. मिश्रा यांनी त्यांच्या मंत्री पदाच्या कालावधीत काय स्वार्थ साधला, कोणते गैरव्यवहार केले याची चौकशी करून त्याचा अहवाल सादर करण्याची जबाबदारी आपणावर टाकण्यात आली आहे.

मिश्रा यांचे नाव ऐकले की दिल्लीपासून गल्लीपर्यंत गुलाबी चणा प्रकरण सर्वांच्याच नज़रेसमोर येते आणि प्रामुख्याने मध्यप्रदेश सरकारने आपली जी नियुक्ती केली आहे ती देखील गुलाबी चण्याच्याच प्रकरणात नेमके काय घडले याचे सत्य शोधण्यासाठीच. त्या प्रकरणाचे धागेदोरे फक्त मध्यप्रदेशातच आहेत असे नव्हे तर महाराष्ट्रांतही आणि विशेषतः नासिक जिल्ह्यात आहे, याची कल्पना आपणास देण्यासाठीच ह्या अनावृत्त पत्राचे प्रयोजन.

' मिश्रा ' फक्त मध्यप्रदेशातच आहेत असे नव्हे तर त्यांची दोस्त (समानशीले व्यसनेषु सख्यम्) मंडळी कॉंग्रेसी राज्यात सर्वत्र आहेत. मिश्रा ही व्यक्ती आहे असे आम्ही मानत नाही, ती प्रवृत्तीच बनली असल्याने कोणाकोणाची, किती काळ चौकशी न्यायप्रिय सरकारे करू शकतील असा संशय वाटतो. मध्यप्रदेशातील मिश्रांना महाराष्ट्रातील ' मिश्रांची ' जोड–लाभली आहे आणि संमिश्र गुंतावळ्याचे ' चणा स्कॅंडल ' निर्माण झाले. मध्यप्रदेश व महाराष्ट्र हे नेबर स्टेटस् (Neighbour States) आहेत म्हणून ढवळ्या शेजारी पवळा बांधला,

वाण नाही तर गुण लागला या नात्याने चणा प्रकरणात ते खऱ्या अर्थाने (नेबर-स्टेटस Neighbour-States) बनले आहेत. दुसरे असे की ठगाला महाठग– पर्वताचा वळसा घालून मिळतात अशी इसापकथा आहे, तसेच मिश्रांना वर्तक– हिरे, सोनवणे, भावसार असे आमच्या राज्यातले येवून मिळाले आहेत.

गुलाबी चणा म्हणजे खाद्योपयोगी हरभऱ्याची डाळ. जीवनोपयोगी वस्तूत हरभऱ्याच्या डाळीचा समावेश होतो. हरभऱ्याचे उत्पादन मध्यप्रदेशात विपुल होते. पर्यायाने मिलमधून डाळीचेही. ही डाळ गोरगरीब आणि मध्यम वर्गीयांना वाजवी भावात उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारने–पुरवठा खात्याने मध्यप्रदेशातून खरेदी करण्याचे ठरविले आणि खरेदी झालेला माल जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघामार्फत तालुका संघ व विविध सहकारी संस्था-मार्फत जनतेपर्यंत पोहोचवावा अशी (दिखावू कल्याणकारक) योजना होती. प्रत्यक्षात मात्र गुलाबी चणा महा-राष्ट्रात येवून तो साठेबाज व्यापा-ऱ्यांच्या गोदामात गेला आणि लाखो रुपये मंत्र्यापासून संत्र्यापर्यंतच्या खिशात गेले. कसे गेले त्याचा तपशील पुढील-प्रमाणे.–

(अर्थात) मिश्रांची चौकशी पी. सी. सेठी, मुख्यमंत्री झाल्यावर होत आहे. जो पर्यंत आमच्याकडेही जुने जाऊन नवे कुणी तरी 'प्रकाशचंद्र सेठी' येत नाहीत तोवर मंत्री-उपमंत्री, खरेदी विक्री संघाचे अध्वर्यु वगैरेंची चौकशी होणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. असो.

हे प्रकरण १९६६–६७ चे आहे. म्हणजेच ६ वर्षांपूर्वीचे. त्यावेळी वृत्त पत्रांतून या गुलाबी चण्याच्या भानगडी-वर प्रकाश झोत टाकणाऱ्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या पण विरोधकांच्या मागे 'पेपरवाले' आहेत तर आमच्या मागे 'जनता' असे मानणारे मंत्री पत्रकारांची केव्हाच 'रद्दी' करतात हे सर्वज्ञात आहेच. पण आता आपली नियुक्ती उशीरा का होईना–झाल्याने देर है अंधेर नही है' यावरचा विश्वास वाढला.

महाराष्ट्र सरकारची ही योजना जाहीर होताच नासिक जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ आणि मालेगाव तालुका शेतकी सहकारी संघ यांनी आपल्या संस्थेला गुलाबी चणा मध्य-प्रदेशातून आयात करण्याची परवानगी मागितली होती.

ही परवानगी ७५० टन आयात परवान्यासह पुरवठा खात्याने दिली सुद्धा. पण पुढे काय झाले? सर्व-सामान्य ग्राहकापर्यंत संघाच्या दुकाना-तून वाटला जाणारा गुलाबी चणा कोणत्याही संघाच्या दुकानांतून दिसलाच नाही. कारण संघाने हा परवाना १९ नोव्हेंबर, १९६६ ला एका साध्या पत्रान्वये नासिक रोडचे व्यापारी मेसर्स रामबगस मोहनलाल करवा आणि कंपनीला हस्तांतरीत केला.

व्यापारी वर्ग हा साठेबाज असतो, नफेखोर असतो असे मत शासनाकडून

अनेकदा व्यक्त केले जाते. या नफेखोरीपासून सामान्यांची पिळवणूक होऊ नये म्हणून सहकारी ग्राहक संस्था निर्माण झाल्या असे सहकाराचे 'जनक' सांगतात. मग सहकारी सेवेची 'जानकी' सर्व सामान्यांच्या रूपाने पदरात टाकण्याऐवजी तिची गाठ नफेखोर 'रावणांशी' बांधणाऱ्या संघाच्या चेअरमन-मॅनेजिंग डायरेक्टरची चौकशी झाली का? नाही. या पत्रात असे नमूद केले होते की, या परवान्यावर मिळणारा चणा मध्यप्रदेशातून नासिक रोडला आणण्याचा वहातूक खर्च श्री. करवा यांनी करायचा व खरेदीसाठी रक्कमही त्यांनी गुंतवावयाची. परवाना किंमतीलाच हा चणा संघाने श्री. करवा यांना विकायचा. मग त्यात नफा होवो अगर तोटा. त्याला श्री. करवा हेच जबाबदार. मात्र संपूर्ण व्यवहारावर संघाला (अवघी) एक टक्का आडत श्री. करवा यांनी द्यायची.

परवान्याद्वारे चणा मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीच्या मार्फत फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या भोपाळ आणि नरसिंगपूर गोदामांतून आणला गेला. परवाना जर संघाच्या नावाचा होता तर त्या पदाधिकाऱ्यांना मुळात खाजगी व्यापाऱ्यांशी अशा तऱ्हेने संधान बांधायचे कारण काय? खाजगी व्यापाऱ्यांना परवाने द्यायचे नाहीत, असे जर सरकारी धोरण होते तर राज्यपातळीवरच्या 'पॉलिसी'चा भंग करणाऱ्या संघाच्या पदाधिकाऱ्यांवर सरकारने काय कारवाई केली? काहीही नाही. कारण उघड आहे. 'चण्यामाजी काळेगोरे काय – निवडावे निवडणारे? सहकारी संघाच्या परवान्यावर चणा खरेदीसाठी गेले कोण? नासिकचे 'दाल किंग' माधवसिंग दालवाला (परदेशी) आणि झुंबरलाल करवा, परवान्याच्या मूळ हेतूची ही केवढी परवड? यांनी पैसा गुंतवला.

७५० टन गुलाबी चणा उपरोक्त दोन गोदामांतून ३३ रेल्वे रशिदिद्वारे वॅगनमधून पाठवावयाचे ठरले. आता पैसा गुंतवला करवा कंपनीने आणि रशिदि मात्र सहकारी संघाच्या नावावर. याचे कारण म्हणजे परवाना सहकारी संघाच्या नावावर होता.

रशिदी जेव्हा सहकारी संघाकडे आल्या तेव्हा त्याचेवर हा माल करवा कंपनीला द्यावा अशी एंडोरस्मेंट मारून त्या रशिदि करवांच्या हवाली करण्यात आल्या. (अवघ्या एक टक्का आडतीसाठी संघाने सहकारी चळवळीची चिता पेटविली काय? नाही. टक्केवारी पुढे ओघाने येईलच) ३३ रेल्वे रशिदिपैकी २८ रेल्वे रशिदि (६३५ टनाच्या करवांना केवळ एंडॉरस्मेंटने दिल्या. याचे सहकारी संघाकडे लेखी करारपत्र कोणतेही नाही. सरकारला फसवावयाचे व जनतेच्या तोंडचा घास काढण्यासाठी करारपत्राची गरज का असते? ह्या संपूर्ण मालाच्या व्यवहारात अर्थात पूर्ण रक्कम श्री. करवांनीच गुंतविली होती. एक टक्का अडतीनुसार करवांनी संघाला रु. ८,८७८–२५ पै. (आठ हजार आठशे अठ्ठयाहत्तर, पैसे पंचवीस मात्र) रक्कम

देणे होती. ६३५ टनाचा सौदा 'सुविहित पार पडला. पण पुढे मात्र सहकारी संघाने खाजगी व्यापाऱ्याशी (करवा यांचेशी), सहकार नाकारला आणि उर्वरित १३५ टनाला टांग मारली. या मालाच्या पाच रशिदि सहकारी संघाने परस्पर रेल्वेला दिल्या आणि माल ताब्यात घेतला. (याची पूर्ण खरेदीची रक्कम वहातूक खर्च करवांनीच भरला होता.) या व्यवहारात करवांची एक लाख पंचेचाळीस हजार चारशे पंचाहत्तर (रु. १,४५,४७५-००) एवढी रक्कम अडकून पडली. याचा सरळ अर्थ असा की, श्री. करवांनी या व्यवहारात जवळ जवळ रु. ९,७२,८६०-०० इतकी प्रचंड रक्कम गुंतविली होती. एक प्रसिद्ध व्यापारी जेव्हा एवढी रक्कम गुंतवितो, वर आणिक एक टक्का आडतही देतो तो काय वेडा म्हणून? किती फायदा मिळाला असेल याची तुम्हा-आम्हाला कल्पनाही येत नाही. आणि एवढ्या प्रचंड फायद्याचे जे मूळ कारण सहकारी संघाला मिळालेला परवाना तो केवळ एक टक्का अडतीवर करवांना देणारे सहकार महर्षी दुधखुळे आहेत काय? पडद्यामागची टक्केवारी शोधण्याची गरज महाराष्ट्र सरकारला जेव्हा भासत नाही तेव्हा सचिवालयाचे पातळीवरच्या झारीतला शुक्राचार्य कोण हे सर्व जिल्हा जाणतो. उघडपणे जे बोलले जाते, ते मुख्यमंत्र्यांच्या कानावर गेल्या ७ वर्षात कसे जात नाही; याचेच आश्चर्य वाटते.

सहकारी संघाच्या परवान्यावर जो गुलाबी चणा श्री. करवांनी खरेदी केला त्याची किंमत रु. १२६५ टन (सरकारी) होती आणि विक्री झाली १६५० रु. टन या भावाने. याचा सरळ अर्थ की (१३५ टनाव्यतिरिक्त) श्री. करवा यांना या व्यवहारात रु. ९,७२,८६०-०० गुंतवून रु. २,५०,२५०-०० चा फायदा झाला. फक्त आठ-साडेआठ हजाराच्या अडतीवर सहकार महर्षी आपला परवाना खाजगी व्यापाऱ्याला देऊन त्याला एवढा प्रचंड नफा खाऊ देतील हे पटत नाही. या नफ्यात निश्चितपणे वाटेकरी (आणि सहकाराचे वाटमारी) आहेत. हे कोण? शोधा म्हणजे सापडेल!!

६२५ टन गुलाबी चणा १० रेल्वे रशिदीद्वारे भोपाळ आणि नरसिंगपूर येथून मालेगाव सहकारी संघाला पाठविण्यात आलेल्या मालाचा तपशील या ठिकाणी दिलेला चांगला असे वाटते. दि. २३-१२-१९६६ रोजी ६ रेल्वे रशिदीतून (क्र. ८४८०९८-९९, ६५६४०३-०४-०५) वॅगन क्र. जी. आर. ७६८५१, एन. आर. २९०२१, सी. आर. १७८२१, एन्. आर. २७०२५, सी. आर. ५६८२१, इ. आर. २१०४३) ने अनुक्रमे २४, २३, १४, २३, २३, २३, टन गुलाबी चणा पाठविण्यात आला होता व संघाला आलेल्या रशिदि ३०-१२ ६६ ला करवांना देण्यात आल्या होत्या. असे आहे हे आपल्या 'गुलाबी चण्याचे गुलाबी कोडे'

आपली जनता

• • •

## बुधवार दिनांक ३० मे
## स्थळ : लजपतराय भवन, पुणे

# शिबीरातलं अखेरचं चर्चासत्र

मृणालीनी ढवळे

बुधवार दिनांक ३० मे. सकाळी नऊचा सुमार. लजपतराय भवनाच्या दुसऱ्या मजल्यावर गडबड धावपळ सुरू होती. पण त्या गडबड धांदलीतदेखील एक प्रकारची शिस्त होती आणि तरीही नेहमीसारखा समारंभाचा औपचारिकपणा जाणवत नव्हता. अगदी वेगळ्याच प्रकारचा समारंभ होता तो ! साहजिकच होते ते. कारण एका अगदी वेगळ्याच स्वरूपाच्या शिबिरातलं अखेरचं चर्चासत्र होते ते !

विद्यार्थी सहाय्यक समिती आणि इन्व्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांच्या वतीनं हे शिबिर पुण्यात आयोजित केले होते. १७ ते २२ वर्षांच्या मुलींसाठी हे शिबिर होते आणि ते पंधरा दिवस चालले होते. महाराष्ट्रातल्या गावोगावच्या चाळीस मुली शिबिराला आल्या होत्या. ३० मे रोजी मुलींनीच शिबिराचा आढावा घेतला आणि त्यावर चर्चा झाली.

या चर्चासत्राची सूत्रं सौ. इंदूताई टिळक यांच्याकडे होती. याशिवाय डॉ. महाबळ, फादर लेदर्ले, श्री. भय्यासाहेब वखले आणि 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांनी या चर्चेत भाग घेतला.

विद्यार्थी सहाय्यक समितीचे पदाधिकारी डॉ. अच्युतराव आपटे यांनी शिबिराचे उद्दिष्ट सांगून पाहुण्यांची ओळख करून दिली. शिबिरांतील व्यवस्थेच्या सोयीसाठी मुलींचे पाच गट केले होते. या गटांच्या प्रमुखांनी आपल्या गटाची प्रतिक्रिया सांगायची आणि त्यावर पाहुण्यांनी प्रश्न विचारून जास्त माहिती काढून घ्यायची असे या समारंभाचे स्वरूप होते.

अरुणा गटांतल्या मुली या शिबिराला आल्या होत्या त्या काहीतरी नवीन शिकण्यासाठी, सामाजिक कार्याची माहिती करून घेण्यासाठी. काही 'चेंज' म्हणून आल्या होत्या तर काही 'होस्टेल लाईफ' एन्जॉय करायला आल्या होत्या. येण्याचा उद्देश काहीही असला तरी शिबिरांतल्या एकूण कार्यक्रमावर सगळ्याजणी खूष होत्या. विशेषतः शिबिराच्या संयोजिका सौ. निर्मलाताई पुरंदरे आणि अच्युतकाका यांचा मोकळा

स्वभाव सगळ्यांना पसंत पडला.

सामाजिक कार्याची माहिती देऊन आणि कार्यक्रम आखून देऊन निर्मलाताईंनी 'बीजं' रोवली होती.' तर 'जेवतानासुद्धा चर्चा करून अच्युतकाकांनी विचारशक्ती वाढवली' होती.

आपण आणि आपलं घर याच्या-पलीकडचा मोठा समाज त्यांना या शिबिरामुळेच समजला होता. वक्तशीर-पणा, व्यवस्थितपणा आणि शिस्त लागली होती. कोणतंही काम करताना कमीपणा वाटेनासा झाला होता.

अरुणा गटाची ही प्रतिक्रिया ऐकून डॉ. महाबळ यांनी मुलींना डिवचलं, 'हे जे तुम्ही इथे आत्मसात् केलंत ते काही टिकाऊ नाही. चार-दोन महि-न्यांतच तुम्ही ते विसराल.'

एकजण ताडकन् उभी राहिली,' छे, छे, विसरू कशा ? निदान हिंदू स्त्रीच्या कायद्याबद्दल मिळालेली माहिती विसर-णार नाही. शिवाय हुंडा पद्धति बंद करण्याला तर हातभार लावणार आहोत आम्ही.'

'जो हुंडा घेईल त्याच्याशी लग्न करणार नाही असं ठरवलंय.'

'मुलीकडूनच हुंडा का घ्यायचा ? मुलाकडूनही घ्या ना.'

'हा काही व्यवहार नाही.'

हुंड्याच्या प्रश्नावर डॉ. महाबळ यांना माघार घ्यावी लागली. दरम्यान इतर मुलींनी मतं मांडलीच होती.

'कलेचं शिक्षण कधी विसरता येत नाही.'

'आपल्यासाठी आणि इतरांसाठी काय करता येईल हे सांगायला इतरांची गरज भासणार नाही.'

'प्रत्येक गोष्टीतून काहीतरी शिकता येतंच. नाहीतर मग शिक्षण तरी कशाला घ्यायचं ?'

डॉ. महाबळ यांनी पवित्रा बदलला. त्यांनी विचारले,

'पण या शिबिरांत संस्कार कोणते घडले ? कोणत्या गुणांचा विकास झाला ?'

उत्तरं तयारच होती. 'दुबळेपणा कमी झाला. आत्मविश्वास आला. टीम-स्पिरिट निर्माण झालं. कोणतीही गोष्ट करताना ती करावी की करू नये याचा विचार करण्याचं सामर्थ्य आलं. अज्ञान आणि संकोच कमी झाला.'

हे सारे फायदे ऐकून 'आपणही या शिबिराला यावं' असं श्री. माजगाव-कर यांना वाटू लागलं.

सामाजिक कार्यासंबंधी बऱ्याच मुली बोलल्या पण त्यांची नेमकी कल्पना काय होती ते कुणीच सांगितलं नव्हतं. इंदुताईंनी याबद्दल विचारणा करताच दोनचार आवाज उठले, 'अनाथ मुलांना मदत करू, घरी येणाऱ्या निरक्षकांना शिकवू, मॉंटेसरी स्कूल काढू, घरातल्या मुलांना शिस्त लावू.'

सुनंदा गटातल्या काही मुली 'आई-वडिलांनी पाठवलं' म्हणून शिबिराला आल्या होत्या. तर काही 'मैत्रिणी आल्या' म्हणून आल्या होत्या. या मुलींच्या मनावर सुरुवातीला दडपण होतं. पण नंतर ते कमी झालं. शिबिरा-

मुळे 'आत्मविश्वास आला, संकोच गेला आणि काहीतरी करावं अशी स्फूर्ति मिळाली.' म्हणूनच तर ससून-भेटीत मुलींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. अनेक विषयांवरची अभ्याससत्रे आवडली पण त्यातही आरोग्यविषयक चर्चेनं संकोच आणि अज्ञान दूर झालं. 'सुजाणतेकडे' ह्या विषयावरील चर्चाही आवडली.

डॉ. महाबळ यांनी पुन्हा अडवले, 'सुजाणतेकडे? म्हणजे काय?'

'म्हणजे प्रत्येक घटनेमागची कारण परंपरा जाणता यायला पाहिजे. अज्ञाना-मुळे कित्येक घटना घडतात त्या टाळता येण्यासाठी सुजाणता हवी. याचा प्रारंभ लहान वयात करावयास हवा. लहान मुलाला खोटेपणाची शिकवण मोठ्या माणसांकडूनच मिळते. मग ही मुलं मोठी झाल्यावर त्यांना सुजाणता कशी येणार?'

या दोन्ही गटातल्या (आणि बाकीच्यादेखील) मुलींना 'सेल्फ इंट्रो-डक्शन', 'रोलप्ले' आणि संचलन हे तीन कार्यक्रम सर्वांत आवडले. कारण 'त्यातून प्रत्येकीचा स्वभाव कळला, एकमेकींची चांगली ओळख झाली, नाटकात काम करायला मिळालं आणि जबाबदारीनं कार्यक्रम पार पाडण्याचा आनंद मिळाला.'

माणिक गटाच्या मुलींनी शिबिरात जे 'आगळं वेगळं अनुभवल्याचा आनंद मिळवला' त्याचं बरंच श्रेय 'माणूस' च्या संपादकांना दिलं. कारण माणूस-मधली जाहिरात वाचून खूपजणी आल्या होत्या.

शिबिरातलं 'आगळं वेगळं' सांग-ताना या गटाची प्रमुख म्हणाली, 'शिबिरात आमच्यावर लेक्चर्सचा भडि-मार होईल असं वाटलं होतं. पण इथे झालेल्या चर्चेतून मूलभूत प्रश्नांची माहिती मिळाली.'

या मुलींना आत्मप्रत्ययाची नवी जाणीव शिबिरात झाली. कारण इतके दिवस आपले विचार मांडायची संधीच त्यांना मिळाली नाही. पण शिबिरात कळलं की आपल्याला विचार मांडता येतात, आपलं बोलणं कुणीतरी आस्थेनं ऐकतंय.' या सुखद विचारांनी मुलींच्या भोवतीचे कोश तुटले.

'शिबिरामुळे जी जबाबदारीची जाणीव निर्माण होते तिचा उपयोग फारसा करून घेतला जात नाही' अशी तक्रार श्री माजगावकर यांनी मांडली. पूर्वीच्या दोन शिबिरांचा अनुभव असाच असल्याचे त्यांनी सांगितले.

पण 'न बोलताच करून दाखवू' असे आश्वासन त्यांना मिळाले. 'हिवाळी शिबिराला आमच्या मैत्रिणींना पाठवू' अशीही ग्वाही देण्यात आली.

मुलामुलींचे शिबिर एकत्र असावे की नसावे या प्रश्नावर थोडा वाद झाला. 'मुलांबरोबर मोकळेपणानं वागता येणार नाही, पालक पाठवणार नाहीत' अशी धास्ती व्यक्त झाली. आणि शेवटी 'आधी मुलींचं एक आणि मग संमिश्र असं दुसरं शिबिर घ्यावं' अशी तोड सुचवण्यात आली.

मंगल गटातल्या मुलींनी 'जास्त ज्ञान मिळवायचा प्रयत्न करू' असा निर्धार

शिबिरात केला. शिबिरामुळ घरातलं काम कसं करावे याचे मार्गदर्शन झाले. शिवाजी हाऊसिंग सोसायटीत घरोघरी हिंडून लोकांना कॉफीपानाचं आमंत्रण देताना चांगले-वाईट अनुभव आले. पण त्यातून खूप शिकायला मिळाले.

शिबिरात चांगल्या सवयी लागल्या त्याचं श्रेय या मुलींनी निर्मलाताईंना दिलं. 'प्रत्येक गोष्ट व्यवस्थितपणे शिस्तीनं करायची सवय' कॅप्टन नांगरे (वसतीगृहाचे रेक्टर) यांनी लावली. छंदवर्गातून तर खूपच फायदा झाला. 'कचऱ्यातून कला' निर्माण करायची वृत्ती अंगी आली. शिबिर १५ दिवसां-ऐवजी एक महिन्याचे असावे अशी या मुलींनी सूचना मांडली.

या सूचनेला चंदा गटानं देखील पाठिंबा दिला. 'सगळ्यांच्या ओळखी होतात न होतात तोच जायची वेळ आली.' विशेषत: निर्मलाताई आणि अच्युतकाका यांना सोडून जायचे म्हणून मुली नाराज होत्या पण ताईंचा आणि काकांचा सहवास मिळवायचा असेल तर त्यांच्याच गटातल्या रेखासारखं करता येईल. ही रेखा प्रत्येक शिबि-राला न चुकता येते. आणि प्रत्येक वेळी 'काहीतरी नव' ज्ञान मिळवून जाते. अर्थात् सगळ्याच मुलींनी रेखाचं अनु-करण करायचं ठरवलं तर ताईंची आणि काकांची सारी व्यवस्था कोल-मडून पडेल.

चंदाच्या गटातल्या मुलींना शिबिरा-मुळे 'चाकोरीतून बाहेर पडल्यासारखं' वाटत होते. कारण मुली कितीही धीट असल्या तरी शाळा-कॉलेजात प्रत्येकीची दखल घेतली जात नाही. मग शंका विचारतानादेखील धास्ती वाटते. अशा मुलींना आत्मविश्वास वाटावा म्हणून शिबिरं हवीत.

मात्र शिबिरात खेड्यातल्या आणि शहरातल्या समसमान मुली असाव्या म्हणजे एकमेकींना समजून घेण्याचा प्रयत्न करता येईल असे चंदाच्या गटाचे मत होते. मुख्य म्हणजे शिबिर आणखी काही दिवस हवं असं त्यांना वाटत होतं.

'पण अशा प्रकारची शिबिरं कितीही काळ चालली तरी ती कमीच वाटतात.' असे अनुभवाचे बोल इंदूताईंनी समारोप करताना सांगितले. त्या म्हणाल्या, 'आपल्याला इतकं ज्ञान मिळवायचं असतं की त्यासाठी आयुष्यदेखील अपुरं पडतं.' मात्र समाजात मिसळण्यापूर्वी मुलींना जे मूलभूत ज्ञान मिळणे आव-श्यक असते ते शिबिरात मिळाले असल्याने खूप फायदा होईल.

पंधरा दिवसात आयुष्याची घडण होणे शक्य नाही. पण झालेल्या चर्चे-वरून खूप तयारी झाली असल्याचे मत व्यक्त करून इंदूताईंनी मुलींना 'आणखी प्रयत्न' करण्यास सुचविले.

सगळ्यांच्या वतीने आभार मान-ताना फादर लेदर्ले यांनी आशा व्यक्त केली की आणखी अशीच खूप शिबिरे भरावीत. पुढच्या शिबिरांनाही या मुलींनी यावे आणि इथल्या ज्ञानाने आई-वडिलांना चकित करून सोडावे.

तास-दीड तास रंगलेली ही चर्चा संपली. मुलींनी प्रतिक्रिया व्यक्त करताना हिरीरीने आपली बाजू मांडली होती. पण चर्चा संपल्यावर आवेश ओसरला. संध्याकाळी समारोप झाला की घरी परत जायचे या कल्पनेने सगळ्या अस्वस्थ मनाने समारोपाच्या तयारीला लागल्या. ● ● ●

# सो ल क ढी

## सरकर्णधार रे इलिंगवर्थ

भारतीय क्रिकेटसंघाने वेस्ट इंडीजचा पराभव केला. पाठोपाठ इंग्लंडमध्ये इंग्लिश संघावर मात केली. वेस्ट इंडीजचा कर्णधार गारफिल्ड सोबर्स आणि इंग्लंडचा कर्णधार रे इलिंगवर्थ हे काही कच्चे कर्णधार नव्हते. त्यातही इलिंगवर्थ हा कडवा, धंदेवाईक कर्णधार होता. आधीच्या काही वर्षांत त्याने नुसते विजयच संपादन केले होते. हे विजय संपादन करताना त्याच्या स्वतःच्या खेळात आश्चर्यकारक सुधारणा झाली होती. कर्णधार होण्यापूर्वी इलिंगवथला इंग्लिश संघात अढळ स्थान नव्हते. बेताची मंदगती ऑफ स्पिन गोलंदाजी आणि बेताची फलंदाजी, एवढेच भांडवल फार पुरले नसते. परंतु इलिंगवर्थची खेळाची समज पक्की होती. एक खेळाडू म्हणून कसोटी सामन्याचे वा इतर सामन्याचे विश्लेषण करताना त्याचा क्रिकेटचा सर्वांगीण अभ्यास सहज प्रत्ययाला यायचा. त्यामुळे इंग्लिश संघ सर्व ठिकाणी फजित होत असताना रे इलिंगवर्थची कर्णधार म्हणून निवड झाली. या निवडीबद्दल अनेकांनी नाके मुरडली; कोणाकोणाचे जेष्ठताक्रम डावलले गेले ते आग्रहाने सांगितले गेले. पण अण्णा इलिंगवर्थ नशीबवान कर्णधार ठरले. त्यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने अनेक बलाढ्य संघांचे 'वॉटर्लू' केले. त्यामुळे भारतासारख्या फुटकळ ताकदीच्या संघाने जेव्हा खुद्द इंग्लंडमध्येच इलिंगवर्थसाहेबांचा नक्षा उतरवला तेव्हा नाही म्हटले तरी साहेबमजकूर अस्वस्थ झालेच असणार, कारण त्यांची विजयी प्रतिमा खराब होऊ पाहात होती ना! आजकाल ही प्रतिमेची भानगड फार जपावी लागते. एकवेळ तुम्हाला स्वतःला कलंक लागला तरी चालेल; पण तुमची प्रतिमा कलंकित होता कामा नये.

हे सूत्र लक्षात घेऊन बहुधा इलिंगवर्थने भारत-पाकिस्तानचा दौरा करण्यास नकार दिला. कदाचित महिनोनमहिन्यांच्या विनाविश्रांती खेळामुळे तो बिचारा खरोखरच थकलेला असेल. इलिंगवर्थने दौऱ्यावर जाण्यास नकार दिल्यावर इंग्लंडच्या निवडसमितीने टोनी लुईसची कर्णधार म्हणून निवड केली. या दौऱ्यापूर्वी टोनी लुईस एकही कसोटी सामना खेळला नव्हता. भारताविरुद्ध टोनी लुईस कसोटीमालिका हरला तरी त्याच्या नेतृत्वाने जाणकारांनी यथोचित कौतुक केले होते. त्यामुळे सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असलेल्या न्यूझिलंड संघाविरुद्धच्या कसोटीमालिकेत कर्णधारपदाची जबाबदारी टोनी लुईसवरच टाकण्यात येईल

असा साऱ्यांचा अंदाज होता.

परंतु इंग्लिश निवडसमितीने ४१ वर्षांच्या रे इलिंगवर्थला कर्णधार केले आणि जेष्ठतेची बूज राखली. टोनी लुईसला इलिंगवर्थच्या हाताखाली बिगारीकाम करण्याची संधी दिलेली आहे.

श्रेष्ठतेचा मौलिक निकष मानून आम्ही अजितनाथ रे यांना सरन्यायाधीश केले तर ज्येष्ठतेचा मामुली निकष मानून इंग्लंडने रे इलिंगवर्थ यांना सरकर्णधार केले आहे. हे चित्र पाहा आणि ते चित्र पाहा. (अथवा पाहू नका). ◻

## सर नोएल कॉवर्ड

ब्रिटनमधील एक ज्येष्ठ कलावंत सर नोएल कॉवर्ड काही दिवसांपूर्वी मृत्यू पावले. त्यांच्या मृत्यूने, ब्रिटनमधील नाटचकला-करमणूक व्यवहाराचा पन्नास वर्षांचा एक साक्षी काळाच्या पडद्याआड गेला आहे. नाटककार, नट, दिग्दर्शक गीतलेखक, गायक, नर्तक, सूत्रधार आणि संवादपटू अशा विविध नात्यांनी नाटच व्यवहाराशी सर नोएल यांचा निकटचा संबंध होता. आपल्या अष्टपैलु कर्तृत्वाची अहंकारी जाणीव सर नोएलना होती. एके ठिकाणी ते म्हणतात : माझ्या अंगी अनेक गुण जन्मजातच आहेत; आणि एका गुणाच्या बदल्यात दुसऱ्या गुणाची हानी होऊ न न देता, या सगळ्या गुणांचा विकास कसा करावा, ही जीवनातील माझी सर्वांत मोठी समस्या आहे.

पन्नास वर्षांच्या अखंड यशस्वी कारकीर्दीमध्ये सर नोएलना अमाप प्रसिद्धी मिळाली; अफाट अर्थप्राप्ती झाली. उमरावी राहणीचा षोक आयुष्यभर त्यांनी केला. ब्रिटिश रसिकांच्या मनात आपली एक कलंदर नबाबी प्रतिमा त्यांनी ठसवली होती. आपण जगातील सर्वात आकर्षक पुरुष आहो, असे ते मानायचे. रिचर्ड बर्टन आणि फ्रँक सिनात्रा आपली बरोबरी करू शकत नाहीत; किंबहुना, मनात आणले असते तर रिचर्ड बर्टनला बाजूला सारून एलिझबेथ टेलरला आपण मोहवू शकलो असतो, असा त्यांचा दावा होता.

कुरेबाजपणा आणि फटकळपणा हे सर नोएल यांचे स्थायीभाव होते. नटनटचा, साहित्यिक, दिग्दर्शक, समीक्षक —सर नोएल कोणाचाही मुलाहिजा ठेवत नसत. त्यांच्या फटकळपणाचा प्रसाद राजे आठवे एडवर्ड यांनाही मिळाला होता. १९३६ साल. नोएल कॉवर्ड यांचा एक कार्यक्रम, राजेसाहेबांनी तिकिटे आगाऊ घेतली नव्हती. आयत्या वेळी कार्यक्रम पाहायची इच्छा त्यांना झाली. नोएल कॉवर्डनी राजेसाहेबांच्या तिकिटांची व्यवस्था केली. राजेसाहेब कार्यक्रमाला आले; पण पडद्यामागे जाऊन नोएल कॉवर्डना न भेटताच, कार्यक्रम पाहून, ते निघून गेले. नोएल कॉवर्डना हा आपला अपमान झाला असे वाटले. त्यांनी राजेसाहेबांना लिहिले : आपण इंग्लंडचे राजे असाल; पण मी देखील रंगभूमीचा राजा आहे; माझा उचित मान राखला गेला पाहिजे.

ब्रिटनमधील प्राप्तिकराच्या जाचक कायद्यामुळे सर नोएल पुढे स्वित्झलँड-मध्ये आणि अखेर वेस्ट इंडीजमधील जमेका बेटावर राहत असत. यामुळे ब्रिटिश शासन नाराज झाले. म्हणूनच नोएल कॉवर्डना त्यांच्या कला कामगिरी-करता मिळालेली 'सर' ही सन्मानाची किताबत फार उशिरा, म्हणजे १९७० मध्ये, वयाच्या सत्तराव्या वर्षी मिळाली.

## व्हिटलॅम दांपत्य

ऑस्ट्रेलियाचे नवे पंतप्रधान श्री व्हिटलॅम यांनी नुकतीच भारताला भेट दिली. यावेळी त्यांच्या पत्नीही समवेत होत्या. या भेटीतील छायाचित्रे पाहिली तर जी एक गोष्ट ठळकपणे नजरेत भरते ती म्हणजे व्हिटलॅम पतिपत्नींची ताडमाड उंची. श्री. व्हिटलॅम चांगले ६ फूट ४ इंच उंच आहेत; सौ. व्हिटलॅम यांची उंची ६ फूट २ इंच आहे. (त्यांचे तीन मुलगे आणि एक मुलगी यांची उंचीसुद्धा सहा फुटांपेक्षा अधिक आहे. एकूण हे कुटुंबच उंचाडे कुटुंब आहे.) श्री. व्हिटलॅम यांच्या उंचीमुळे त्यांच्या मापाचा पलंग खास तयार करावा लागेल असे वाटून तशी धावपळ सुरू झाली; इतक्यात टोंगाच्या राजेसाहेबांनी दिलेल्या भेटीच्या वेळी यांच्यासाठी तयार केलेल्या खास पलंगाचे स्मरण संबंधितांपैकी कोणाला तरी झाले आणि धावपळ थांबली. कारण टोंगाचे राजेसाहेब तर सहा फूट आठ इंच उंच होते. श्री. व्हिटलॅम हे ऑस्ट्रेलियातील गेल्या तेवीस वर्षातील पहिले मजूर पक्षीय पंतप्रधान आहेत. सत्तेवर आल्यापासून अगदी थोडक्या अवधीत त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची आणि शैलीची ओळख जगाला पटली अमेरिका आणि ब्रिटनचे भाबडे अनुयायी अशी ऑस्ट्रेलियाची आत्तापर्यंतची प्रतिमा होती. श्री. व्हिटलॅम यांच्या नेतृत्वाखाली, एक स्वतंत्र आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून ऑस्ट्रेलियाचा नवा चेहेरामोहोरा दिसू लागला आहे. व्हिएतनाममधील अमेरिकन हस्तक्षेपाला त्यांनी विरोध दर्शविला; चीनला मान्यता देऊन ऑस्ट्रेलियन राजदूत पेकिंगला पाठवला; इंग्लंडच्या राजपदाचा अर्थशून्य डौल संपुष्टात आणण्याचा विचार मांडला; ऑस्ट्रेलियातील मूळच्या श्वेतेतर लोकांना पुरेसे संरक्षण आणि सवलती देण्याची विस्तृत योजना कार्यान्वित केली.

सौ. व्हिटलॅमना स्वतःचे असे मंद तेजोवलय आहे. पंतप्रधानांची घरवाली म्हणून त्या मुक्या बाहुलीसारख्या मुळीच वावरत नाहीत. त्या सर्व विषयावर मोकळेपणाने बोलतात. एका बायकी नियतकालिकात त्या नियमाने एक सदर चालवतात. त्यात, सुचले ते लिहिले, अशा पद्धतीने त्या वाचकांशी संवाद करत असतात. लंडनमधील पत्रकारांबरोबर बातचीत करताना त्यातला एकजण मिस्किलपणे म्हणाला : राजकीय नेत्यांच्या बायका हा विनोदाला भला विषय असतो.

त्यावर सौ. व्हिटलॅम तत्परतेने उद्गारल्या : विनोदाचा विषय व्हायला व्यक्तिशः माझी काहीच हरकत नाही; अगदी कसलाही विषय न होण्यापेक्षा विनोदाचा तरी विषय झालेले बरे !

● ● ●

निळू दामले

# मराठवाड्याचा विकास

## एक मृगजळ ?

आफ्रिकन लोक काळे असतात, सिंह क्रूर असतो, कोल्हा लबाड असतो, ह्या विधानात कोणताही बदल अशक्य. आफ्रिकन गोरे, शेळपट सिंह ह्या गोष्टींची कल्पनाही अशक्य. ते एक गृहीत सत्य म्हणून स्वीकारले जाते. कोणी त्यावर विचारही करत नाही.

तशीच अवस्था मराठवाड्याची आहे. मराठवाडा म्हणजे मागासलेला. कधी विकास झालाच नाही, भविष्यात कधी विकास होणे शक्य नाही असा भाग म्हणजे मराठवाडा असे समीकरण होऊन बसले आहे. भोळा कोल्हा म्हटल्यावर ऐकणाऱ्याला जसे विचित्र वाटावे तसेच विकसित मराठवाडा ह्या शब्दांची कल्पनाच करणे अशक्य होते.

रोज मरे त्याला कोण रडे हीच अवस्था मराठवाड्याची झाली आहे.

१ जून रोजी औरंगाबाद शहरातल्या गुलमंडीवर असाच दररोज मरणाऱ्या मराठवाड्यासाठी आणखी एकदा रडण्याचा कार्यक्रम झाला. दगडाहून कठीण आणि बथ्थड अशा शासनाच्या बोडक्यावर आपली डोकी आपटण्याचा निष्फळ कार्यक्रम सर्व पक्षीय पातळीवर पार पडला. मराठवाडा मागासलेला आहे, त्याचा विकास करा असे सांगण्यासाठी झालेली मराठवाडा जनता विकास परिषदेची ही सभा.

ह्या सभेला थोडीशी पार्श्वभूमीही आहे. आजपर्यंत घोषणांच्या धूळफेकीशिवाय काहीही न करण्याच्या शासनाच्या धोरणाला कंटाळून गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, कॉ. चौधरी,




प्रा. प्रधान व अन्य मंडळींना शेवटचा रेटा म्हणून एका जनता विकास परिषदेची स्थापना केली. सर्व पक्षाच्या लोकांना त्यात घेण्याचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी सभा-बैठकांचे सत्र चालवले सरकारने लपवून ठेवलेली सर्व माहिती गोळा केली. अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांच्या मदतीने त्यावरून मराठवाड्याच्या एकंदर परिस्थितीचे एक स्पष्ट चित्र तयार केले. विकास योजनेचा एक आराखडा तयार केला. लोक जागृतीसाठी (शासनाला जागृत करण्याचा प्रयत्न म्हणजे कुंभकर्णाला हळुवार-लाडिक स्पर्श 'आपण कृपया उठाल का?' असे विचारण्याचाच प्रकार!) मोहिमा चालवल्या. दिल्ली वाऱ्या केल्या. आणि सर्वात शेवटला मार्ग म्हणून इंदिराबाईंच्या चरणी एक सविस्तर निवेदन अर्पण करण्याचा कार्यक्रम ९ मे रोजी पार पडला. (ह्या निवेदनाचा उपयोग काय होईल हे सांगणे कठीण आहे, मराठवाड्याच्या विकासाची पावले उचलली गेली तर बरे. नाही तर वसंतरावांना उचकवून आपले राजकारण साधण्यासाठी इंदिराबाई त्याचा उपयोग करून घ्यायच्या!)

एक गोष्ट निश्चित : मराठवाड्याची व्यथा केंद्राकडे व्यवस्थितपणे मांडण्यात जनता विकास परिषद यशस्वी झाली आहे.

खरोखरच ह्या निमित्ताने मराठवाड्यावर पद्धतशीरपणे झालेला अन्याय आणि शासनाची दिवाळखोर धोरणे महाराष्ट्राने समजून घेतली पाहिजेत. विशेषतः मुंबई पुण्याकडल्या लोकांनी.

पूर्वीच्या निझामाच्या राजवटीतले हे पाच जिल्हे निझामी खालसा झाल्यावर मुंबई राज्याला जोडण्यात आले. आणि नंतर महाराष्ट्र राज्यात त्यांना सामील करण्यात आले. ह्या 'गुरां'च्या दावण्या बदलल्या पण पुढे टाकण्यात आलेला कडबा आणि पाणी तेवढेच राहिले.

१९५५–५६ ते १९६८–६९ या काळात महाराष्ट्रात दरडोई उत्पन्नात २९२ रु. ते ६९२ रु. अशी ४०० रुपयांची वाढ झाली. पण त्याच काळात मराठवाड्यातल्या माणसाचे उत्पन्न

१७४ रु. ते ४२५ रु. म्हणजे केवळ २५१ रुपयांनी वाढले. अर्थात ही वाढ प्रत्यक्ष उत्पादन वाढीपेक्षा वस्तूंच्या वाढलेल्या किमतीमुळेच जास्त होती.

हैद्राबाद राज्यात असताना ४२ कोटींपैकी केवळ २·५ कोटीच रुपये मराठवाड्याच्या वाट्याला येत होते. महाराष्ट्रात येऊनही परिस्थितीत सुधारणा झाली नाही. पहिल्या योजनेत एकूण १०० कोटींपैकी केवळ २६ कोटी आणि तिसऱ्या योजनेत राज्याच्या ४३४·७३ कोटीच्या योजनेमध्ये फक्त, ७६·१७ कोटी रुपयेच मराठवाड्यावर खर्च करण्यात आले.

## उद्योगधंदे : दुर्लक्ष

औद्योगिकरणाबाबत महाराष्ट्र पुढे आहे असे म्हटले जाते. पण महाराष्ट्र म्हणजे केवळ मुंबई-पुणे-नासिक असा (उलटा) त्रिकोण असाच अर्थ होतो काय ?

खालील तक्त्यातील आकडे कशाचे निदर्शक आहेत ? मुंबई पुण्याकडील कारखान्यांची संख्या वाढली. पण मराठवाड्यात मात्र टक्केवारी ती कमीच झाली. १० वर्षांच्या काळात फक्त ७ कारखाने मराठवाड्यात वाढले.

गुंतवणुकीबाबतही तीच कथा ! मुंबई-पुण्यात १२४ कोटी आणि १९८ कोटींनी गुंतवणूक वाढते पण मराठवाड्यात मात्र केवळ १८·७३ कोटी रुपयांनीच गुंतवणूक वाढली.

तरीही 'मराठवाडा मागासलेला आहे, आम्ही मराठवाड्याचा विकास करायला कटिबद्ध आहोत, असे उद्गार मंत्रीगण कित्येक वर्षे काढतच आहेत !

मराठवाडा हा शेतीप्रधान विभाग. शेती किफायतशीर नाही. दुष्काळ दर ५ किंवा ३ वर्षांनी येतो. अशा परि-

पान ४३ वर

### उद्योगधंद्यांचा महाराष्ट्रातील विकास

| गाव | कारखान्यांची संख्या | | गुंतवणूक कोटी रुपयात | |
|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ | १९६१ | १९७१ |
| बृहन् मुंबई | ४०६४ (४९·३) | ५१०८ (४९·९) | उपलब्ध नाही | १८२५·५८ |
| मुंबई विभाग | १३२१ (१६·०) | १७८० (१७·४) | १५·३७ | १३९·३९ |
| पुणे विभाग | १७४४ (२१·२) | २०८९ (२०·४) | ४७·१३ | २४५·५९ |
| औरंगाबाद विभाग | २४१ (२·९) | २४८ (२·४) | ५·७२ | २४·४५ |
| महाराष्ट्र | ८२३३ (१००) | १०२४१ (१००) | उ. ना. | २३४५·७३ |

बॉम्बे बुक डेपो संचालित

माझ्या घरी माझी पुस्तके

# बॉम्बे बुक क्लब

सप्रेम नमस्कार वि० वि०

आज मराठीत अनेक नवीन नवीन पुस्तके निघत आहेत व आपल्यासारख्या ग्रंथप्रेमिकांना स्वतःच्या छोट्याशा वाचनालयात ती असावीत असे फार फार वाटते. परंतु योग्य त्या सोयींच्या अभावी आपणास ते शक्य होत नाही...

म्हणूनच पुस्तकांसंबंधी माहिती आणि आपण निवडलेली पुस्तके घरबसल्या आपणांस मिळावीत ह्या हेतूने **'बॉम्बे बुक डेपो'** तर्फे **'बॉम्बे बुक क्लब'** ही योजना सुरू होत आहे.

ह्या योजनेत समाविष्ट केलेली पुस्तके गुणवान असतीलच, शिवाय ती विविध विषयांवर असून त्यांतून निवड करण्यास भरपूर वाव मिळेल.

एक जुलैपासून **'बॉम्बे बुक क्लब'** सुरू होत असून आपण केव्हाही त्याचे सभासद होऊ शकता. सभासद होताच आपणांस प्रथितयश कविवर्य मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर व वसंत बापट ह्यांचे **'काव्यदर्शन'** (ज्यात त्यांची छायाचित्रे व स्वाक्षरी छापलेली आहेत) किंवा मराठीतील श्रेष्ठ आत्मचरित्र लक्ष्मीबाई टिळक यांचे **'स्मृतिचित्रे'** (साहित्य अकादमीने तयार केलेली संक्षिप्त आवृत्ती) यांपैकी एक पुस्तक भेट म्हणून ताबडतोब विनामूल्य पाठविण्यात येईल.

सोबत नियमांचे परिपत्रक असून सभासद झाल्यावर 'पुस्तकांची यादी' (अंदाजे २५० पुस्तके) पाठविण्यात येईल व जुलैपासून **'पुस्तक-पंढरी'** हे मासिक आपल्याला नियमित पाठविण्यात येईल.

तरी आपण रु ४० ची बचत करणाऱ्या ह्या **'बॉम्बे बुक क्लब'** योजनेचे लवकरच सभासद व्हाल अशी आशा आहे.

कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला

**पां० ना० कुमठा**

ता. क. १५ ऑगस्टपर्यंत सभासद होणाऱ्यांस प्रवेश फी रु. २ भरावी लागणार नाही.

## सभासद नियमावली

१. बॉम्बे बुक क्लबच्या सभासदांना प्रवेश फी * म्हणून रु. २ भरावे लागतील.

२. सभासद झाल्यावर दर महिना रु. १० मासिक वर्गणी भरावी लागेल. म्हणजेच नवीन सभासदास पहिल्या महिन्याला रु. १२ भरावे लागतील.

३. सभासदत्व कोणत्याही महिन्यापासून सुरू करता येईल.

४. पहिली वर्गणी पोहोचताच सभासदास त्याचे सभासद कार्ड व आपल्या पसंतीचे (दोहोंपैकी एक) भेट-पुस्तक विनामूल्य पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे बुक क्लबची माहिती देणारे '**पुस्तक-पंढरी**' हे मासिक पुढील महिन्यापासून पाठविण्यात येईल.

५. चार महिन्यांची वर्गणी रु. ४० मिळाल्यावर आमच्या यादीतून रु ४० ची पुस्तके सभासदांनी निवडावीत व ती आमच्या खर्चाने घरपोच मिळतील.

६. याचप्रमाणे आठ महिन्यांची वर्गणी रु. ८० पूर्ण झाल्यावर आणखी रु. ४० किंमतीची पुस्तके घरपोच मिळतील.

७. यापुढील चार महिन्यांची रु. ४० म्हणजे संपूर्ण वर्षाची रु. १२० वर्गणी पूर्ण आल्यावर रु. ४० ऐवजी रु. ५० ची पुस्तके सभासदाच्या निवडीनुसार घरपोच मिळतील.

८. वर्षअखेरीस तीन पुस्तकांतून एक भेट-पुस्तक त्यांना निवडता येईल व ते त्यांना विनामूल्य घरपोच मिळेल.

९. निवडलेल्या पुस्तकांची किंमत रु. १३० हून अधिक झाल्यास सभासदांनी आगाऊ रक्कम पाठवावी अथवा उरलेल्या रकमेची व्ही. पी. पाठविली जाईल.

१०. दर चार महिन्यांनी पुस्तके विकत घेत असताना कमी किंमतीची निवडल्यास उरलेली रक्कम पुढील चार महिन्यांच्या वर्गणीत जमा केली जाईल.

११. सभासदत्व पुढील वर्षी चालू ठेवल्यास नव्याने प्रवेश फी द्यावी लागणार नाही.

१२. सभासदत्वाचे एकूण रु. १२० हे वर्षाआधीही पुरे भरून योजनेचा संपूर्ण लाभ सभासदाला लगेच घेता येईल.

* १५ ऑगस्टपर्यंत सभासद होणाऱ्यांस प्रवेश फी रु. २ भरावी लागणार नाही.

१३. सभासदांनी वर्गणी, मनीऑर्डर, पोस्टल-ऑर्डर, बँक-ड्राफ्ट अथवा रोख रकमेने कृपया द्यावी. **मनीऑर्डर उभयपक्षी सोईची ठरेल.**

१४. सभासदास पुस्तके एकत्र हवी असल्यास वर्षअखेरीस एकत्र घेता येतील. परंतु पुस्तके वर्गणी संपल्यापासून सहा महिन्यांत घ्यावीत.

१५. या योजनेत उपलब्ध असलेल्या २५० पुस्तकांची यादी सभासदास पाठविण्यात येईल; त्याचप्रमाणे **'पुस्तक-पंढरी'** मासिकातून निवडण्याच्या नवीन पुस्तकांची यादी दर महिना प्रसिद्ध केली जाईल. ही यादी पाचजणांच्या तज्ज्ञ मंडळाने तयार केलेली असेल व सभासद ह्या यादीतून आपली निवड करू शकेल.

१६. ह्या यादीबाहेरील कोणतेही पुस्तक (क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त) हवे असल्यास त्याची वेगळी किंमत पडेल. सभासदांस खास सवलत म्हणून ही पुस्तके योजनेतील पुस्तके पाठविताना घरपोच मिळतील.

१७. यादीबाहेरील रु. २५ हून अधिक किंमतीची पुस्तके मागविल्यास ती ताबडतोब घरपोच पाठविली जातील.

वरील योजनेनुसार सभासदास रु १२० ऐवजी किमान रु. १६० किमतीचा लाभ होईल.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकांची किंमत | : | रु. १३० |
| भेट पुस्तके किमान | : | रु. १० |
| 'पुस्तक-पंढरी' वर्गणी | : | रु. ५ |
| पाठवणावळ अंदाजे | : | रु. १५ |
| संपूर्ण खर्च | : | रु. १६० |

सभासदांनी पत्रव्यवहार करताना आपला सभासद क्रमांक कृपया कळवावा, ही विनंती.

वर्गणी पाठविल्याची नोंद :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | |
| ४ | | ५ | | ६ | |
| ७ | | ८ | | ९ | |
| १० | | ११ | | १२ | |

दिनांक..........................

कार्यवाह
बॉम्बे बुक क्लब
२१७, राजा राममोहन राय मार्ग
मुंबई ४०० ००४

स. न. वि. वि.

आपले परिपत्रक मिळाले. आपली नियमावली वाचली असून मला नियम मान्य आहेत. मी .............. महिन्यापासून सभासद होऊ इच्छितो.

सोबत प्रवेश फी रु. २* व मासिक वर्गणी रु. १० पाठवीत आहे. स्वीकार व्हावा. कळावे.

नाव ..........................................................................

संपूर्ण पत्ता ..................................................................

..................................................................

टे. नं. ..................................

सही

* १५ ऑगस्टच्या पूर्वी वर्गणी पाठविल्यास खोडून टाकावे.

| तुम्ही (हे द्या) | आम्ही (हे देऊ) |
|---|---|
| १. रु. २ प्रवेश फी + रु. १० (पहिला हप्ता) | सभासदाचे कार्ड, पुस्तकांची सूची, भेट-पुस्तक, ‘पुस्तक-पंढरी’ वर्गणी सुरू. |
| २. रु. १० दरमहा (तीन महिने) | रु. चाळीसची पुस्तके (तुमच्या निवडीनुसार); पाठवणावळ अंदाजे रु. ४ माफ. |
| ३. रु. १० दरमहा (चार महिने) | रु. चाळीसची पुस्तके (तुमच्या निवडीनुसार); पाठवणावळ अंदाजे रु. ४ माफ. |
| ४. रु. १० दरमहा (चार महिने) | रु. **पन्नास**ची पुस्तके (तुमच्या निवडीनुसार) शिवाय एक भेट-पुस्तक (तुमच्या निवडीनुसार ३ पैकी १); सभासदत्व पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र; पुढील वर्षाची प्रवेश फी माफ. |
| ५. आपला विश्वास | आमची कृतज्ञता. |

भेट पुस्तके

**काव्यदर्शन :**
मंगेश पाडगावकर
वसंत बापट
विंदा करंदीकर — किंमत २ रु.
किंवा
**स्मृतिचित्रे :**
लक्ष्मीबाई टिळक — किंमत ६ रु.

**रु.४०/- वाचवा**

बॉम्बे बुक डेपो संचालित **बॉम्बे बुक क्लब**

२१७, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई-४०० ००४

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित

### आपलेच दात नि आपलेच ओठ

कॉंग्रेसच्या गाईचं बछडं म्हणजे छात्रपरिषद. कॉंग्रेस छात्रपरिषदेची. छात्रपरिषद कॉंग्रेसची. पण एक क्षण असा आला की ते बनले एकमेकांचे वैरी. त्यांतून निर्माण झाली मारामारी. चंडीपद मित्र, आमदार माणूस पण घायाळ होईपर्यंत चांगला बडवून काढला त्याला; कदाचित् कॉंग्रेसच्याच बछडयांनी, छात्रपरिषदेच्याच सभासदांनी किंवा कदाचित् गुंडांनीही...

—हकीकत घडली चोवीस परगण्यातल्या गैहाटी गावी, रात्रीच्या वेळी, एका शिक्षिकेच्या घरी. नेमक्या त्याच दिवशी छात्रपरिषदेतच पाहता पाहता दोन गट निर्माण झाले. अगदी क्षुल्लक कारणावरून बाचाबाची सुरू झाली, ह्या भांडणामुळे ऑफिसला कुलूप ठोकलं गेलं. आमदार चंडीपद मित्र यांना त्या दिवशी गावातल्या हेडमास्तरीण बाईंकडे जेवणाचे आमंत्रण होतं. रात्री साडेअकराचा सुमार. शांतपणे जेवण चाललेलं, साहेबांचा ड्रायव्हर गाडीत बसल्या बसल्याच पेंगत होता. अचानक त्याच्यावर हल्ला झाला. तो ओय् ओय् करीत घरात आला. साहेबांना म्हणाला तुमचाही जीव धोक्यात आहे. अन् निघून गेला पोलिसात वर्दी द्यायला. मग बाईंनी धोक्याचा प्रसंग जाणून सारी कवाडे आतून बंद करण्यास सुरूवात केली. तोच दारावर थापा पडू लागल्या. 'दार उघडा, दार उघडा.' बाई आमदारांना म्हणाल्या—'आता तुम्ही मागच्या दाराने पळ काढा.' पण मारणारे केवढे वस्ताद. त्यांनी मागच्या दारीच आमदारांना गाठलं नि असं बडवलं, असं बडवलं...

बिचारे आमदार अजूनही हॉस्पिटलमध्ये बेशुद्धावस्थेतच आहेत. (ता. क. नुकताच त्यांचा देहान्त झाला.)

हा आरडाओरडा, ही मारहाण ऐकून आजूबाजूचे लोक गोळा झाले तेव्हा कुठे त्या गुंडांनी पळ काढला. तोवर आमदारांचं शरीर बेशुद्धावस्थेत रक्ताच्या थारोळयात निश्चेष्ट पडलं होतं.

पोलीस? पोलिसांना बातमी मिळाली होती. पण सगळी गडबड संपल्यानंतरच सावकाशपणे चौकशीलाच केवळ यायचं हा पोलिसांचा खाक्या सर्वश्रुत आहेच. गैहाटीचेच पोलिस कसे अपवाद ठरतील?

मग वाऱ्यासारखी बातमी इकडेतिकडे पसरली. दाही दिशांनी लोक धावले. उद्योगमंत्री श्री. तरुण कांति घोष ह्यांनी संपूर्ण दिवस गौहाटीत घालवला, आपल्या सर्व लोकांना उद्देशून भाषणे देत नि कॉंग्रेसमध्ये घुसलेल्या अशा (?) गुंडांपासून सावध राहण्या-

विषयी आवर्जून सांगत.

एका मामुली सभासदांनी शंका व्यक्त केली–का हों, आमदारांची अशी दशा होऊ शकते तर आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांचं काय होईल ?

ती शंका हवेतच विरली.

श्री. तरुण कांति घोष यांनी म्हटले– 'दोष सर्वस्वी छात्रपरिषदेचाच आहे असे मी म्हणत नाही (आपलीही कवटी फुटेल अशी भीति तर वाटली नाही ना मंत्र्यांना ?) पण झाले हे फार लाजिरवाणे झाले. आपल्याच पक्षात अशी दुफळी माजायला नको, माणसाला बेदम मारेपर्यंत पाळी यायला नको आणि आपल्याच पोलिसांनी ह्या अशा घटनांकडे तिऱ्हाइतपणे बघायला नको. घडले हे सगळेच अघटित, अकल्पित नव्हते तर तशा योजनाच आखल्या गेल्या होत्या... गुंड माजले आहेत हेच खरं.'

एरवी दोष तरी कुणाला देणार ? काँग्रेसही आपलीच छात्रपरिषदही आपलीच... आपलेच दात नि आपलेच ओठ... ●

## पैशापाशी पैसा जातो

पत्त्यांचा अड्डा बसलेला. खेळणाऱ्या सगळ्या बायकाच. पन्नाशी ओलांडलेल्या. पैशाला कमी नाही. कारण घरचा कसला ना कसला व्यापार. व्यापारात नफाच नफा. वेळ जाता जात नाही. कारण घरी नोकर-चाकर. शिवाय सुनांच्या हाती राज्यकारभार. सासवांची लुडबुड तेवढीच कमी, त्या बाहेर पडल्या तर, ही सुनांची विचारसरणी. अशा पंधरावीस बायका संसारातून औट झालेल्या, एकत्र आल्या. भरपूर वेळ आणि भरपूर पैसा ह्या समान भांडवलदार मैत्रिणी बनल्या आणि आज इथे तर उद्या तिथे त्यांचे पत्त्यांचे अड्डे चालू झाले. खेळताना हरलो तर वाईट वाटून घ्यायचं नाही. वाटलंच तर मनात ठेवायचं. वरकरणी दाखवायचं–ह्या शेंदोनशे रुपयासारखी क्षुल्लक रक्कम हरल्याची मुळीच खंत नाही वाटत आम्हाला. आमच्याकडे रगड पैसा आहे. नोटांची बंडलंच्या बंडलं...

ह्या अड्ड्यात मग गोष्टी चालतातच खेळता खेळता. बाजारातून कोणती वस्तु गायब होणार याचा पत्ता ह्या बायकांना अगोदर लागतो. आठ दिवसापूर्वी असेच पोस्टमन तेल आणि डालडा बाजारातून एकाएकी नाहीसे झाले. वर्तमानपत्रातल्या जाहिरातीतूनसुद्धा गायब झाल्या ह्या वस्तू. माझ्यासारखीला कल्पनाच नाही. घरातलं संपलं की बाजार शोधायला निघणारे मध्यमवर्गीय आम्ही. आता कसं होणार म्हणून चिंता वाटू लागली. त्याच दिवशी ह्या पत्त्यांच्या अड्ड्यावर पुढ्यात नोटांची बंडलं घेऊन बायका अहमहमिकेने बोलत होत्या.

एक म्हणाली– तेल, डालडा बाजारातून जाणार म्हणून कुणकुण लागली अन् मी तेलाचे पाच डबे चटकन् आणून ठेवले बाई. आमच्याकडे तसं जास्त

लागत नाही. कारण आम्ही दोघं अन् दोन मुलं एवढीच माणसं. पण एखादे-वेळेस नच मिळालं तर? म्हणून १५॥ किलोची मोठी पाच पिपे आणून ठेवली. आता आपल्याला काळजी नाही. दुसरी म्हणाली– अहो, माझी शेजारीण खूपच श्रीमंत आहे. केवढा मोठा बंगला आहे तिचा. तिने सव्वाशे डबे आणून ठेवले आहेत.

हे ऐकताच सर्वांचे डोळे विस्फारले. पण गोष्ट खोटी नव्हती. तिच्या घरात सव्वाशे डबे होते, पण ते कसे आले? त्याचं असं आहे– तेलाचा व्यापार करणारा माणूस बंगलेवाल्याचा जिवलग मित्र. त्याने बाजारातून वस्तू गायब करायची म्हणून मित्राच्या घरी सर्व तेलाची पिपे आणून ठेवली. दुकानात तेल नाही, घरीही तेल नाही हे तो सिद्ध करू शकत होता. बंगलेवाल्यांना म्हणाला तुम्ही यातलं वापरा वाटेल तेवढं. शिवाय तुमच्या आप्तेष्टांना गुप्तपणे विकून दिलंत तर मला दुकानात माल न ठेवताही पैसे मिळतील.

अडुचातली बाई म्हणाली– मला तर वाटेल तेव्हा वाटेल तेवढं तेल मिळू शकतं त्या लोकांकडून. तुम्हाला कोणाला हवं असेल तर नोकर पाठवा. मी तेलाचा पिपा पाठवून देईन तुमच्यासाठी.

आता तेलाचा भाव वाढलाय् एक-दमच. पोस्टमनचे डबे अर्ध्या किलोचे सुद्धा दुकानातून हळूच डोकावू लागले आहेत. तुमच्यामाझ्यासारख्या सामान्य लोकांना झक मारून वाढलेल्या भावात तेल घेणं भाग आहे. फायदा कुणाचा झाला? भाव वाढण्यापूर्वी तेलाची साठवण केलेल्या श्रीमंत व्यापाऱ्यांच्या बायकांचा. त्यांचे पैसे वाचले. पैशा-पाशीच पैसा जातो नाहीतरी! ●

## सर्वांना नोकऱ्या हव्यात ना? मग माझं ऐका

त्या दिवशी देबू म्हणाला– 'बेका-रीच्या समस्येवर सरकारला मी सल्ला देऊ इच्छितो. अन् मला वाटतं माझं जर ऐकलं तर सुशिक्षित बेकारांचा प्रश्न उरणारच नाही.'

'खरी गोष्ट आहे. तुझ्या सूचना जर योग्य असतील तर सरकारने त्या मान्य करायलाच हव्यात. पण आधी आम्हाला तर कळू देत त्या.'–मी म्हटलं.

'सांगतो. पण त्यापूर्वी मी एक प्रश्न विचारतो.'

'विचार की वाटेल तेवढे प्रश्न. आम्ही तयार आहोत उत्तरं द्यायला.'

देबू म्हणाला– 'आपल्या देशात यांत्रिकीकरण कमीत कमी असायला हवं. हे पटतं का तुला?'

'हो. पटतं की. यांत्रिकीकरण कमी झालं की आपोआपच जास्त नोकऱ्या उपलब्ध होतील.'–मी म्हटलं.

'ठीक म्हणजे कमीत कमी यांत्रिकी-करण असेल तर जास्तीत जास्त नोकऱ्या निर्माण होतात, हे आपणा सर्वांना पटतं. मग याच तत्त्वावर आधारलेला एक प्रयोग मी अंमलात आणला आहे. जेणे करून संपूर्ण बेकारीची समस्या सहज सुटू शकते.'

'आता सांग की लवकर तुझा प्रयोग काय आहे ते.'

'सांगतो. माझा प्रयोग टायपिस्टच्या बाबतीत आहे.'

'टायपिस्ट ?' – मी विचारलं.

'हो. आता तुम्ही त्यांना टायपिस्ट म्हणा वाटल्यास. पण त्यांनी ट्रेनिंग बिनिंग काही घेतलेलं नाही. मी काय केलं, एका मोठ्या हॉलमध्ये एक टाईपरायटर ठेवला. आणि सव्वीस माणसं समोर उभी केली. ही माणसं म्हणजे इंग्रजी मुळाक्षरातील एकेका अक्षरांचे प्रतिनिधी. मग मी आणखीही दहा माणसं आणली. त्यांना एक ते दहा असे नंबर दिले. आणि काम सुरू केलं. मी डिक्टेशन देऊ लागलो —

"Dear Sir......"

'प्रथम D अक्षर धारण करणारा समोर आला. त्याने टाईपरायटरचं D अक्षर दाबलं. कागदावर D उमटली. मग E आला. त्याने E दाबली. मग A आला. अशा रीतीने प्रत्येकाने आपापलं काम केलं. माझं पूर्ण पत्र असंच टाईप झालं.'

देबूचं हे लांबलचक वर्णन ऐकून मी म्हटलं –

'छान छान. एका टाईपरायटरने छत्तीस माणसांना नोकरीची संधी दिली म्हणायची. प्रयोग छान आहे. वंडरफुल.. पण काही अडथळे नाही आले त्यात ?'

'अडथळे ? आले ना. काही दिवस ठीक चाललं. थोड्याच दिवसांनी A माझ्याकडे आला. म्हणाला– Y, V, K इत्यादिंपेक्षा मला जास्त काम करावं लागतं. मला जास्त पगार हवा. पाठोपाठ E, I, S ह्यांनी पण मागणी केली. आणि हळूहळू बऱ्याच जणांनी जास्त पगाराच्या मागणीचा प्रस्ताव केला. मग त्यांनी 'लाइटनिंग स्ट्राईक केला. त्यांना सहानुभूती म्हणून इतरांनीही स्ट्राईक केला. नाइलाज म्हणून मला सर्वांचे पगार वाढवावे लागले. आणि मग कुठे ती माणसं पुन्हा कामावर रूजू झाली.'

'आणि तू खूष झालास ?' – मी विचारलं.

'बेहद्द खूष. कारण माझा प्रयोग यशस्वी झाला. कमीतकमी यांत्रिकीकरणाचा आता जास्तीत जास्त प्रसार व्हायला हवा; अगदी प्रत्येक क्षेत्रात. मग पाहा – भारतातल्या प्रत्येक माणसाला नोकरी मिळते की नाही ते !' – देबू म्हणाला.

'पण काय रे, ह्या कमीत कमी यांत्रिकीकरणाच्या तुझ्या ह्या पद्धतीने कामाचा वेग कमी होतो त्याचं काय ? तुझ्या ह्या पद्धतीने एक पत्र तयार व्हायला कितीतरी जास्त वेळ लागत असेल.'

'लागतो ना. एक साधं पत्र तयार व्हायला तीन-चार दिवस लागतात. पण त्याच्याशी काय करायचंय् ? आपल्याला वेळेशी काहीएक कर्तव्य नाही. आपला मूलभूत उद्देश तर प्रत्येकाला नोकरीची संधी मिळवून देणं हाच आहे ना ? आणि तुम्ही वेळेच्या गोष्टी बोलता ? धुत् !

● ● ●

हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील एक तेजस्वी पर्व

# आजेगावचा रणसंग्राम

प्रा. शाम अग्रवाल

एकोणीस जुलै एकोणिसशे अठ्ठेचाळीस !

हैदराबाद मुक्ती लढ्याच्या इतिहासातील एक अविस्मरणीय दिवस ! अविस्मरणीय तितकाच रोमांचक आणि स्फूर्तीप्रद ! अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध तरुणांचे रक्त पेटविणारा आणि त्यांचे स्वातंत्र्यप्रेम सदैव प्रदीप्त ठेवणारा–

परभणी जिल्ह्याच्या हिंगोली तालुक्यातील आजेगावचा भयंकर रणसंग्राम या दिवशी झाला. एकीकडे उघड्या मैदानात पाय रोवून उभे ठाकलेले, तुटपुंजी मोडकीतोडकी शस्त्रास्त्रे हाती असलेले अवघे साठ-सत्तर स्वातंत्र्यसैनिक आणि दुसरीकडे गावाच्या तटाआडून सुरक्षितपणे बेफाम गोळीबार करणारे, आधुनिक भरपूर शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेले शेकडो निझामी सैनिक – शिवाय त्या सैनिकांना अवतीभवतीच्या पाच-पन्नास मैलाच्या परिसरातील रझाकारी गुंडांची मिळालेली जोरदार साथ–माणसाच्या मनाचा संपूर्णपणे थरकाप उडवणारी ही भयानक झुंज ! ही झुंज क्षण दोन क्षण नव्हे तब्बल चार-साडेचार तास चालली. सतत चार-साडेचार तास जमिनीवरून सरपटत उंचसखल जमिनीचा थोडाफार आसरा घेत रणझुंजार शूर-वीर स्वातंत्र्यसैनिकांनी जोरदार मुकाबला दिला. वापटीच्या बहिर्जी शिंदेला या रणसंग्रामात वीरमरण प्राप्त झाले. तो या संग्रामाचा खराखुरा नायक ठरला. इतर तिघांना दुष्मनांच्या गोळ्यांनी घायाळ केले. पण यामुळे स्वातंत्र्यसैनिकांची जीद्द खच्ची झाली नाही. त्यांनीही तितकाच कडवा प्रतिकार केला. शत्रूपैकी अनेकांना अचूक गोळ्या मारून टिपले. शत्रूला गावाची हद्द ओलांडून पुढे येऊ दिले नाही. हा प्रतिकार केवळ शस्त्राने केलेला प्रतिकार नव्हता. यामागे स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात असलेली दुर्दम्य स्वातंत्र्यलालसा उभी होती. ' नैनन् छिद्रान्ति शस्त्रानि '

अशा स्वरूपाची ही वज्रकठोर स्वातंत्र्य-लालसा होती. याच स्वातंत्र्यलालसेने हा भयंकर संग्राम घडविला – त्याची ही कहाणी – रोमांचक तितकीच स्फूर्तीप्रद–

पंधरा ऑगष्ट एकोणिसशे सत्तेचाळीसला भारत स्वतंत्र झाला तरी या स्वातंत्र्याचा आनंद तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला लगेच उपभोगता आला नाही कारण जुलमी निझामाची जातीयवादी सत्ता त्यांच्यावर कायम होती. ही सत्ता इंग्रजांच्या गुलामगिरीपेक्षाही भयंकर स्वरूपाची होती. या सत्तेने त्यावेळेस सबंध संस्थानभर हैदोसदुला मांडला होता.

या जुलमी सत्तेविरुद्ध त्याकाळी जे विशाल स्वरूपाचे आंदोलन झाले, त्यातील सशस्त्र संग्रामाचा भाग अतिशय महत्त्वाचा आहे. निजामाच्या दडपशाहीमुळे त्यावेळेस स्टेट काँग्रेसमधील अनेक तरुण कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांनी सरहद्दीवरील भारतीय प्रदेशात आश्रय घेऊन तेथून सशस्त्र हल्ले सुरू केले. त्यांचा सारा रोख प्रामुख्याने निझामी हद्दीतील पोलीस ठाणी आणि रझाकारी केन्द्रे उध्वस्त करण्यावर होता.


परभणी जिल्ह्याचे या आंदोलनाचे मुख्य केंद्र आकोला जिल्ह्यातील वाशीम येथे होते. तेथे जिल्ह्यातील अनेक तरुण शूर व धाडसी कार्यकर्ते एकत्र आले होते. त्यांनी मिळतील तेथून थोडीफार शस्त्रे गोळा केली होती. काही प्रमुख वीरांना कामचलावू शस्त्र चालविण्याचे शिक्षण देण्यात आले होते. अशा तुटपुंज्या बळावर देखील त्यांनी अनेक यशस्वी हल्ले करून निझामी पोलीसांना आणि रझाकारी गुंडांना सळो की पळो करून सोडले होते.

आजेगाव हे सरहद्दीपासून सहा मैल आत वसलेले हिंगोली तालुक्यातील सुमारे तीन हजार लोकवस्तीचे एक गाव. तेथे निझामी पोलीसांचे मजबूत ठाणे होते – शिवाय अवतीभवतीच्या प्रदेशातून स्वातंत्र्य सैनिकांनी पिटाळून लावलेले सर्व रझाकार गुंड तेथे जमा झाले होते. ते तेथील लोकावर अनन्वित स्वरूपाचे अत्याचार करीत होते. आणि स्वातंत्र्यसैनिकांना मुकाबल्याची आव्हाने देत होते.

स्वातंत्र्यवीरांनी त्याचे हे उर्मट आव्हान स्वीकारले. आजेगाववर सशस्त्र ॲक्शन घेण्याचे निश्चित करण्यात आले. श्री. गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली निवडक साठ-सत्तर स्वातंत्र्यसैनिकांची एक तुकडी व्याड केन्द्रावर जमा झाली. सायंकाळचे जेवण तेथेच आटोपून मध्यरात्री तेथून तुकडीने आजेगावच्या रोखाने कूच केले.

आठरा जुलैची ती रात्र. आकाश ढगांनी व्याप्त होते. वातावरणात सर्वत्र गडद काळोख भरला होता. अशा काळोखात जणू काही प्रत्यक्ष काळाबरोबरच झुंज घेण्यासाठी ते नरवीर स्वातंत्र्यसैनिक शिस्तीत एका पाठीमागे एक झपाझप चालत होते.

वाटेत एक गाव लागले. हल्ल्याची बातमी कुणीतरी देशद्रोह्याने शत्रूला



हुतात्मा बहिर्जी शिंदे

कळविली असून शत्रू जय्यत तयारीत आहे असे तेथे समजले. क्षणभर सर्वच जण अवाक् झाले. काय करावे ? असे प्रश्नचिन्ह उभे राहिले पण अंतःकरणातील आवेश अभंग ठरला. 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने सर्वजण पुढची वाट चालू लागले.

एकोणीस जुलैला भल्या पहाटे स्वातंत्र्यसैनिक आजेगावजवळ आले. दोन तुकडया पाडून गावावर दोन बाजूंनी हल्ला करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका तुकडीने समोरच्या बाजूने हल्ला करावयाचा व दुसरीने पिछाडीने जाऊन शत्रूची कोंडी करावयाची असे ठरले. पुन्हा एकदा सर्वांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या.

आघाडीची तुकडी पुढे सरकली. गावच्या मुख्य वेशीचे दार बंद करण्यात आले होते. वेशीला लागूनच मातीच्या घरांची लांबलचक रांग होती. शत्रूने त्या घरांच्या भिंतीचा तटासारखा उपयोग केला होता. भिंतींना भोके पाडून त्यात बंदुकीच्या नळया घालून ठेवल्या होत्या.

वेशीपासून शंभर-दीडशे फुटावर एक तळे होते. त्या तळयाच्या पाळूचा आसरा घेऊन स्वातंत्र्यसैनिकांनी चढाई सुरू केली. पहिली गोळी झाडण्यात आली. तात्काळ तिला प्रत्युत्तर मिळाले. तटबंदीच्या घराघरातून गोळयाचा वर्षाव सुरू झाला. पावसाच्या थेंबाप्रमाणे गोळया बरसू लागल्या. स्वातंत्र्य सैनि-

कांनी आणीबाणीची परिस्थिती ओळखली आणि लायींग पोझीशनमध्ये जोराचा मारा सुरू केला. लढाईची घुमश्चक्री सुरू झाली. स्वातंत्र्यसैनिकाचा जोष अफाट होता. त्यांच्या अगांगात आता साक्षात वीरश्रीने संचार केला होता. मोठ्या अटीतटीने त्वेषाने ते लढत होते.

वेशीच्या दोन्ही बाजूंना दोन तोफा शत्रूने ठेवल्या होत्या. त्यापैकी एक तोफ उडविण्यासाठी एक शत्रूसैनिक हातात पेटता पलिता घेऊन निघालेला स्वातंत्र्य सैनिकांनी पाहिला. अगदी समोरच्या बाजूला असलेली ती तोफ उडाली असती तर भयंकर स्वरूपाचे नुकसान झाले असते. सर्वांचेच जीव धोक्यात आले होते. वेळ मोठा बाका होता. अशा वेळेस त्या पलितेवाल्याला लोळविण्यासाठी तळयाचा आसरा सोडून सरपटत, ओरडत डिगाजी आडेकर मैदानात आले. मारोती निराळी, फुलाजी आलगुंडे त्यांच्यामागे धावले. उसळत्या रक्ताचे हे तीन तरणेबांड तरुण मोठ्या त्वेषाने ओरडतच पुढे गेले आणि तो नादान नामर्द पलितेवाला मागच्या मागे सुसाट पळाला. तोफ पेटविण्याचे त्याचे प्रयत्न अशा तन्हेने हाणून पाडण्यात आले. पण हे अचाट कार्य करीत असताना या उघड्या मैदानातील स्वातंत्र्यवीरांवर शत्रूने अक्षरशः गोळ्यांचा वर्षाव केला. तीघेही जखमी होऊन मैदानावर पडले. डिगाजी आडेकरांच्या मांडीत गोळी घुसली. ते शत्रूच्या पार पुढ्यात जाऊन पडले. बहिर्जी शिंदे, नागोबा दारेवार, नारायण मास्तर सारखा गोळ्यांचा मारा करीतच होते. वेशीच्या दारावर धडक देण्यास सरसावत होते. आता मैदानात जखमी अवस्थेत पडलेल्या आपल्या साथीदारांनाही त्यांना मागे घ्यावयाचे होते. त्यांना जखमी अवस्थेत तेथेच सोडून जाणे कालत्रयी शक्य नव्हते. त्यासाठी चढाईचा जोर कायम ठेवणे आवश्यक होते.

नागोबा दारेवार, नारायण मास्तर गोळ्यांचा बेफाट मारा करीत सरपटत त्वेषाने पुढे झाले. त्यांनी काही काळ सर्व रणमैदानच जणू काही कबज्यात घेऊन जखमी स्वातंत्र्य सैनिकांना मागे सरपटत येण्यास मोलाचे सहाय्य केले.

याच सुमारास शत्रूला नीट हेरण्यासाठी बहिर्जीने डोक्यावरील हेलमेट थोडे बाजूला सरकविले आणि काळाने डाव साधला...शत्रूपक्षाची एक भयंकर गोळी सू सू करीत आली आणि तिने नेमका बहिर्जीच्या डोक्याचा वेध घेतला...बहिर्जी आपल्या बहाद्दर साथीदारांना हात वर करून इषारा देत तेथेच कोसळला...

बहिर्जीच्या रायफलने आतापर्यंत शत्रूला हैराण करून सोडले होते. म्हणूनच त्याची अकरा गोळ्या एकामागे एक झाडणारी रायफल शत्रूच्या माऱ्याचे मुख्य केन्द्र बनली होती. बहिर्जी पडला आणि लगेच सीताराम सुताराने त्याच्या हातातील रायफल घेऊन त्याचे कार्य सुरू ठेवले.

तीन-चार तास निघून गेले होते.

स्वातंत्र्य सैनिकाजवळील दारूगोळा आता संपत आला होता. स्वातंत्र्य सैनिकांची गावाच्या पिछाडीला गेलेली तुकडी देखील आता परत येऊन मिळाली होती.

स्वातंत्र्यवीरांना आता पद्धतशीर परतीचा आदेश देण्यात आला. त्यापूर्वी बाबू कन्नेवार आणि राजाराम निशानकर यांनी पोटावर सरपटत जाऊन बहिर्जीचा देह सुरक्षित स्थळी आणला. नागोबा दारेवार, नारायण मास्तर, सीताराम सुतार यांनी सतत शत्रूच्या पुढयात राहून गोळीबार चालू ठेवला. शत्रूला गावाची हद्द ओलांडून पुढे येऊ दिले नाही. नादान, नेभळट शत्रू स्वातंत्र्यवीरांचा मुळीच पाठलाग करू शकला नाही.

शेवटी सर्वजण गावाबाहेरील नीमाजग्याजवळ (मुसलमानाचे प्रार्थनास्थान) जमा झाले. सर्वजण बरोबर आल्याची खात्री करून घेण्यात आली.

बहिर्जीला वर्मी गोळी लागली होती. त्याची जखम कापडाने बांधण्यात आली. भयंकर रक्तस्त्राव होत होता. बहिर्जीची शुद्ध गेली होती. त्याच्यावर तातडीने वैद्यकीय इलाज होणे आवश्यक होते. त्वरीत सरहद्द गाठणे जरुरी होते. प्रारंभी हिंगोलीच्या बाबूराव जामकरांनी बहिर्जीला खांद्यावर घेऊन चालण्याचा प्रयत्न केला. पुढे एक खेडे लागले तेथून एक बाज झटपट मिळविण्यात आली आणि घायाळ बहिर्जीला बाजेवर घेऊन स्वातंत्र्य सैनिक धावत पळत तातडीने निघाले.

वाट संपता संपत नव्हती. पावले जड पडली होती. पायात जणू मणामणाच्या बेडया ठोकल्यासारखे वाटत होते. आकाश अभ्रांनी अंधारून आले होते. बहिर्जीच्या दु:खाने सर्व स्वातंत्र्य सैनिकांच्या डोळयांना धारा लागल्या होत्या आणि आकाश–आकाश देखील दु:खाने काळवंडून अश्रू गाळीत होते.

शेवटी एकदाची सरहद्द गाठण्यात आली. तेथे एक मोटार मिळविण्यात आली. जखमी बहिर्जीला मोटारीत ठेवण्यात आले पण आता त्याचा केवळ देहच उरला होता. आता अनंतात विलीन झाला होता. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध लढता लढता विशाल भारतीय स्वातंत्र्यासाठी बहिर्जीने वीरमरण पत्करले होते. देशासाठी बहिर्जी हुतात्मा झाला होता.

बहिर्जीचा मृतदेह वाशीमला आणून त्यावर सैनिकी पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. सर्व स्वातंत्र्य सैनिकांनी त्याला साश्रू नयनांनी शेवटची सलामी दिली. इतर जखमी स्वातंत्र्य सैनिकांना आकोल्याच्या सरकारी इस्पितळात उपचारासाठी दाखल करण्यात आले. कालांतराने ते सर्व दुरुस्त झाले.

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक सोनेरी पान उलटले गेले. स्वतंत्रतेच्या पवित्र वेदीवर बहिर्जीने रक्ताचा अभिषेक केला. बहिर्जी अमर ठरला.

आजेगावच्या समरांगणात बहिर्जीच्या त्या पावन बलिदानाचे स्मरण करून देणारा कीर्तिस्तंभ आज उभा आहे. बहिर्जीचे चिरंतन स्मरण रहावे म्हणून परभणी जिल्ह्यात हुतात्मा बहिर्जी स्मारक शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे.

● ● ●


हाय, मोगलाई ! भाग पहिला : दिवाणखाना

# दोन : कडू नसलेलं कारलं

सिनिक्

'महाराज इस बच्चेको मैं उठाके फेंक दूंगा—' संतापाने लाल झालेला कन्हैयाप्रसाद अण्णांना म्हणाला. अण्णा दिवाणखान्यांत अगदी वेळेवर आले. ते यायच्या अगोदर दिवाणखान्यांत माझा आणि कन्हैयाप्रसादचा जणू पाठशिवणीचा खेळ खांबांच्या आधारे चालला होता. तो असा आमच्याकडे की, मोका साधून मी त्याची छेड काढावयाची आणि त्याने भडकून मला शिक्षा करावयास धावावयाचे असा क्रम ठरलेला असे. मात्र आजचा त्याचा कोप भयंकर वाटला. खरे म्हणजे मी चांगलाच भ्यालो होतो. खांबामागून व मधून पळून दमलोही. पन्नास वर्षांचा होता तरी प्रसाद उंच, सडपातळ, चिवट आणि चपळ होता. आता तर त्याचा तोलही रागाने जाऊ लागला आणि तो काय करेल याचा नेम नव्हता. उलट तो काहीही करण्याची शक्यता मला भेडसावू लागली. – अगदी याच वेळी अण्णा दिवाणखान्यात येत असलेले मला दिसले आणि मी सरक्षणाकरता त्यांच्याकडे झेपावलो. अण्णांचे अभय लाभताच मी विजयी मुद्रेने हसतो आणि माझ्या त्या हंसण्यास 'महाराज इस बच्चेको मैं उठाके फेंक दूंगा—' हे प्रसादाचे निर्वाणीचे उत्तर होते...

प्रसादची ती कटू प्रतिक्रिया पाहून अण्णांनाही किंचित विस्मय वाटला. परंतु क्षणभरच, कारण काही झाले नाही अशा अविर्भावाने अण्णा 'पहिले तशरीफ तो रखिए प्रसाद—' म्हणाले आणि त्यांनी त्याच्या स्वागताचे प्रसन्न स्मित केले. प्रसादचा ताप उतरला पण अप्रियता गेली नाही. थोडा सुटलेला आणि सैल झालेला फेटा नीट व घट्ट करत तो तसाच खडा होता. अण्णांना आता प्रश्न पडला. कन्हैयाप्रसाद त्यांच्या उमद्या दोस्तांपैकी एक होता. आमच्या दक्षिणेकडील या गावी जीं चारपांच उत्तरहिंदुस्थानी कुटुंबे होती त्यातला प्रसाद हा एकटाच अत्यंतिक व्यक्तिवादी होता. अण्णांखेरीज तो कुणाकडे फारसा जात नव्हता. कानिकुब्जी ब्राह्मण होता. होता. कर्मठ होता. दुनिया विटाळत



आणि बाटत चालली आहे असे त्याचे ठाम मत होते. तो शुद्ध आणि पक्का शाकाहारी होता. खाण्या-खिलवण्याच्या बाबतीत सपाटून रस घेणारी आणि देणारी आसामी होती ती. मला वाटते की, अण्णांत आणि त्यांच्यात समानधर्मी जर कोणता गुण असेल तर तो एवढाच आणि कदाचित् यामुळेच त्यांची मैत्री दृढ झाली असावी. मधून मधून तो अण्णांकडे येई आणि कधी खिशांत तर कधी पिशवीत आणि क्वचित गड्याच्या खांद्यावर काही घेऊन जाई. आज मात्र खुद्द अण्णांनींच त्याला बोलावले होते आणि अजून तो नाराज असल्याने अण्णांच्या पुढे समस्या उभी होती...

अण्णांनी माझे दोन्ही बाहू जरा दाबून मला समोर उभे केले आणि बारीक कठोरतेनं विचारलं 'दामू, काय केलेस प्रसादना–?' अण्णांच्या या एवढ्याशा शब्दाने मी गडबडलो. अंतरी वरमलो. आता आपली खैर नाही असं वाटलं. एकदा अण्णा रागावले म्हणजे आपल्यावर कुणीही रागावेल. अण्णा रागावले म्हणजे नक्कीच आपली चूक झाली असली पाहिजे. माझ्या घशाला कोरड पडली. अण्णा पुन्हा म्हणाले 'सांग,

गप का ?' माझ्या तोंडातून शब्द फुटेना, अण्णांनी दुसऱ्यांदा विचारूनही आपण उत्तर न देणे बरोबर होणार नाही अशी बोचणी सुरू झाली. मी सारे बळ एकवटून बोलण्याचे अवसान आणले आणि माझ्या तोंडातून 'क क का का' अशी अक्षरे कशीबशी झोकांड्या खात बाहेर पडली; पण त्यांचा शब्द काही आकार घेईना. जिव्हेवर शब्दच उमटेना. पण अण्णांच्या चटकन् लक्षात आणि ते एकदम उद्‌गारले 'कांदा, – होय ना ?' मी होकारार्थी मान हलवली.

कांदा हे कन्हैया प्रसादचे वर्म होते. जगांतील सर्वात तिरस्कारणीय कोणती चीज असेल तर ती कांदा होय असे त्याचे ठाम मत होते. कांदा दिसला की त्याचा पारा चढायचा. कांद्याचा नामोल्लेख होताच त्याची मति फिरायची. तो फारसा कुणाकडे जात नसे व माणसांत मिसळत नसे. त्याचे हे एक कारण असावे. कुणी कांद्यामुळे पदार्थांना चव येते व स्वाद येतो असे म्हटले की, त्याला त्याचे खंडण करण्याचा चेव यायचा. कांद्याच्या उग्र दर्पामुळे निसर्गाने बहाल केलेल्या सहज कोमल नाकपुड्यावर कसा अत्याचार होतो हे तो नाना उदाहरणे देऊन विवरावयाचा. माणसाचे एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय कांद्यांच्या कडक वासाने हळूहळू कसे बधीर होत जाते आणि पाहता पाहता माणूस आपली संवेदना गमावून जीवनाचा अनुभव समृद्ध करणाऱ्या एका इंद्रियास कसा पारखा होतो याचे उत्कट चित्र तो रंगवी. त्याच्या विध्वंसक प्रतिक्रियेला दुसरी एक विधायक बाजूही असायची. ती अशी की, कोणताही पदार्थ हा कांद्याखेरीज किती रसनीय व भोगनीय असतो हे तो सोदाहरण बोलून थांबायचा नाही, तर ते पदार्थ करून खावयास घालावयाला सदा सिद्ध असायचा आणि या 'बोले तैसा चाले' आधारावर कांदा हा जगातून आणि मानवी जीवनातून संपूर्णपणे नाहीसा केला पाहिजे हे तो ठासून सांगायचा. त्याच्या हातात सत्ता असती तर त्याने कांदा बाळगणारे, विकणारे, उत्पादणारे आणि खाणारे या सर्वांना नक्कीच फासावर चढवले असते.

कन्हैया प्रसाद आमच्याकडे आला की, त्याला कांद्यावरून खिजवायचे, चिडवायचे ही माझी नेहमीची खोड होती. तो बिथरला आणि चिडू लागला की मला मजा वाटायची. आज तो आला त्यावेळेस मी जरा फुरंगटून बसलो होतो. विठ्ठल आणि माणिक मला सोडन मळ्यांत गेले होते. माझ्याबरोबर खेळावयास कुणी नव्हते. कन्हैया प्रसादची मूर्ती येताना मला दिसताच त्याची आज खूप जिरवायची असं मी ठरवलं. त्याला दिसायच्या अगोदरच मी आत गेलो. हळूच एक कांदा घेतला, ठेचला व दिवाणखान्यांत नुकतीच बैठक मारलेल्या प्रसादच्या नाकाला लावून दूर सटकलो. माझ्या कुचेष्टीची योजना पूर्ण करण्याच्या भरांत मी साफ विसरलो, की काल रात्री अण्णांच्याकडे आलेल्या बड्या मंडळींच्याकरता कन्हैया

प्रसादला आज बोलावलं होतं. तहसिलदार शेजारच्या गावचे जहागीरदार आणि गावचे अमीनसाहेब यांच्या खाण्यापिण्याच्या गोष्टी चालल्या होत्या. -तहसिलदार म्हणाले ' भांचोद, सारखं गोश्त खावून तबियत कंटाळली—त्यावर अमीनसाहेब म्हणाले ' महाराज कुछ सब्जीकी अच्छी गिजाह् खिलाव की बस् जहागीरदारसाहेब हमेशा याद करेंगे —' अण्णा म्हणाले.

'तर उद्या आपण जेवावयास आमच्याकडे या. तुम्हाला कन्हैया प्रसादचा करेला खिलावतो. असा करेला की, तुम्ही उमरमध्ये खाल्ला नसेल आणि खाणार नाही. ' कन्हैया प्रसादच्या येण्याचे प्रयोजन हे होते. त्याने केलेली कारल्याची भाजी मला पण आवडावयाची. कारल्याच्या कडूपणाचा धसका घेतलेल्या माणसालासुद्धा प्रसादची कार्ल्यांची भाजी चटका लावून जावयाची. कडूपण जाणवायचे नाही आणि खमंगपणा सारखा तोंडात निथळावयाचा. त्याने केलेली कार्ल्यांची रुचकर भाजी चांगली एक आठवडाभर टिकावयाची. तो भाजी करावयास बसावयाच्या अगोदर देवघरासारखी जागा स्वच्छ आणि शुद्ध करून घ्यावयाचा. मसाल्याचे सारे पदार्थ नेटकेपणाने ठेवावयाचा. स्वतः कुटावयाचा. त्याच्या मनाप्रमाणे रंगरूप येईपर्यंत पाक सिद्धी होत नसे. जवळ कुणी आलेलं, विचारलेलं त्याला खपत नसे. अक्षरशः तनमनाने एकाग्रचित्त होऊन तो कार्ले पकवायचा. इतका सुपीक, पाकीजा आणि दिल लावून पकवलेला आणि खिलवलेला पदार्थ कधीच चाखावयास मिळावयाचा नाही. खुद्द प्रसाद अण्णाखेरीज कुणाकडे जात नसे. आणि आज तो माझ्यामुळे कमालीचा नाराज झाला होता. या नाराजीचा परिणाम म्हणून तो तसाच गेला असता तर अण्णांनी अगत्याने आमंत्रित केलेल्या महिमानांचा अपेक्षाभंग होणार होता. अतिथ्यशिलतेकरिता मशहूर असलेल्या एका जमीनदाराच्या मेहमान नवाजीत उणीव राहणार होती. एका क्षुल्लक गोष्टीच्या बाबतीत अण्णांना तोंड खाली घालावे लागणार होते. अशा स्थितीत अण्णा माझी गय मुळीच करणार नाही. एकीकडे खफा झालेला दोस्त आणि दुसरीकडे विरसलेले पाहुणे अशा पेचात स्वतःच सापडलेले अण्णा माझ्यावर दया का म्हणून दाखवतील ? अण्णा 'कांदा होय ना ?' म्हणत असताना असं सारं मनात आले आणि माझ्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. दुनिया गरगरू लागली आणि पाय लटपटू लागले. अंगाला दरदरून घाम सुटला.

आम्ही पिता-पुत्र असे समोरासमोर उभे होतो. कडेला उभ्या असलेल्या प्रसादचा फेटा नीट डोक्यावर बसला होता. त्याच्या खालचे डोके नीट बसले किंवा नाही हे कळावयास मार्ग नव्हता. मी एवढा खजिल आणि फजित झालो होतो की, आरपार अपराधीपणाची ढोसणीच मला ग्रासून होती. प्रसादकडे पाहण्याची हिम्मत होत नव्हती. भीत भीत जरा नजर वर करून मी अण्णांना

पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावर ममतेची पुसट छटाही नव्हती. उलट त्यावेळेस तेथे शुष्कताच मला भासली. झाले, आता आपला कुणी तारणहार नाही. खलास. माझ्या पोटात कमालीचे कालवले. असुरक्षिततेचा मोठा गोळा उठला. असहाय्यतेची भावना पराकोटीला पोहोचली. जिवाचा थरकाप उडाला. डोळ्यात आसवे गोळा झाली. जड कडातून अश्रू ओघळू लागले आणि अण्णा कान धरत म्हणाले, 'रडायला काय झालं ?'

अण्णांचा दटावणीचा करडा आवाज प्रसादने ऐकला आणि तो मजजवळ येत जोराने म्हणाला, 'बस् महाराज, बस् गल्ली तो मेरी है.' आणि मला उराशी कवटाळत प्रसाद रडू लागला, अगदी कळवळून. त्याच्या करूणेला बांध फुटले. सारे चित्त क्षणात साफ बदलून गेले. मी आलटून-पालटून प्रसाद – अण्णांना पाहत होतो. अण्णांनां हसावे की रडावे हे कळत नव्हते. त्यांच्यामागील अनुभवाच्या आणि पुढील जीवनाच्या कल्पनेच्या आवाक्यात कुठेच तो प्रसंग बसत नव्हता. ते आवाक् झाले होते. पाहून सारे उमजणारे नव्हते आणि न पाहताही उलगडणारे नव्हते. त्यांच्या भुवया फाकत व आकुंचन पावत. जणू बहिर्लक्षी आणि अंतर्लक्षीपणाच्या झेपेत काही मावते का हे पाहत होते. लौकिक आणि पारलौकिकत्वाचा सम साधून हा आँखों देखा प्रसंग मापता येतो का याचे कोडे सोडवण्याच्या ते धडपडीत असतानाच प्रसादचे रडणे ओसरले आणि तो आर्द्रतेने बोलू लागला, 'त्या भगवानला सारं दिसतं, कळतं. सगळी दुनिया त्याला चालवायची आहे ना. माझा शिघ्रकोपीपणा मारक आहे, जगवण्याला तारक नाही हे त्याच्या फार पूर्वी लक्षात आलं असलं पाहिजे. म्हणूनच त्यानी मला एक नाही, दोन नाही चांगली तीन मुलं देऊन परीक्षा पाहिली आणि ती मजजवळ अबाधित राहणार नाहीत म्हणून उचलून नेली. त्यांची रत्नासारखी आईपण नेली. मी काही शिकलो नाही – महाराज. आयुष्यात आलेल्या आपत्तीत विधीचा काही आदेश असेल हे हेरलं नाही. दुराभिमानाला स्वाभिमान आणि ताठरपणाला बाणेदारपणा मानण्याची सतत चूक केली. लवचिक मानवी नात्यात माझ्या ठोकळ आवडीनिवडीची सतत कोंडी करत आलो.... महाराज नका रागवू या बच्चावर, शेरका बच्चा आहे हा. त्याचा कणा असाच राहू द्या. कांद्यापेक्षा अनेक पटीनं मोलाचा आहे हा.'

त्या दिवशी कन्हैया प्रसादनं मला स्वत:जवळ बसवून स्वयंपाक केला. खुशाल कांदा दाखव, नाकाला लाव असं वरचेवर माझे गालगुच्चे घेऊन त्याने सांगितले.

जेवताना जहागीरदार म्हणाले, 'वा खूब. असा करेला खरेच यापूर्वी जिभेवर विरघळला नव्हता. खाना पण खाना आहे. नुसतं खात राहावे. महाराज एक सांगाल का ? हा बावर्ची तुम्ही कुठून मिळवला ?'

'तो बावर्ची नाही.'

'मग कोण आहे?'

'एक अजब आदमी आहे.'

'काय करतो.'

'काही नाही.'

'मजकडे नोकरीला राहील?'

'नाही, कुणाची खिदमत त्याला जमणार नाही.' ●

# तीन : दुनियेची खुबसूरती

ज्या ब्रह्मवंदाबद्दल अण्णांना आदर नव्हता तो सारा दिवाणखान्यात जमला होता. सुतकी चेहऱ्याने खांबांना, भिंतींना आणि लोडांना टेकून विसावला होता. जगावर महान संकट कोसळले असून ते कसे निस्तरावे यास्तव प्रत्येकाच्या भालप्रदेशावर आठ्यांचे जाळे पसरले होते. याला अपवाद एकच होते आणि ते म्हणजे अण्णा. त्यांची मुद्राही गंभीर झाली होती तरी प्रसन्नता लोपली नव्हती. मूळच्या गव्हाच्या रंगाचे अण्णा ठणठणीत आरोग्य आणि टवटवीत मनोवृत्तीमुळे गाजरासारखे लाल आणि तेजस्वी दिसत. दिवाणखाना माणसांनी पूर्ण फूललेला असला आणि त्यात ते कुठेही बसलेले असले तरी उठून दिसत. चटकन नजरेत भरत. ते बोलू लागले की, सगळे एकदम श्रोते आणि प्रेक्षक बनत. पण अण्णा कमी बोलत. जास्त ऐकत. जे बोलत ते मधूर आवाजात अन् निश्चयी स्वरात. अस्पष्ट, संदिग्ध आणि गोलगोल टाळाटाळ करणारं बोलणं त्यांना आवडत नसे. तसं ऐकणं तर मुळीच पसंत नसे. त्यांचा सदा कटाक्ष, लोकांना अप्रिय गोष्टही प्रिय करून पटवण्याकडे असे. आताही त्याच विवंचनेत ते होते. गावचा गरीब ब्राह्मण सांब दीक्षित यांच्या बालविधवेचा पुर्नविवाह करण्याच्या बाबतीत अण्णांनी पुढाकार घ्यावयाचे ठरवले आणि सारा ब्रह्मवृंद सांब दीक्षिताला वाळीत टाकण्याची भाषा बोलू लागला. आण्णांनी त्यांना निक्षून बजावलं की, ते स्वतः सांब दीक्षिताला अभय देतील. आसरा पुरवतील. सहाय्य करतील. तेव्हा सगळे खामोश तर झाले पण काहीतरी अण्णांना न रुचेल असे बोलावे करावे लागेल अशा मिषाने बसून राहिले. अण्णांना पर्वा नव्हती. कल्पना होती. त्याचं उत्तरही त्यांच्याजवळ होते; परंतु सत्य कटू केल्यावर सत्याचा हेतु पराभूत होतो अशी त्यांची श्रद्धा असल्याने उगीच का बोला म्हणून तेही मौन होते. स्वब्धता कुणालाही खटकली असती. जो तो मनातलं वचनात कसं आणावे याच विचारात गढलेला होता; हीच अवस्था फार लांबली असती तर

काय झाले असते हे सांगणे कठीण आहे. पण तितक्यात घाईघाईनं लक्ष्मी आमच्याकडे येत असलेली मला दिसली. ती आली. बाहेरच थांबली आणि तिने मला येण्याकरता खुणावलं. मी तिच्या-जवळ गेलो तसे माझ्या लक्षात आले की, तिला श्वास लागला होता. ती पुष्कळच घाबरली होती. कावरी बावरी झाली होती. तिने माझ्या कानात काही सांगितले. ते मी अण्णांच्या कानात सांगताच ते ताडकन् उभे ठाकले आणि दिवाणखान्यातल्या सगळयांना उद्देशून म्हणाले 'मला आता अधिक थांबता येणार नाही. गेले पाहिजे; पण एक स्पष्ट करतो. सांब दीक्षिताच्या मुलीचे लग्न झाल्याशिवाय राहणार नाही. ती कुणाचा हात धरून पळून गेली, तिच्या-वर कुणी बलात्कार केला, ती गरोदर राहीली, तिला परधर्म स्वीकारावा लागला इ. इ. गोष्टी होऊ नयेत असं मला वाटते. आता माझ्यावरच बहि-ष्कार घालावयाचे तुम्ही ठरवले तर याद राखा, पूजेच्या ब्राह्मणाचे शेत आणि इतरांची बिदागी–इनाम सारे बंद, या ऊपर काय करावयाचे ते तुम्हीच ठरवा–'

अण्णांनी आपला जरीचा रूमाल घाईने बांधला. ते पटपट बाहेर निघाले. निघताना मी घुटमळत असल्याचे त्यांनी पाहिलं आणि मलाही बरोबर घेतलं. लक्ष्मी थांबलीच होती. अण्णांनी काळ-जीने लक्ष्मीला विचारलं 'अशी कशी तब्येत बिघडली ?' लक्ष्मीने नाकाला पदर लावला तसे अण्णांनी अधिक काही विचारले नाही. परंतु तेही चिंताग्रस्त झाले. झपझप् पाऊले टाकू लागले. मी मागे राहू लागलो तसे लक्ष्मीने मला कडेवर घेतले–महमूद शाखाँचे घर जसे जवळ आले तशी लक्ष्मी पुढे झाली आणि दाराच्या पडद्याआड झाली माझ्यासह. अण्णा महमूद शाखाँच्या बैठकीत बाहेर थांबले. मी लहान अस-ल्याने मदमूद शाखाँच्या ,घरी मला पडदा नव्हता.

महमूद शाखा अण्णांचा जानी दोस्त होता. मोठा खूबसूरत आणि रसीला प्राणी होता. त्याचे वय पन्नास वर्षांचे होते पण तो पंचवीस वर्षांच्या तरुणा-सारखा दिसत असे. भोगी असून असा असण्याचे कारण तो चांगले खात पीत असे, असे पापभीरू लोक म्हणतात. परंतु लोकांना ठाऊक व्हावे इतके त्यांचे जीवन लोकानुगामी आणि जनताभिमुख नव्हते. महमूद शाखा ज्या जगात वावरत होता ते सुखोपभोगी लोकांचे होते. पैसेवाले आणि नैतिकतेच स्तोम न माजवणाऱ्या लोकांचे होते. आल्या क्षणातली मौज रिचवावी असे मानणा-ऱ्यांचे होते. म्हातारे व्हावे लागते हे सतत नाकारणाऱ्यांचे होते. वर्तमानातच भूतभविष्याची मस्ती एकत्र करणाऱ्यांचे होते. मोसमात मोसम वसंत बहार हे एकदा कबूल केल्यानंतर तोच मोसम वर्षाचा करण्यात मश्गूल राहणाऱ्यांचे होते...

महमूद शाखांच्या तीन बेगमा होत्या. त्या तिघी सुरेख होत्या. महमूद शाखाँ-वर जीव ओवाळून टाकणाऱ्या होत्या

आणि लक्ष्मी आपल्या नवऱ्याला सोडून महमूद शाखाँकडे आपले सोने घेऊन आली होती. आपले सर्वस्व तिने महमूद शाखाँला वाहिले होते. महमूद शाखाँच्या घरची सर्व व्यवस्था ती पाहावयाची. महमूद शाखाँचा पण तिच्यावर जीव होता. जेव्हा चैनीत व विलासात महमूद शाखाँचा सगळा पैसा व इस्टेट बरबाद झाली तेव्हा ही लक्ष्मी त्याच्या दौलतखान्यात साक्षात लक्ष्मी बनून चालत आली. महमूद शाखाँची बहारे पडझडीकडे झुकलीच नाहीत. रात्री जवान होणे थांबले नव्हते...

असा महमूद शाखाँ अंथरुणावरून अत्यवस्थ होऊन पडला होता. त्या अवस्थेत त्याने अण्णांची आठवण केली होती. लक्ष्मीने अण्णा आल्याचे त्याला सांगताच त्याने स्वतःला नीट बसवून आरसा आणावयाला सांगितले. आरशात पाहताच त्याने उद्गार काढले, 'दुनिया को मैं बुढा कभी नही दिखूंगा. यह दुनिया बुढोंकी और बदसूरतोंकी नही बननी चाहिए. इसे तो हरवक्त खूबसूरत व खूशहाल रखना चाहिए. महाराजको मैं यह सूरत नही बताऊंगा–' आणि त्याने त्याही अवस्थेत कळ धरून कलप लावून घेतला. केस नीट केले. मूछें मोम लावून कडक व टोकदार केली. अंगात नेहमीचे सोनेरी नक्षीचे लाल जॅकीट वेदना होत होत्या तरी घातले आणि आता महाराजांना बोलवावयास हरकत नाही म्हणाला...

खरोखरीच क्षणात महमूदशाखाँची आभा बदलली. भोवतालची माणसे नुसती पाहत राहिली. अगदी बोहल्यावर चढण्यालायक चुस्त माणूस दिसत होता तो. कुणाला वाटले नसते की, तो भयंकर आजाराने पछाडला आहे. त्यात अण्णा आत आल्यावर त्यांचे त्याने जे सस्मित स्वागत केले ते निरोगी माणसालाही जमले नसते. अण्णा खुर्चीवर बसत म्हणाले, 'अरे यार, तुला काहीच झाले नाही. उगाच का घाबरलास–'

'कोण म्हणतो घाबरलो' असा तो म्हणाला आणि त्याला जबर कळ आली. ती आवरत त्याने एक लक्ष्मीला सोडून इतरांना बाहेर जाण्यास फर्मावले. सगळे बाहेर गेल्यावर मंदपणे अण्णांना म्हणाला 'घाबरलो मुळीच नाही. परंतु ओळख पटली काय झाले त्याची म्हणून तुला बोलावले. जवानी टिकावी, जोश वाढावा आणि भरपूर रोष करता यावा म्हणून आपण दोघांनी दवा घेतली. तू बम्मन, तुला पऱ्हेज साधला. मी पथ्य पाळले नाही. बेगुमान राहिलो आणि औषध उलटले. ते चांगलेच उलटले. माझ्या पाठीला दोन भोके पडली आहेत. आता जास्त जगण्यात रस नाही. दुनियेतील खुशी लुटता येणार नाही. वाढवता येणार नाही. या जगात माणसाने खुशी घेण्याकरता व देण्याकरता रहावे. नसता जागा रिकामी करावी. आता या दुनियेत मला जागा नाही. त्याची खंत नाही. २–३ दिवसाचा फार तर पाहुणा आहे.' पुन्हा एकदा महमूद शाखाँला असह्य वेदना झाल्या. त्या गिळत तो म्हणाला 'गोविंद, जिंदगीत गम गिळायचे टाळले.

कारण गम गिळला की, देहांत विकार येतो. गम हजम करावयाचा असतो. पण आता गम गिळत आहे कारण शायरने म्हटल्याप्रमाणे आता गमच दवा झाला आहे...बस् एवढेच बोलायचे होते, सांगायचे नव्हते. आता कसे मोकळे वाटते...' अण्णांनी महमूद-शाखाँचा हात हाताला घेतला आणि तो दोन्ही पंजात झाकत, म्हणाले ' हे सुंदर हात कुदरत इतक्या अकाली निर्जिव नाही करणार ' यावर महमूद-शाखाँ जरा तेजीत येऊन बोलला ' तीच तर मुश्कील झाली आहे. जी बिमारी माझ्या जिसममध्ये घुसली आहे तिला माझ्या देहाची चटक लागली असा मला संशय आहे. माझ्या देहाच्या कणाकणाने जीवनातील ज्या रंगिनिया घुसल्या आहेत त्या क्वचितच दुष्मनांना भक्षणास मिळत असतील...' त्याही अवस्थेत महमूदशाखाँच्या चेहऱ्यावर मिस्कील स्मित चमकून गेले. जणू आयुष्यात धुंद होऊन भोगलेला क्षण्न-क्षण त्याच्या नजरेपुढे पुन्हा हिरवा होत होता. अक्षय्य होता...आजारातही त्याची मानसिक लय अभंग होती.

थोडा वेळ बसून आम्ही निघालो. दाराशी लक्ष्मी म्हणाली 'महाराज मी काय करू! शहरला इलाजाला घेऊन जाऊ काय ?'

अण्णा काहीच बोलत नाहीत पाहून लक्ष्मी पुन्हा आर्ततेने कण्हली ' महाराज तुम्हालाही आशा नाही ना—सारे बोल-तात ते अळेबळे आणून ना ?' अण्णा फक्त म्हणाले ' काही कळत नाही '

खरेच, अण्णांनाही कळले नव्हते काय ? ज्या अण्णांनाच फक्त विश्वासात घेऊन मन मोकळे करायचे त्याच अण्णांना न कळण्यासारखे काही असेल हे कसे शक्य होते ? महमूद शाखाँ आमच्याकडे आला म्हणजे इतरांची वर्दळ बंद असायची. दिवाणखान्यात अण्णा आणि महमूद शाखाँ हे दोघेच असत; पण तो जणू या दोघांच्या करताच आहे असे वाटायचे. तो भरल्यासारखा वाटायचा. फारतर तास-दोन तास महमूदशाखाँ बसायचा; पण तेवढा वेळ कसा भरपूर वाटायचा. असे हे जिवा-शिवाचे मित्र होते तरी शेवटच्या क्षणाचे अण्णांनाही अगम्य वाटावे ना ?

त्यानंतर दिवसभर अण्णा महमूद शाखाँच्या सकाळच्या गोष्टी आठवून आठवून सांगत होते. ते सांब दीक्षितांच्या बालविधवेच्या पुर्नविवाहाचा समरप्रसंग साफ विसरले होते. त्यांच्या दृष्टीने चर्वणा करण्यासारखी एकच गोष्ट होती आणि ती म्हणजे महमूद शाखाँ ! कुणी-तरी अण्णांना म्हणाले ' महाराज तुम्ही तर असे बोलत आहात की कुणासही महमूद शाखाँ नावाची व्यक्ती हयातच नाही असे वाटावे... ' अण्णांनी उत्तर दिले ' तो हयात होता तेच महत्त्वाचे. ते असे काही तरी आहे की त्याची फोड करून सांगणे कठीण. पण एका अर्थाने पाहिले तर महमूद शाखाँला मृत्युंजय म्हटले पाहिजे ..'

आणि झालेही तसेच. अगदी बरोबर तिसऱ्या दिवशी महमूद शाखाँने देह ठेवला ! [ क्रमशः ]

## मराठवाड्याचा विकास

पान २४ वरून

स्थितीत जमीनीवरचे लोकांचे प्रमाण कमी करायचे असेल व आर्थिक सुबत्ता आणायची असेल तर औद्योगिकरणाशिवाय पर्याय उरत नाही. पण इथे उलटाच मामला !

शासन मदत करत नाहीच पण केवळ मागास भागाचा विकास साधण्यासाठी निर्माण झालेल्या इतर वैधानिक (Statutory Boards) सुद्धा काहीच करायला तयार नाहीत.

राज्य वित्तीय महामंडळ (MSFC) मध्यम व लघुउद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जन्माला घातले गेले. १९७० पर्यंत महामंडळाने केलेल्या ३७·१९ कोटी रुपयाच्या मदतीपैकी ३३·०२ कोटी रुपये पुण्या-मुंबईच्या वाटचाला आले आणि मराठवाड्याला फक्त १·७८ कोटी रुपये मिळाले.

उद्योग विकास महामंडळ (MIDC) विकास केला कोणत्या उद्योगांचा ? १९७२ पर्यंत खर्च केलेल्या ७·४५ कोटी रुपयात १·११ कोटी मराठवाड्यात आणले गेले. उरलेले पुन्हा -पुणे मुंबईत.

लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC). लहान उद्योगांना कच्चा माल आणि बाजार सवलती मिळवून देण्यासाठी १९६२ मध्ये ह्या मंडळाची स्थापना झाली. गेल्या १० वर्षांतल्या मंडळाची कामगिरी काय ? ८·२८ कोटी रुपये किमतीच्या वाटल्या गेलेल्या कच्च्या मालापैकी ५·४६ कोटी म्हणजेच ६७% माल मुंबई पुण्याला आणि केवळ ६६ लाख म्हणजे ८% एवढाच माल मराठवाड्याच्या वाटचाला आला.

बाजारातील उलाढालीचीही तीच कथा. मुंबईत ही उलाढाल ९७·५६ लाखांची व मराठवाड्यात १·३९ लाख म्हणजेच एक टक्क्यापेक्षाही कमी होती.

महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळानेही मराठवाड्यात एकूण गुंतवणुकीच्या जेमतेम १·२% पैसेच गुंतवले.

### वीज : हेळसांड


उद्योगधंद्याच्या वाढीत वीज हा फार महत्त्वाचा घटक आहे.

महाराष्ट्रातला दरडोई वापर गेल्या १० वर्षात ७८·३ किलो वॅट वरून १५३·७ किलो वॅट वर गेला पण मराठवाड्यात मात्र ही वाढ ०·५५ वरून १९·२६ किलो वॅट एवढीच झाली आहे.

महाराष्ट्रात सध्या वापरल्या जाणाऱ्या विजेपैकी केवळ १·३% एवढीच वीज मराठवाड्यात वापरली जाते. विजेचा दरही फार विचित्र आहेत. मुंबईपेक्षा मराठवाड्यातला विजेचा दर खूपच जास्त ठेवण्यात आला आहे.

मराठवाडी माणसाचे कंबरडे मोडले नाहीतर काय होईल.

पुढे काही सुधारणा होण्याचीही शक्यता कमी दिसते. वीज निर्मिती वाढवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार कोराडीचा १००० मेगावॅटचा प्रकल्प उभा राहणार आहे. पण मराठवाड्यात एकमेव असणाऱ्या परळी प्रकल्पाची



क्षमता मात्र ६० मे. वॅ. वरून १८० मे. वॅ. एवढीच वाढवण्यात येणार आहे !

## शेती : नुसती घोषणाबाजी

मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांची भौगोलिक पाहणी अजूनही करण्यात आलेली नाही ! त्यामुळे शेतीकडे किती दुर्लक्ष झाले असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. ग्रामीण भागातील मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न देशातले सर्वात कमी आहे.

अंदाज (अधिकृत) असा आहे की ६·१४ लाख हेक्टर जमिनीला विहिरीच्या पाण्याची सोय होऊ शकली आहे.

झटकन कार्यक्षम होऊन उत्पन्न देऊ शकतात. मध्यम व लघुसिंचन योजना सरकारी पाहणीनुसार ७० मध्यम आणि ६४२ लहान योजना मराठवाड्यात होऊ शकतात. पण दुर्दैवाने आजपर्यंत फक्त ३९ मध्यम आणि ११५ लहान योजनाच पूर्ण होऊ शकल्या.

नाही म्हणायला जायकवाडीच्या प्रचंड प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आहे. पण तिचा कूर्मगतीने चाललेला विकास पहाता ती योजना किती तपात पूर्ण होणार ह्याची शंका येऊ लागते. वाढणाऱ्या किंमती पहात योजनेचा खर्च अफाट वाढत जाणार आहे ही साधी गोष्टही शासनाच्या लक्षात येत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

वर्वे अहवालानुसार मराठवाड्यात जास्तीत जास्त २० टक्के जमीन कालव्याच्या पाण्याखाली येऊ शकते. मुख्यत: कोरडवाहू शेतीचा हा भाग. सुबत्ता यायची असेल तर निदान २० टक्के जमिनीला कालव्याचे पाणी पोहोचेल ह्यासाठी धडपड होणे आवश्यक होते. पण जेमतेम ५·६३ टक्के एवढीच जमीन कालव्याच्या पाण्याखाली आलेली आहे.

बंडिंग बाबतही तीच कथा. वाहून जाणारे पाणी वाचवणे आणि जमिनीची धूप थांबविणे अशी महत्वाची कार्ये बांध पार पाडतो. मराठवाड्यात ४१·५१ लाख हेक्टर्सना बांध बंदिस्ती करता येणे शक्य आहे. पण आजपर्यंत केलेले व दुष्काळानिमित्ताने केले गेलेले

बंडिंग १९·४२ लाख हेक्टर्स पुरतेच मर्यादित आहे. म्हणजे अजून २१ लाख हेक्टर्सचे बंडिंग व्हायचे बाकी आहे.

शेती किफायतशीर व्हावी यासाठी काही जोडधंदे आवश्यक असतात. याबाबतही काही कारायचा प्रयत्न शासनाने केलेला नाही. कोरडवाहू शेतीबाबत संशोधनाचीही तीच रडकथा. एवढे परभणीचे कृषी विद्यापीठ लढून आणले. पण संशोधना ऐवजी जातीयवादाच्याच नवनवीन जाती तेथे शोधून काढल्या गेल्या !

अशी ही शेतीची रडकथा !

मराठवाड्यातले कॉंग्रेसवाले नालायक असल्यामुळे (काही सन्माननीय अपवाद वगळता) म्हणा किंवा महाराष्ट्र शासनातच अमराठवाडी माणसांचे प्राबल्य असल्यामुळे म्हणा, सर्व आघाड्यांवर मराठवाडा मागासलेला राहिला आहे.

रस्ते आणि रेल्वे ह्या प्रगतीच्या नाड्या समजल्या जातात. पण तेथेही मराठवाड्याच्या नशिबी वाटाण्याच्या अक्षता आल्या आहेत.

दर १०० चौरस कि. मी. मागे असलेले रस्त्यांचे प्रमाण पहावे. १९७१ पर्यंत उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात २२·७ कि. मी. भारतात ३२ कि. मी. मुंबई व पुण्यात अनुक्रमे ३२·२ व ३२·३ असे आहे. मराठवाड्यात मात्र दर १०० चौ. कि. मी. मध्ये फक्त १२·६ कि. मी. लांबीचे रस्ते आहेत. ह्याच वेगाने आजपर्यंत रस्त्याची लांबी वाढते आहे.

रेल्वेचेही तसेच. मराठवाड्यात दर १०० चौरस कि. मी. मधे फक्त १·२८ कि. मी. लांबीचे रेल्वे मार्ग आहेत आणि आहेत त्यातही बहुसंख्य मार्ग मीटर गेजचेच आहेत.

रेल्वे व रस्त्यांचा अभाव असताना विकास कसा होणार ? (घोषणांच्या वाढत्या लांबीने होणार असेल तर गोष्ट वेगळी ! )

सरकारी, निमसरकारी व अन्य नोकऱ्यांतूनही अन्याय झाला आहे. कलेक्टर्स, चीफ एक्झीक्यूटिव्ह इंजिनियर्स सेक्रेटरी अशा उच्च पदावर मराठवाड्यातली मंडळी कमी आढळतात. कारण हैद्राबाद राज्यांतून मुंबई राज्यात व मुंबई राज्यातून महाराष्ट्रात निघालेल्या वाऱ्यावरच्या वरातीत मराठवाड्यातल्या लोकांची ज्येष्ठता डावलण्यात आली. बढती देण्याबाबत त्यांच्यावर अन्याय झाला. ह्या गोष्टीचा परिणाम इतर स्तरावरच्या नोकऱ्यांवरही झाला. कनिष्ठ स्तरांवरील शिक्षक सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी अशांसारख्या जागांवरही मराठवाड्याच्या बाहेरील लोकांची जास्त भरती झाली आहे. मराठवाड्याच्या लोकांच्या मनात हे फार दिवसापासून सलते आहे

दुष्काळ : कायमचा :

इतर वेळी मराठवाड्याकडे दुर्लक्ष झाले. परंतु भीषण दुष्काळात तरी मराठवाड्याची देखभाल करावी एवढी साधी मानवी अपेक्षा मराठवाड्यातल्या जनतेने बाळगली होती.

परंतु मदतीऐवजी मुत्सद्देगिरीच त्यांच्या नशिबी आली.

परदासानी अहवालाने मराठवाडा 'क' वर्गात घातला. 'क' वर्गाचा अर्थ मराठवाड्यात १० वर्षांच्या काळात एकदा पीक हातून पूर्णपणे जाते (दुष्काळ) असा होतो हे असत्य आहे. मराठवाड्यात बऱ्हंशी भागात दर तीन वर्षातून एकदा व बऱ्याच भागात पाच वर्षातून एकदा दुष्काळ पडत असतो.

शासनाला हे माहीत आहे, पण पश्चिम महाराष्ट्र व मुंबई पुण्याच्या लोकांचेच महाराष्ट्र शासनात वर्चस्व आहे. दुष्काळ पडला आहे हे जाणवताच महाराष्ट्राच्या २६ पैकी २२ जिल्ह्यात ४ आण्यापेक्षा कमी आणेवारी शासनाने जाहीर केली. दुष्काळात आता खूप पैसे खर्च केले जाणार. (खायचीही नामी संधी ! ) तेव्हा आपल्या भागात दुष्काळ नसला तरीही विकासाचे घोडे दामटवता येईल हा हिशोब पुढाऱ्यांनी केला. त्यांच्या दबावामुळेच मराठवाड्यासारख्या तीव्र दुष्काळी व कायम दुष्काळी भागाला इतरांच्या रांगेत नेऊन बसवण्यात आले. खर्चामधे आणखी वाटेकरी वाढवून मराठवाड्याला रिकाम्या भांड्याने परतवायला लावल्याचे पाप महाराष्ट्र शासनाने केले,

कशी गंमत आहे पहा. 'दुष्काळाशी सामना' योजना--३२५·८५ कोटींची केंद्राच्या मदतीने राबवायचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. पण ह्या ६ जिल्ह्यात ही योजना चालणार त्यात मराठवाड्याचा एकही जिल्हा नाही !

आणि हाही निर्णय कसा घेतला गेला ? महाराष्ट्र शासनानेच सुखथनकर समिती स्थापिली वस्तुस्थिती शोधण्यासाठी (Fact Finding) ह्या समितीचा अहवाल यायच्या आधीच वरील सर्व निर्णय झाले ! मग त्या समितीचा फार्स कशाला केला गेला ? हा काय माकडाचा खेळ वाटला काय नाईक सरकारला, की वाजवले डमरू समितीचे की पब्लिक जमले !

मराठवाडा कसा मागासला आहे त्याचा हा तपशीलवार त्रोटक अहवाल.

कोणती कारणे आहेत ? काय उपाय योजावे लागतील ?

समाजवादाच्या घोषणा करणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण हे एक मुख्य कारण आहे. शासनाची खटपट चालली आहे मुंबई-पुणे-नासिक त्रिकोणाचा विकास साधण्याची. तेथले धनिक शासनाला सत्तेवर आणण्यात आणि टिकवण्यात सहभागी होतात म्हणून हा खटाटोप. तेथला सामान्य माणूस हा मराठवाड्याच्या तुलनेने जास्त संघटित आहे. शासनाच्या नाकात वेसण घालण्याची हिंमत तेथल्या कामगार वर्गात आहे. दोहोंचा परिणाम म्हणून ग्रामीण जनतेचा कळवळा आहे. असे दाखवणारे हे लोक त्या प्रगत पट्ट्याच्या लोकांपुढे नांग्या टाकतात. मराठवाड्याच्या वाट्याला येणारी खिरापत आणि जुळ्या मुंबईच्या प्रकल्पावर होणारा खर्च (२००० कोटींच्या घरात) शासनाच्या धनिकांना पक्षपाती धोरणाचा निदर्शक आहे.




सधन बागायतदारांचा ग्रामीण भागातला दबाव व त्याचे निवडणुकीत होणारे परिणाम जमेस धरून ऊस–द्राक्षाची संस्कृती निर्माण करणे हाच मार्ग दुसऱ्या बाजूला शासनाला अवलंबावा लागतो.

परिणाम मराठवाड्याच्या तोंडाला पाने पुसण्यात होतो.

उपाय कोणते ? जे निर्णय आजपर्यंत घेतले गेले, जी धोरणं आजपर्यंत ठरवली गेली ती टाळणे, त्याच्या उलट धोरणे ठरवणे हा अगदी सुटसुटीत मार्ग आहे असे म्हणता येईल. म्हणजेच मंबई-पुण्याकडील पैशाचा ओघ थांबवा, मराठवाड्याची सर्वांगीण पहाणी करा, मराठवाड्याची शेती सुधारेल व किफायतशीर होईल अशा उपाययोजना करा, नागपूर प्लॅनप्रमाणे रस्त्यांची संख्या व लांबी वाढवा, रेल्वेचे जाळे निर्माण करा अशा सूचना करता येतील. उपाय सुचवून तसा काहीच फायदा नाही. अनेक समित्यांचे अहवाल, गोखले अर्थशास्त्र संस्थेने केलेली पहाणी वेळोवेळी विविध राजकीय पक्ष व सामाजिक संस्थांनी केलेल्या मागण्या सरकार दफ्तरी लालफितीमध्ये आहेतच. आणखी नवीन काही सांगण्याची आवश्यकता नाही.

प्रश्न मराठवाड्यातली जनता जागृत होणार की नाही असा आहे.

मते मागायची पाळी आली की खासदारापासून आमदारापर्यंत सर्वच जण विकासाचे आमीष दाखवत आले. मुंबईत गेले की ऐष आरामात आणि स्वतःची शेती वाढवण्यात, अधिकाऱ्यांच्या नेमणुका, बदल्या करण्यासाठी पैसे खाण्यात गुंग. दुष्काळ पडला तरी तहसीलदारांकडून हप्ते खाण्यातच सारा वेळ जातो. दिल्लीला गेले की लोदी हॉटेलच्या मादक पार्टी ! ह्यांना दुसरा कसला विचारच करायला येत नाही. मग मराठवाड्याचा विकास होणार कसा ? मराठवाड्यातल्या लोकांनी हे एकदा समजून घेतले पाहिजे. विकासाचा जिवंत बाप दाखव नाही तर तुझ्या अकलेचे आणि कर्तृत्वाचे श्राद्ध घाल असा पवित्रा त्यांनी घेतला पाहिजे.

मराठवाडा जनता परिषदेच्या प्रयत्नामागे ह्यापेक्षा कोणता वेगळा हेतू असणार ?

● ● ●

**मध्यंतर**

# ' बहुरूपी ' चे ' क...क...काळोखातला '

सौ. पुष्पा भावे

Peter Shaffer च्या, ' Black Comedy 'चे मुक्त रूपांतर 'क...क... काळोखातला ' या नावाने ' बहुरूपी 'ने सादर केले. गेल्या वर्षी अरुण सचदेव यांनी मूळ इंग्रजी नाटकाचे काही प्रयोग मुंबईत केले होते आणि ते एका विशिष्ट मर्यादेत लोकप्रियही झाले होते. ' बहुरूपी ' साठी या इंग्रजी नाटकाचे मराठी रूपांतर करताना कमलाकर नाडकर्णी यांनी नाट्यवस्तूवर मराठी वातावरणाचे संस्कार घडविण्याचे आटोकाट यत्न केले आहेत. कलावंताच्या जीवनपद्धतीभोवती गुंफलेल्या या नाटकातील विनोद, कलावंताचे कलंदर आयुष्य आणि त्याने प्रस्थापित प्रतिष्ठितांसारखे होण्याचा केलेला यत्न यातील विरोधावर उभा आहे. या नाटकाची नाट्यवस्तू सर्वसाधारण हास्यप्रधान नाटकाप्रमाणेच फसवणूक, ती उघडकीला येणे, यावरच अवलंबून आहे. एका तरुण शिल्पकाराला आपल्या कलाकृती धनवटे नामे श्रीमंत कलारसिकाला दाखवायच्या आहेत. हा रसिक ज्या रात्री कलाकृती पहावयास यावयाचा असतो त्याच रात्री कलावंताची प्रेयसी आपल्या वडिलांना तिथे बोलावते. एकाबाजूला धनवटे व दुसऱ्या बाजूला आपले भावी सासरे यांचे मत आपल्याविषयी चांगले व्हावे यासाठी तो कलावंत धडपडू लागतो. त्या धडपडीतून विनोद निर्माण होतो. या नाट्यस्पनेतील विनोद प्रामुख्याने शीर्षकात सुचविल्याप्रमाणे काळोखामुळे निर्माण होतो. पाहुणे यायचे असतात त्याच संध्याकाळी कलावंताच्या घरातील फ्यूज जातो. या नाट्यकृतीतील गृहीतकृत्य असे की रंगमंचावरील गडद अंधार म्हणजे प्रत्यक्षातला उजेड आणि रंगमंचावरील उजेड म्हणजे प्रत्यक्षातील अंधार त्यामुळे नाटकातील पात्रांची अंधारातील गडबड प्रेक्षकांना लख्ख दिसू शकते किंबहुना ही एक चलाख कल्पना सोडली तर मूळ नाट्यकृतीतील विनोद निर्माण क्षमता बेताची आहे. अरुण सचदेवांच्या इंग्रजी प्रयोगाला तर कंटाळवाणी संथ गती होती. मूळ नाट्यकृतीतील ही उणीव जाणूनच कमलाकर नाडकर्णी यांनी मराठी रूपांतरात शाब्दिक विनोद निर्माण करण्याचा यत्न केला आहे. त्यातील

मथोडेच विनोद प्रत्यक्षात पकिाकर झाले. परंतु दादा कोंडके शैलीतील 'साप्ताहिक मनोहरा' 'दिसला ग बाई दिसला,' 'पाचोळा जळत नाहीए' हे उल्लेख मात्र निश्चित नाटकाच्या हलक्या फुलक्या वातावरणाला पोषक असेच होते.

हेमचंद्र अधिकारी यांनी दिग्दर्शनात नाटकाला गती देण्याची शिकस्त केली आहे. अंधारातील वावरणे अत्यंत सफाईने बसवून घेतले आहे. परंतु कमलाकर नाडकर्णी आणि हेमचंद्र अधिकारी (प्रकाश व सरवटे) यांचा अपवाद वजा करता इतर कलावंतांना हास्यनाट्यातील अभिनयाची मुक्तशैली जमत नव्हती. कमलाकर नाडकर्णी विनोदी नाटकातील कोणतीही भूमिका ज्या मुक्ततेने सादर करतात ती मराठी प्रेक्षकांना परिचित आहे. परंतु या प्रयोगात इतर नटांच्या अवघडलेपणाचे दडपण त्यांच्याही अभिनयावर पडले होते. तरी त्यांनी विनोदाच्या काही जागा ज्या उत्स्फूर्ततेने घेतल्या त्या पाहता त्यांच्या अभिनयाला इतरांनी साथ दिली असती तर प्रयोग अधिक वठला असता असे वाटते. मोहन वैद्य आणि रघु पाटील यांचे नेपथ्य नाटचवस्तूला पोषक, कायक्षम असेच होते. तरी मूळ नाटचकृतीप्रमाणेच कलावंताच्या स्टूडियो प्रेक्षकांच्या समोरील Trap door खाली कल्पिला असता तर अधिक परिणामकारक झाले असते. वेषभूषा निवडताना काळोखाचा विचार करून रंग निवडले असते तर नाटकाच्या प्रारंभीच्या हालचाली ठळक झाल्या असत्या.

मूळ नाटचकृती, सदोष असूनही 'बहुरूपी'ने 'क...क...काळोखातली' हा प्रयोग सुसह्य केला आहे. ●

**'The Play Begins :**
**Warren Kenton**

---

नाटककाराच्या मनात एखादी नाटचसंकल्पना येते तेव्हापासून तो त्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचा पडदा उघडतो तोपर्यंत किती घटना घडतात याची कल्पनाही सामान्य प्रेक्षकाला येत नाही. किंबहुना नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचा पडदा उघडण्यापूर्वीच एक संपूर्ण नाटक झालेले असते. पु. ल. देशपांडे यांनी 'खोगीरभरती' मधील एका लेखात नवशिक्या नाटककाराचे पहिले नाटक रंगभूमीवर कसे येते याचे व्यंगचित्र रेखाटले आहे. एखाद्या महत्त्वाच्या नाटचकृतीच्या निर्मितीचा दैनंदिन वृत्तांत ठेवण्याचा प्रघात आपल्याकडे फारसा दिसत नाही. पाश्चात्य चित्रपट व नाटचसृष्टीतील असे काही वृत्तांत वाचताना नाटकामागच्या प्रक्रियेची गांभीर्याने नोंद ठेवण्यातील उपयुक्तता जाणवते. आज हे सारे सुचवण्याचे कारण असे की Warren Kenton या रंगभूमीतज्ञाने लिहिलेले 'The Play Begins' हे पुस्तक वाचनात

आले. स्वतः लेखक या पुस्तकाला 'Documenary novel' असे म्हणतो. एका तरुण नाटककाराच्या मनात शहरात साजऱ्या होणाऱ्या 'Guy Fawkes Night' या उत्सवाच्या निमित्ताने इतिहासाविषयी कुतूहल निर्माण होते; स्टुअर्ट राजांचा इतिहास तो वाचू लागतो; हा या कादंबरीचा प्रारंभ आहे. इतिहास वाचताना नाट्य-संकल्पना जन्माला येते; ती त्या नाटककाराला स्वस्थ बसू देत नाही; मग तो म्युझियम मध्ये जातो; त्याकाळाविषयी माहिती गोळा करू लागतो; हळूहळू नाटक कागदावर उतरू लागते; सतराव्या शतकातल्या त्या राजकारणी माणसातच नाटककार वावरू लागतो; त्यांचे विचार कागदावर मांडू लागतो. नाटक लिहून पुरे होते. इथून पुढे आपल्या नाट्यसंहितेचे योग्य प्रसारण करणारा प्रतिनिधी शोधण्यापासून तो प्रत्यक्ष तालमी सुरू होईपर्यंत एक टप्पा आणि तालमीपासून पहिल्या प्रयोगाच्या रात्रीपर्यंत दुसरा टप्पा, असे या कादंबरीचे साधारण विभाजन आहे.

ही कादंबरी वाचीत असताना नाटक समूहकला आहे हे तत्त्व मनावर अधिकच ठसते. नाटककार, दिग्दर्शक, नट, तंत्रज्ञ, कलावंत, नाट्यव्यवहाराने बांधलेले नाट्यगृहमालक, जाहिरातदार अशा असंख्य माणसांचे त्या नाट्यसंहितेची जे नाते जडते त्यातून एक नाट्यप्रयोग जन्माला येतो. तो प्रयोग पाहताना कधी कधी नाटककारच परका होतो. Warren Kenton च्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास 'The Play right sat beside him in a strange mood. It was as if he had been watching someone-else's Play. – He constantly recognized the lines, like familiar tunes, yet to hear and see his intensely personal ideas made manifest on stage left him curiously unmoved. The Play no longer belongued to him any more.' याउलट निर्माता मात्र आपला लठ्ठ सिगार फुंकत, त्या नाटकाच्या आर्थिक यशाचे अंदाज बांधत असतो; दिग्दर्शक अजून सफाईचा हात कोणत्या जागांवर फिरवायचा याची मनात नोंद करीत असतो; तर रंगमंचावरील नटांना अनेक महिन्यांच्या तालमीत न जाणवलेले स्पंदन त्या रात्री प्रेक्षकसंवादातून जाणवत असते. नाट्यनिर्मितीचा हा विलक्षण इतिहास या लेखकाच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास 'Documentary novel' कोणत्याही कादंबरीपेक्षा मनोवेधक आहे.

मराठीमध्ये अशा एखाद्या काल्पनिक निर्मितीचा इतिहास वा एखाद्या प्रत्यक्ष निर्मितीची दैनंदिनी कोणा नाटककाराने लिहिली तर मराठीतील नाट्यविषयक ग्रंथात मोलाची भर पडेल.

[The Play Begins : Warren Kenton (Elek Books) ] ●

‘ड्रॉपर्स’च्या दोन एकांकिका

# माझी गोष्ट

# भजन

वि. भा. देशपांडे

‘ड्रॉपर्स’ ही दोन-अडीच वर्षांपूर्वी निघालेली पुण्यातील एक नाटच-संस्था, या छोटयाशा कालखंडात संस्थेने एकांकिका संपूर्ण नाटक, वर्ग इत्यादी कलाप्रकार सादर केले. विशेषतः या संस्थेतील कलाकारांनी ‘नाटककाराच्या शोधात सहा पात्रे’ या नाटकाचा प्रयोग गेल्या वर्षी सादर करून सर्व नाटय-रसिकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्या-नंतर विजय हरी वाडेकरांचा एक वग सादर केला होता. पण तो सर्वच दृष्टीने सुमार ठरला. या संस्थेने नुकत्याच दोन एकांकिका सादर केल्या. ‘माझी गोष्ट’ आणि दुसरी ‘भजन’!

‘माझी गोष्ट’ एकांकिकेचे लेखक आहेत सुहास तांबे. आजच्या तरुणाच्या मनात अनेक दृष्टीने उडालेला गोंधळ, कुटुंब, शिक्षण, प्रेम इत्यादी गोष्टीमध्ये त्याची होणारी संभ्रयित अवस्था, अनिश्चित भवितव्य आणि त्यातच ‘मी कोण आहे?’ याचा शोध घेण्याचा प्रयत्न याचे चित्रण एकांकिकाराला अभिप्रेत असावे. नायकाचा प्रेक्षकांशी साक्षात संवाद करण्याच्या रचना तंत्राचा लेखकाने वापर केलेला आहे. ही एकांकिका पाहत असताना सतीश-आळेकरांच्या ‘झूलता पूल’ एकांकी रचना तंत्राची आठवण सतत होत होती. अर्थात आळेकरांनी या तंत्राचा वापर अधिक आशयघन करण्याच्या दृष्टीने आणि नाटच परिणाम साधण्या-च्याही दृष्टीने नेमकेपणाने केलेला आहे. तसा वापर तांबे करू शकले नाहीत. त्यामुळे निवेदन, आत्मकथन आणि संदर्भ म्हणून काही प्रसंग, संवाद एवढेच त्यांच्या एकांकिकेचे स्वरूप राहिले. नायकाच्या किंवा आजच्या तरुणाच्या व्यथामग्न मनाचा शोध घेण्यास, त्यांचे प्रत्ययकारी दर्शन घडवण्यास लेखन अपुरे पडले. वास्तविक सुहास तांबे यांनी या आधी थोडेफार लेखन केले आहे. विशेषतः ‘डिअर पिनाक’ ही एकांकिका त्यांनी उत्तमरीतीने अवि-ष्कृत केलेली आहे. रंगभूमीच्या माध्य-माचा त्यांना अंदाज आहे. तरीही ‘माझी गोष्ट’चे लेखन इतके विर-विरीत, एकसुरी का व्हावे?

लेखनात कमअस्सल असलेल्या या एकांकिकेचा प्रयोग फार मोठा परिणाम घडवणे शक्यच नव्हते. तरीही आनंद लागू याने ही एकांकिका यथाशक्ती सादर करण्याचा प्रयत्न केला. एकांकि-केतील मुख्य पात्र आणि दिग्दर्शक दोन्हीही आनंद लागू हाच होता. तो शब्द जितके परिणामकारक बोलतो तितके भिन्नभिन्न मुद्राभाव प्रकट करू शकत नाही. रंगमंचावर तो एका विशिष्ट मुद्राभावाने अवघडलेल्या अवस्थेत वावरताना दिसला. वास्तविक त्याची नाटचविषयक जाण चांगली आहे. यापूर्वी त्याने ‘कोळसा’ एकां-

किकेत आणि 'नाटककाराच्या शोधात' मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका स्मरणीय होतील इतक्या चांगल्या केल्या आहेत. या एकांकिकेतील इतर पात्र ही नायकाच्या निवेदनाला पूरक म्हणूनच होती. त्यांच्याबद्दल विशेष लिहिण्याजोगे नाही.

दुसरी एकांकिका होती सतीश आळेकरांची 'भजन!' यातही आजच्या युवकाचा जीवन आक्रोश व्यक्त केला आहे. घरादारात सर्वत्र चिडचिड, भांडण, असमाधान इत्यादी गोष्टींचे सूर आजच्या प्रत्येक युवकाला संत्रस्त करीत आहेत. त्या संत्रस्त अवस्थांची वेगवेगळी चित्रणे प्रसंगांद्वारा प्रकट झालेली आहेत. त्या संत्रस्त अवस्थेत एक सूर आहे, लय आहे की जी भजनाशी मिळती जुळती आहे. संत्रस्तपणाचे भजन आयुष्यभर (निदान तरुण वयात तरी) चालले आहे, असा एकांकिकेचा आशय. पण आळेकरांना हा युवकांचा संत्रस्तपणा भजन या कल्पनेशी सुसंवादीपणाने जोडता आला नाही. त्यामुळे भजन ही कल्पना एकांकिकेच्या मूळ सूत्रापासून दूर राहिली. प्रेक्षकापर्यंत ती संक्रांत होऊ शकली नाही. आळेकरांनी बऱ्याच प्रमाणात एकांकिका लेखन केले असल्याने प्रसंगनिर्मिती आणि संवाद लेखन याबाबत ते निर्धास्त राहू शकतात. त्याचा प्रत्यय याही एकांकिकेत आलेला आहे.

या एकांकिकेचे दिग्दर्शक होते श्रीधर कानिटकर. त्यांनी प्रयोग कल्पकतेने बसवला होता. हॉटेल आणि घर दोन विभागात करून योग्य तो परिणाम साधला होता. प्रकाश योजनेचा वापरही आवश्यक तेवढाच होता. हॉटेलमधले शेवटचे आणि छबूताईबुवा यांच्या संवादाचे कॉम्पोझिशन चांगले होते. या एकांकिकेत बरीच पात्रे होती. त्यातली दोनतीनच चांगली लक्षात राहिली ती म्हणजे भडकमकरचे काम करणारे दिलीप कोल्हटकर, छबुताई झालेली बिबा लागू, आई झालेली वैजंयती ओक. इतरांना अभिनयाला फारसा वावच नव्हता.

या दोन्ही एकांकिका पाहून आल्यावर 'ड्रॉपर्स' संबंधी अनेक विचार मनात आले. ज्या संस्थेत आनंद लागू, दिलीप कोल्हटकर, अनंत कुलकर्णी, सुधीर आलकर, श्रीधर कानिटकर, राजेन्द्र कानडे, वैजयंती ओक, बिबा लागू इत्यादी नवथर कलाकार आहेत. त्यांनी एकांकिकांची, नाटकाची निवड अधिक काटेकोरपणे, चोखंदळपणे आव्हानात्मक करायला हवी. यातले बरेचसे लोक हे अजून कॉलेज शिक्षणात आहेत, उद्याच्या रंगभूमीवर यांच्यापैकी काहीजण येतील. अशा कलाकारांकडून नाट्यनिवड आणि आणि गुणवत्ता असलेले प्रयोग यांची अपेक्षा आहे. ही अपेक्षा करण्याचे कारण सरळ आहे, याच कलाकारांनी गेल्यावर्षी 'नाटककारच्या शोधात...'चा उत्तम प्रयोग केलेला आहे. दुसरे म्हणजे बालगंधर्व – भरतनाट्य अशी नाट्यगृहे सोडून कर्नाटक हायस्कूलचा आडमार्गी असलेला हॉल पत्करलेला आहे. इंटिमेट थिएट-

रच्या वाटचालीने जाऊन काही नाटच-प्रयोग करावेत अशी यांची दृष्टी आहे. या कलाकारांना नाटचप्रवासाची दिशा तर निश्चितच गवसली आहे, आता ते पुढचा पल्ला कसा गाठतात याकडे नाटचरसिकांचे लक्ष आहे. अपेक्षा अशी की दोन अडीच वर्षातील आपल्या नाटचप्रवासाचा अनुभव घेऊन अधिक सजगपणे पुढच्यावेळी काही उत्तम प्रयोग सादर करतील.

'ड्रॉपर्स 'बद्दल इतक्या अशा बाळगायचे आणखी एक कारण म्हणजे कोणत्याही प्रस्थापित नाटचसंस्थेत ही कलाकार मंडळी सामील न होता स्वत:चा प्रवास स्वत:च घडवीत आहेत. प्रसिद्धीच्या सवंग कल्पनेपासून ती आतातरी दूर आहेत. ही दृष्टी प्रारंभी असल्यामुळे कौतुक अधिक आहे. महाराष्ट्रीय कलोपासकांच्या एकांकिका प्रयोगाकडे, थिएटर अॅकॅडमी या नूतन संस्थेकडे जसे पुणेकर जाणकार नाटच-प्रेक्षकांचे लक्ष आहे, तसेच 'ड्रॉपर्स'-वाल्यांकडे !

● ● ●


जेव्हा लेखणीतून शब्द नाहीं, ठिणग्या फुलतात.
तेव्हा प्रकाशित होते

# रणांगण पाक्षिक

**संपादक : अनिल बर्वे** **किमत ४० पैसे**


पंधरा जूनचे अंकात,

- ☐ राष्ट्रपतींच्या आंघोळीचा खर्च अडीच लाख रुपये.
- ☐ हेच दान देगा देवा, विमानाने मृत्यू यावा.
- ☐ सात शेत मजुरांचा खून करणारा महंत आणि उंदीर खाणारे शेतमजूर—बिहारचे वार्तापत्र.
- ☐ 'सदरील रेकॉर्ड रद्दीत विकले !' नू. म. वि. प्रशालेतील आर्थिक गैरव्यवहार.
- ☐ दोनशे जळते दिवस—ले. श्याम मोकाशी.

हे आणि इतर असेच जळजळीत सत्यान्वेषी लेख

**आजच 'रणांगण' १००० वर्गणीदार योजनेत सामील व्हा आणि २३ रुपयांची संग्राह्य पुस्तके विनामूल्य भेट मिळवा**

रणांगण वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपर्क : अनिल बर्वे ५२८ नारायण पेठ, भटवाडी, पुणे ३०



दुसऱ्या महायुद्धात हिट-लरने अणुबाँबच्या तयारीसाठी आटोकाट प्रयत्न केले. पण अकरा-जणांनी हा व्यूह भेदून काढला. मग युद्धाचे पारडे पालटले-

# अणुबाँबचे स्वप्न भंगले

जिप्सी मधुकांत

'नॉर्स्क हैड्रो' या नॉर्वेजिअन इले-क्ट्रोकेमिकल प्लँटला जर्मनांनी १९४२ च्या सुमारास डायटेरियम ऑक्साईड–हेवी–वॉटरचे उत्पादन ३ हजार पौंडावरून १० हजार पौंडावर नेण्याची सूचना दिली होती. हेवी वॉटरचा नॉर्वेतला हा सर्वात मोठा कारखाना. आणि कैसर विल्हेम इन्स्टि-टयूट ने दिलेली ही ऑर्डरही प्रचंड होती.

ब्रिटिशांच्या गुप्तहेरांनी मिळवलेल्या या बातमीचा अर्थ शास्त्रज्ञांच्या मते उघड होता युरेनियम २३५ च्या निर्मितीत हेवी वॉटर हा उपयुक्त घटक होता. आणि अणूचे विभाजन घडवून आणण्याचा प्रयोग जर्मन शास्त्रज्ञांनी मोठ्या प्रमाणावर हाती घेतला होता.

**कमांडो जॉब**

चर्चिलच्या मंत्रिमंडळाने 'नॉर्स्क हैड्रो' प्लँट उधळून लावण्याच्या बेताला अग्रक्रम दिला. पण वायुदलाने कळवले की, नॉर्वेतला हा प्लँट अतिशय अड-चणीच्या आणि डोंगरभागांनी वेढलेल्या जागी आहे. त्यामुळे यासाठी वेगळ्या पथकाची उभारणी करायची आव-श्यकता भासली. हा एक 'कमांडो जॉब' होता. लगेच या पथकासाठी योग्य व्यक्तींची शोधाशोध सुरू झाली. नॉर्वेच्या भूमिगत चळवळीच्या कार्य-कर्त्यांपैकी एकजण जलविद्युत्‌तज्ज्ञ होता. त्याला त्वरित स्पेशल फोर्सेसच्या लंडन-मधील कार्यालयात पाचारण करण्यात

आले. धडधाकट, तगडा आणि पूर्ण माहितगार असा तो या कामासाठी अगदी लायक होता. 'आयनर' हे टोपण नाव त्याला देण्यात आले. नॉर्स्क हैड्रो प्लँटपासून जवळच तो युद्धापूर्वी रहात होता आणि त्याचा भाऊ व नातेवाईक त्या कारखान्यात महत्वाच्या हुद्यावर काम करत होते. भूमिगत चळवळीला त्यांची सहानुभूती होती. डॉ. लीफ ट्रोनस्टड या शास्त्रज्ञाशी आयनरची गाठ घालून देण्यात आली. डॉ. ट्रोनस्टड यांची युद्धापूर्वी अनेक जर्मन शास्त्रज्ञांशी घनिष्ट मैत्री होती. जर्मनीच्या अणुबाँब प्रकल्पाबाबत त्यांना विशेष माहिती. शिवाय नॉर्स्क हैड्रोच्या कारखान्याचे ते एक प्रमुख शिल्पकार होते. १९४१ मध्ये नॉर्वेतल्या भूमिगत चळवळीच्या लोकांनी त्यांना स्वीडनमार्गे लंडनला आणले.

## आयनरने आव्हान स्वीकारले

पोलाद आणि कांक्रिटच्या सहाय्याने भक्कम बांधलेली अशी ती मजबूत सात मजली इमारत नॉर्स्क हैड्रोच्या प्लँटची होती. निवडक जर्मन सशस्त्र सैनिकांचा सभोवार व प्रत्यक्ष इमारतीभोवती, रस्त्यांवर खडा पहारा असे. सभोवारचे पर्वतांचे सुळके अतिशय अडचणीचे व दुर्लंघ्य होते. पण आयनरने ते आव्हान स्वीकारायचे ठरवले. त्याला आवश्यक ते ट्रान्समीटर चालवायचे, गुप्त संकेताचे, हवाई छत्रीचे ट्रेनिंग देण्यात आले. एका सूटकेसमध्ये मावेल असा ट्रान्स-मीटर सेट देण्यात आला. नॉर्वेत परत जाऊन नॉर्स्क हैड्रोविषयी मिळेल ती सर्व माहिती पाठवण्याचा व सहाय्यक पथकाची वाट पाहण्याचा त्याला हुकूम देण्यात आला.

एका चांदण्या रात्री नॉर्वेतल्या आपल्या घरापासून वीस मैल अंतरावर डोंगराळ भागात आयनरने हवाई छत्री-तून अवतरण केले. जमिनीवर उतरल्या-वर पोटात कळा आल्या होत्या. लगेच घराकडे कूच करून सकाळी त्याने नाश्ता केला. आपण इतके दिवस स्किइंग ट्रिपवर असल्याची बतावणी त्याने केली. वस्तुस्थिती अशी होती की त्यांनी पूर्वी किनाऱ्यावर एक जर्मन गलबत 'गाल्तेसुंड' पकडले होते नि त्यातून हिंडत होते. मग ही कामगिरी नंतर पत्करली. पण काहीतरी बतावणी आवश्यक होती.

## धरणावर काम मिळवले

आपल्या भावाच्या ओळखीने आयनरने प्रत्यक्ष नॉर्स्क हैड्रोच्या प्लँट-वरच एक काम मिळवले. हेवी वॉटरचे उत्पादन वाढवण्यासाठी जवळच एक नवीन धरण बांधायचे काम चालू होते तेथे आयनरला काम मिळाले. अतिशय विश्वासू मित्रांकडून त्याला प्लँटवरची सारी हालहवाल कळत होती. त्वरित ती माहिती तो ट्रान्समीटरद्वारे लंडनला पाठवीत असे. डायटेरियम ऑक्साईडचे उत्पादन वेगात चालू आहे. दरमहा जर्मनीला स्टॉक रवाना होत असतो, अशी माहिती त्याने पुरवली. यातला तपशील जाणून युद्ध मंत्रिमंडळाने त्वरित नॉर्स्क हैड्रो नामशेष करण्याच्या मोहिमेला चालना दिली. आयनरने तपशीलवार रिपोर्ट आणि डॉ.

ट्रोन्स्टस्टडची तंतोतंत रचनेची माहिती यांच्या आधारे पर्वतमय प्रदेशातील ही बिकट मोहिम सुरू झाली. त्याच भागातील चार भूमिगत नॉर्वेजियन निवडून त्यांना आयनरच्या मदतीसाठी हवाईछत्रीतून उतरवण्यात आले. त्यानंतर ऑक्टोबर १९४२ मध्ये आणखी कुमक येऊन पोचली. वाईट हवामानामुळे ती दूर अंतरावर उतरली. नंतरच्या पंधरा दिवसात त्यांना रेशन वगैरे पुरवण्यासाठी गोठल्या थंडीतही विमानातून ४ हजार फूट उंचीवरून बराच पुरवठा केला. या मोहिमेतील सैनिकांना 'स्वॅलो असे टोपण नाव दिले होते.

९ नोव्हेंबर रोजी या स्वॅलो दलाकडून मुख्य कार्यालयातील उत्सुक व चिंताग्रस्त अधिकाऱ्यांना संदेश पोचला. नॉर्स्क हैड्रोच्या जवळ ते जाऊन पोचले असून आयनरशी सपर्क साधला आहे. ग्लायडरच्या हल्ल्यासाठी बेतार व जमिनीवरून दिव्याच्या साहाय्याने ते संदेश देतील.

## ग्लायडरची मोहिम कुचसामी

या आशास्पद बातमीच्या पाठोपाठ १९ नोव्हेंबरला २ हॅलिफॅक्स बॉबर्स नॉर्वेच्या दिशेला वायुसैनिकांची तुकडी घेऊन झेपावली.

पण थोड्याच तासांनी नॉर्वेहून आलेला एक संदेश मात्र साऱ्या आशांवर पाणी टाकणारा होता. ही विमाने चिरडली गेली. सैनिक कामी आले. काही कैद झाले.

पण अजून वाईट बातमी येणार होती. जर्मन अधिकाऱ्यांना या विमानांच्या जळक्या अवशेषात एक नकाशा सापडला. व्हेमोर्क – जेथे हा हेवी वॉटरचा प्लँट होता ते गाव – या ठिकाणावर एक खूण होती. नॉर्वेमधील जर्मन कमिशर योसेफ ते बॉव्हेन, कमांडिंग जनरल फॉन फाल्केनहोर्स्ट इ. बडेबडे अधिकारी व्हेमोर्क येथे रवाना झाले. जर्मन सैनिकांनी प्लँट भोवती पहारा पक्का केला. आसपासचा प्रदेश कसोशीने विचरून काढून भूमिगत सैनिक हुडकून काढण्याचे सत्र चालवले. आतापर्यंत जमवूत आणलेली सारी यंत्रणा, आयनरचे बेत कोसळत चालले होते. पण यातून 'स्वॅलो' मात्र मुष्किलीने निसटले. काही काळ कुणालाच तोंड वर काढता आले नाही.

## 'स्वॅलोची 'ची बिकट झुंज

ग्लायडर–हल्ल्याची कल्पना सोडून देण्यात आली.

लंडनमध्ये या ऑपरेशनची नव्याने आखणी होऊ लागली. सहा स्पेशल फोर्स नॉर्वेजियन्सना पुन्हा हवाई छत्रीतून उतरवण्याचे ठरले. डॉ. ट्रोनस्टडच्या नेतृत्वाखाली नकाशे, प्रतिकृती इ. चे ट्रेनिंग पुन्हा सुरू झाले. वेळ खूपच थोडा होता. ४ हजार फूट उंचीवरच्या डोंगराळ भागात 'स्वॅलो'– या मोहिमेतील भूमिगत सैनिक – अपुऱ्या अन्नावर गुजराण करीत होते. त्यांच्या रेडिओच्या बॅटरीज उतरत चालल्या होत्या. एका बर्फाच्छादित गुहेत त्यांचा निवास होता. जवळपास प्रत्येकालाच ताप आणि पोटदुखीने पछाडलेले. रेनडिअरचे मांस खाण्याची वेळ त्यांच्यावर आली. आय-

नर पलिकडे काही मैल अंतरावर गेस्टापोना हुलकावणी देत होता. प्रत्येकवेळी आपली झोपडी बर्फात, धुराआड दडवून तो स्कीईंग करत खाली आपल्या सोबत्यांना व्हेमोर्क गावात जाऊन भेटण्याचे धाडस करीतच असे.

## केवळ बारा सैनिक !

एके दिवशी आयनरकडून अचानक एक संदेश लंडनला मिळाला.. त्यावर विश्वास बसेना. ह्यात म्हटले होते की, गेस्टापोंची खात्री पटली आहे की, गनिमांचा रोख नॉर्स्क हैड्रोवर नसून जवळच नव्याने बांधत असलेल्या धरणावर आहे ! म्हणून त्यांनी कारखान्याची शिबंदी कमी करून धरणावर पूर्ण कुमक ठेवली आहे. केवळ बारा सैनिक नॉर्स्क हैड्रोवर आहेत !

आणि एका नव्या व्यूहाची आखणी करण्यात आली.

डिसेंबरच्या अखेरीस 'स्वॅलो'च्या तळापासून तीस मैल उत्तरेला बर्फाच्छादित पर्वतावर सहा सुसज्ज नॉर्वेजिएन उतरवण्यात आले. बर्फाच्या वादळातून, अडीअडचणीतून बिकट डोंगरातून रस्ता काढत ते पाच दिवस स्वॅलोंचा तळ हुडकत होते. निराश होत होते. बर्फाच्या माऱ्यापुढे. पण आले तसे ते बर्फाचे वादळ संपले. आणि हा दमला भागलेला काफिला आगेकूच करत होता. भेटीच्या गुप्त संकेतस्थानी ते येत होते. तेवढयात दोन बर्फावरून घसरत येणाऱ्या आकृत्या त्यांनी पाहिल्या

नाडीचे ठोके वाढू लागले. क्षणक्षण तीक्ष्ण धारेने कापल्यासारखा.

त्यांच्यापैकी एकाने रेनडिअरचा रक्षक म्हणून पुढे जाऊन बतावणी करायचें ठरवले. बाकीचे बर्फात मागे दडले.

पण थोडयाच वेळात वाऱ्याच्या गोंगाटाबरोबरच आनंदाच्या ललकाऱ्या ऐकू आल्या ! हव्या असलेल्या सोबत्यांची भेट झाली होती.

मग हालचाली झपाटयाने होऊ लागल्या. स्वॅलोंच्या तळावर या नव्या कुमकेला आयनरने ताजी खबर सुनवली. कारखान्यातले रक्षक, त्यांची जागा, बदलण्याच्या वेळी, सवयी, कोणते फाटक कसे बंद केले आहे वगैरे हजारो फूट दऱ्याखोऱ्या ओलांडून त्यांना एका सुळक्याच्या कडेने जाणाऱ्या रेल्वे स्टेशनाकडे जायचे होते. ते रूळ कारखान्याकडे जात होते. जराही गलती झाली तर सारा परिसर मोठमोठ्या प्रकाशझोतांनी झगमगून उठणार होता. या साऱ्या मोहिमेची नीट, काळजीपूर्वक, बारीक तपशील घेऊन आखणी चालू होती.

## आता क्षण आला आहे....

२७ फेब्रुवारीला रात्री ८ वाजता नऊ जणांनी कूच केले. त्यांच्यापाशी बारूद सामग्री होती. त्यांची ही मोहिम म्हणजे एक भयंकर दिव्यच होते. बर्फाने माखलेले सुळके, दऱ्या, प्रवाह, रोनी त्यांचा नेता होता. तो सारखा घडयाळाकडे पहात होता. सुळक्यांची सरळ चढण चढताना एकेक पाऊल केवढे जोखमीचे होते. वर चढून गेल्यावर ते सरपटत

पुढें निघाले. आता यंत्रांची घरघर ऐकू येत होती. रोनीने एकदा अखेरचे सर्वांना बोलावून दबत्या आवाजात सर्वांना सूचना दिल्या. प्रत्येकाला नेमके काय करायचे, हे माहित होते. 'आता क्षण आला आहे.' रोनीने शेवटी सांगितले.

## रंगीत तालीम उपयुक्त ठरली

त्यांच्यापैकी एकजण तीक्ष्ण हत्यारे-भाले घेऊन पुढे सरकला. एक फाटक त्यांनी पूर्वीच हेरून नक्की केले होते. तेथे केवळ साखळीची खिटोली होती. मग पोलादावर चरे पडल्याचा आवाज ऐकू आला. बाकीच्यांनी आपापले मोर्चे गाठले उघडलेल्या फाटकातून ते चटकन् आत घुसले. पाच जणांच्या एका जथ्याने त्या बारा जर्मन पहारेकऱ्यांच्या बरॅकीकडे मोर्चा वळवला. धोक्याच्या घंटेचा आवाज झालाच तर त्यांनी टॉमी गन्स पहारेकऱ्यावर रोखल्या होत्याच. डॉ. ट्रानस्टंडने त्या भागाचे नकाशे व मोक्याच्या जागांची इतकी हुबेहूब नक्कल करून दिली होती की, रोनीच्या हाताखालच्या चौघांच्या टोळीला केबलसचा भुयारी मार्ग सापडायला वेळ लागला नाही. त्या आधारे मग रोनीने त्वरीत पाईप, यंत्रे, टाक्या इ. भोवती भराभर सुरूंग पेरले. चार्जेस लावले. पहारेकऱ्यावर दोन पिस्तूले रोखली होती. तो पार गर्भगळीत झाला होता. पण अगदी उगी राहिला. तेवढ्यात पलिकडच्या खिडकीचे काचेचे दार कुरकुरले. रोनीने गोळी झाडली. पण लगेच लक्षात आले की मघाशी अंधारातून येत असलेले ते त्याचेच सोबती होते. थरथरत्या हाताने त्याने चार्जेस लावायचे काम उरकले. या साऱ्या प्रकाराची रंगीत तालीम इंग्लंडमध्ये केली होतीच.

क्षणाक्षणाला धोक्याची घंटा खणखणण्याची भीती होती. अजून तरी काही गडबड नव्हती. त्याने ३० सेकंदाचे फ्यूज लावले आणि तारा जोडल्या.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालों आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

सर्वांना बाहेर धावायला सांगितले. ते २० यार्ड लांब पळतात न पळतात तोच धुमधडाका झाला. त्यांच्या पायाखालची जमीन हादरत होती.

## हेवी वॉटरचा नाश

आणि धोक्याची घंटा घणाणली !

दातओठ खात ते जमीन पहारेकरी काडतुसाचे पट्टे चढवून बंदुका घेत धावले. रोनी आणि त्याचे सोबती आल्या मार्गाने पसार झाले. हजारो पौंडाचे मौल्यवान डायटेरियम ऑक्साईडच्या टाक्या फुटून खाली सांडले होते. त्या भक्कम इमारतीतल्या यंत्रसामग्रीचा चक्काचूर झाला होता.

काही तासातच व्हेमॉर्कला जनरल फॉन फाल्केनहोर्स्ट आणि जर्मन कमांडर्स, वरिष्ठ अधिकारी रोंरावत आले. एकीकडे त्या घातपाताच्या संयोजनाने त्यांनीही तोंडात बोटे घातली. पण तळपायाची आग मस्तकाला पोचली होती जर्मनांची. १२ हजारांच्या खास सशस्त्र तुकडीला तो सारा भाग हुडकून काढण्याचा आदेश दिला. ह्यांच्या जोडीला विमाने स्कीईंग करणाऱ्या खास तुकड्या होत्या. सर्व रस्ते रोखले होते.

पण त्या अकरा जणांचा पत्ता लागला नाही. सहापैकी पाच बंदुकधारी नॉर्वेजियन्सनी त्वरीत स्वीडिश सरहद्द गाठली. बऱ्याच अडचणीतून निभावून मग ते इंग्लंडला पोचले. सहावा बोंझो आणि चार 'स्वॅलो' त्याच भागात इतर कामगिऱ्या पार पाडण्यासाठी राहिले. जर्मनांशी हुलकावणी देत त्यांचे काम चालू होते. आयनर आपल्या गुहेत परतला. मोहिम फत्ते झाल्याचा संदेश धाडला. परत नॉर्स्क हैड्रोवर तो लक्ष ठेवून होता.

पुढे १९४३ च्या अखेरीस त्याने कळविले की, जर्मनांनी कारखान्याची डागडुजी करून उत्पादनाला पुन्हा सुरूवात केली आहे. दोस्तांच्या विमानांनी, हे वृत्त कळताच, या कारखान्याच्या पॉवर स्टेशनवर हल्ला चढवला. मग जर्मनांनी उरलासुरला साठा आणि यंत्रसामुग्री जर्मनीतच हलवायचा बेत आखला. आयनरने 'हैड्रा' ही ती मालवाहू बोट बुडवायची परवानगी मागितली. नॉर्स्क हैड्राची सारी अमूल्य सामग्री या बोटीवरून जर्मनीला चालली होती.

## अणुबाँबचे स्वप्न भंगले

आयनरला त्वरित आदेश मिळाले. बोंझो त्याच्या मदतीला आला. बनावट कागदपत्र तयार करून त्याने नॉर्स्क हैड्राचा यंत्रविशारद असल्याची बतावणी करून बोटीवर प्रवेश मिळवला. १९४४ च्या फेब्रुवारीत एका सकाळी नॉर्वेतल्या टचुनर-जो सरोवरात 'हैड्रा' बोटीला जलसमाधी लाभली. बोंझोच्या सुरुंगाने काम फत्ते केले ! आणि त्याचबरोबर हिटलरचे अणुबाँबचे स्वप्नही भंगले. युद्धाचे पारडे बदलत चालले होते. आता दूरच्या प्रयोगाला अवसर नव्हता. मग गोअरिंग–हिटलर यांनी दुसऱ्या ताबडतोबीच्या शस्त्रांकडे मोहरा वळवला. त्या अकरा जणांनी केलेल्या अपूर्व कामगिरीमुळे दुसऱ्या महायुद्धात निश्चितच फार मोठी कलाटणी मिळाली. ● ● ●

सत्कारासाठी झाली होती. जेवण मिळणार की नाही, हा दुय्यम प्रश्न होता. केवळ जेवण मिळणार म्हणून हे लोक आले नव्हते व जेवण मिळणार म्हणून ते शेवटपर्यंत थांबले नव्हते. दुसरे विधान पृष्ठ २१ वर असे करण्यात आले आहे, की चौदारतळे सत्याग्रहात भाग घेतलेल्या बाबासाहेबांच्या त्यावेळच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यातील बरेचसे सत्याग्रहात भाग घेतलेले नव्हते अशी कुरकूर काही कोपऱ्यांतून ऐकू आली. ते खरे नाही. जरी अशी कुरकूर ऐकू आली तरी वस्तुस्थिती तशी नाही. ज्यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता त्यांची खात्रीची यादी तयार करूनच त्यांचा सत्कार करण्यात आला; आणि ज्यांचा सत्कार झाला ते सर्व त्यावेळचे सत्याग्रहीच होते. काही नवीन लोकांना त्यांची माहिती नसल्यामुळे कदाचित त्यांनी कुरकूर केली असेल. यापलिकडे या कुरकुरीला काही अर्थ नाही.


म. दु. ताम्हानेकर, मुंबई.

## इतिहास विसरला जात आहे

३१ मे, ७३

□ ३१ मार्च ७३ चा 'माणूस'चा अंक २-३ दिवसापूर्वी हातात पडला. 'मी नेताजींना बघितलय्' ही लेखमाला संपली म्हणून फार वाईट वाटले. या या लेखाबद्दल 'माणूस'मध्ये वाचकांची प्रतिक्रिया फारच कमी आली असे आम्हास वाटते. भारताबाहेर राहणाऱ्या सामान्य माणसांनी त्याकाळी आपला देश स्वतंत्र व्हावा म्हणून काय हालअपेष्टा सोसल्या त्याची ही जीवंत कहाणी आहे. हा स्फुर्तिदायक इतिहास हल्लीचे लोक विसरत चालले आहेत, याचे वाईट वाटते. अशी प्रभावी लेखमाला प्रसिद्ध केल्याबद्दल आपले आभार,

शामकांत लिमये
सौ. सुजाता लिमये
टाउंटन, यु. एस. ए.



# रंगतरंग स्पर्धा

माणूस रंगतरंग स्पर्धेचा निकाल प्रसिद्ध होत आहे.

थोडी किचकट, थोडी अधिक रेंगाळलेली अशी ही स्पर्धा असूनही स्पर्धेत एकूण ४२३ स्पर्धकांनी भाग घेतला.

निकाल तयार करण्यासाठी परीक्षक मंडळाच्या एकूण तीन बैठकी झाल्या. सर्व स्पर्धापत्रकांची प्राथमिक तपासणी पुणे येथे होऊन किमान पात्रता व स्पर्धेच्या अटीही हे स्पर्धक पूर्ण करू शकले नाहीत, असे ११० स्पर्धक या पहिल्या फेरीत बाद ठरवण्यात आले. बाकी ३१३ स्पर्धापत्रकांच्या तपासणीचे काम मुंबई येथे पूर्ण करण्यात आले.

तिसऱ्या बैठकीत अतिम निकाल तयार करण्यात आला. स्पर्धेचे स्वरूप, तिच्या योजनेमागील उद्देश, प्रथम क्रमांकासाठी ठेवण्यात आलेले पारितोषिक या सर्व गोष्टींचा विचार करता एकही स्पर्धक प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकासाठी पात्र ठरू शकत नाही असा परीक्षक मंडळाचा निर्णय झाला. या निर्णयानुसार प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आलेले नाही.

क्रमांक दोन, तीन व इतर सर्व पारितोषिक विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

स्पर्धेत उत्साहाने भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांचे व परीक्षक मंडळाचे मनःपूर्वक आभार.

—संपादक माणूस

## पारितोषिकांचे मानकरी

| | |
|---|---|
| पारितोषिक क्रमांक दोन<br>रु. १५०१ | श्री. अनंत गोपाळ केळकर<br>विष्णू गंगा, ११०८ शुक्रवार<br>पुणे २ |
| पारितोषिक क्रमांक तीन<br>रु. १००१ | श्री. रमेश शिवराम गांगल<br>पारशी कॉलनी, दादर<br>मुंबई १४. |
| पारितोषिक क्रमांक चार<br>रु. ५०१ | कु. वीणा नरहरराव तुंगार<br>बीड, मराठवाडा. |

**स्पर्धेत ठेवण्यात आलेली १०० रुपयांची ५० पारितोषिके खालील व्यक्तींना देण्यात आली आहेत.**

१. श्री. कृ. रा पेंडसे
मु. पो. मुरुड जिल्हा उस्मानाबाद

२. स्वाती चारुदत्त अमृते
अंधेरी, मुंबई

३. श्री. दत्ता वा मणेरकर
पणजी गोवा

४. सौ मीना जोगळेकर
डेक्कन जिमखाना पुणे ४

५. श्री. फणींद्र पेंढारकर
हाजीअली, मुंबई

६. वनजोत्स्ना सु. लट्टू
टिळक रोड, पुणे ३०

७. रंजन कोरडे फोंडा पणजी

८. श्री. गुरुनाथ वि. देशपांडे
भायखळा मुंबई २७

९. श्री. चंद्रशेखर ठकार
चेंबूर, मुंबई ७१

१०. कु. वरदा ढवळीकर
इंदूर, मध्यप्रदेश

११. श्री. मोहन श. शेजवाडकर
गिरगाव, मुंबई ४

१२. श्री. अनिल डी. सुळे
शिवाजी पार्क, मुंबई १६

१३. श्री. राजीव बी. मुंढे
खार, मुंबई ५२

१४. सौ. पद्मजा कृ. पटवर्धन
माडीवाले कॉलनी, पुणे ३०

१५. सौ. सुमित्रा तु. देव
माटुंगा, मुंबई १९

१६. श्री. गिरीश गो. महिंद्रकर
एलफिस्टन रोड, मुंबई १३

१७. चित्ररेखा श. पटवर्धन
२९४ सदाशिव, पुणे ३०

१८. सौ. सुरेखा ज. कोटकर
बोरिवली, मुंबई ९२

१९. श्री. रामराव दासोपंत अंबरेकर
आंबेजोगाई, बीड

२०. कु. अरूण मल्हार परके
मु. पो. दिवा, ठाणे

२१. श्री. शशीकांत रा. रानडे
नौपाडा, ठाणे

२२. श्री. भालचंद्र राजे, कल्याण

२३. सौ. मालती रानडे
बरेली (उत्तर प्रदेश)

२४. श्री. सुमित्रा खरे
भायखळा मुंबई ८

२५. श्री. रघुनाथ के. कोळी
वारणानगर, ता. पन्हाळा

२६. श्री. मधुकर वासुदेव सहस्रबुद्धे
बोरिवली (प.) मुंबई ९२

२७. श्री. दि. ज. सामंत
वांद्रा, मुंबई ५०

२८. श्री. श्री. भा. श्रोत्री
बेळगाव रोड, धारवाड

२९. कु. स्मिता शेटे, ठाकुरद्वार, मुंबई २

३०. श्री. कालिदास प्रभाकर
वसंतगडकर, सातारा

३१. सौ. सुलभा फडणीस
जी. एस. एस. कॉलेज, बेळगाव

३२. श्री. वि. म. महाडीक
केसकर वाडा, फलटण, जि. सातारा

३३. सौ. पद्मजा जोग, पार्ले, मुंबई ५७

३४. श्री. ल. रा. सावबा
वडाळा, मुंबई ३१

३५. सौ. सुजाता जी. कुमेरकर
हैद्रावाद

३६. सौ. वंदना जोशी, पनवेल, कुलाबा

३७. सौ. सुमित्रा वसंत मुळये
पो. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

३८. श्री. विजय ज. परळकर
आझाद नगर, मुंबई ५८

३९. श्री. नारायण रामदास वैद्य
कर्वे रोड, पुणे ४

४०. श्री. सुहास शा. काकडे
आय. आय. टी. मुंबई ७६

४१. श्री. म. बापट
शनिवार पेठ, पुणे ३०

४२. श्री. हेमंत श्री. कर्वे
पर्वती, पुणे ९

४३. श्री. अरूण विष्णु बर्वे
तळेगाव-दाभाडे

४४. श्री. निलीन नरेंद्र जोशी
वडाळा, मुंबई ३१.

४५. श्री. दिलीप विनायकराव
रामपुरकर, आंबाजोगाई, बीड

४६. श्री. अशोक बी. सायनाकर
मु. पो. भवानीनगर, जि. सांगली

४७. प्रकाश श्रीधर उपासनी
दादर, मुंबई २८

४८. श्री. अशोक क. उगार
विष्णूपुरा, पुणे २

४९. श्री. कुमुद दिगंबर पिटके,
सोलापूर

५०. श्री. सजीव र. आयाचित
मु. पो. पुसेसावळी, ता. खटाव

---

परीक्षक मंडळातील सदस्य

श्री. वसंत सरवटे
श्री. श्याम जोशी
प्रा. अनंत भावे
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH-649

तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढोल अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी
तपशील पुढील अंकी

